


# श्री सद्गुरु ब्रह्मानंद चरित्र

ब्रम्हान[illegible] (बुरुंगवाडी)

Scanned by TapScanner

ॐ ॥श्री ग

# श्री सद्गुरु ब्रह्मानंद चरित्र

कवी : शामसुंदर कृत

● मुद्रक : शिव ऑफसेट प्रिंटर्स,
जे-७३/२, एम.आय.डी.सी.
कुपवाड ब्लॉक, सांगली ४१६ ४३६
फोन- ४४२२७ ७५५०४

Scanned by TapScanner

## ग्रंथापूर्वी चार शब्द...

दिनांक १४ ऑक्टोबर १९९६ चा दिवस योगीराज श्री प. पू. ब्रह्मानंद महाराजांची ८८ वी पुण्यतिथी दिन ब्रह्मानंद महाराजांनी सर्व भक्तगणांना आपला ओवीबद्ध ग्रंथ घरोघरी जावा म्हणून दिलेला दृष्टांतच श्री. हरिभाऊ दिडपाये व श्री. लोखंडे मु. पो. वाबगाव, ता. देवळी, जि. वर्धा यांनी नामानंद लिखित शामसुंदर कृत हा ग्रंथ पोहच केला. हा मुळ ग्रंथ श्री ब्रह्मानंद शिष्य नामानंद यांनी लिहिला. व त्यांची ओवीबद्ध रचना शामसुंदरनी केली.

भक्तगणांनी सढळ हस्ते देणगीतून युवाशक्तीला श्री ब्रह्मानंद चरित्र छापण्यास प्रेरणा दिली. (श्री सद्गुरु ब्रह्मानंद या ग्रंथातून-मानवी धर्माची दहा तत्वे, धैर्य, क्षमा, संयम, चौर्यकर्मन करणे, अंतर्बाह्य पवित्रता, बुद्धीश्रेष्ठ, इंद्रियनिग्रह, विद्या, सत्य, अक्रोध हि तत्वे सांगितली आहेत.

आश्वीन वद्यद्वितीया शके १८३० म्हणजे सन १९०८ साली बुरुंगवाडी येथे मठात त्यांच्या सर्व भक्तगण शिष्यागणा समक्ष सायंकाळीचे वेळी जीवंत समाधी घेतली. शिष्योत्तम नामनंद महाराज व तुकाराम माळी इ. साहाय्याने समाधी मंदिर बांधले. त्यानंतर डिसेंबर १९५८ मध्ये पू. स्वामीनंदभारती या मठात आकस्मिक आले असताना मोडकळीस आलेला मठ पाहून त्याच्या जीर्णोद्धाराची कल्पना त्यांना सुचली. गावातील लोकांच्या सहकार्यानी दिनांक १२।३।१९६० रोजी सध्याचा आश्रम बांधला. आता या आश्रमामध्ये ...नेम पूजा-आरती भजन-प्रवचन ही सेवा चालू असते. प्रत्येक वर्षी महाशिवरात्रीनंतर येणारा सोमवार ...'श्री'ची यात्रा असते. यात्रेनिमित्त गेले २२ वर्षे ह. भ. प. धोंडीराम आबा धनवडे अनुगडेवाडी



यांच्या प्रेरणेतून 'श्री ज्ञानेश्वरी पारायण' चालू असते.

ब्रह्मानंद महाराजांच्या पवित्र स्मृतीप्रित्यर्थ ब्रह्मानंद महाराज मठ विश्वस्त मंडळ, ब्रह्मानंद शिक्षण प्रसारक मंडळ, ब्रह्मानंद सर्व सेवा सहकारी सोसायटी, ब्रह्मानंद ग्रामीण बिगर शेती सहकारी पत संस्था, ब्रह्मानंद पाणी पुरवठा योजना, ब्रह्मानंद भजनी मंडळी, ब्रह्मानंद युवक मंडळ, इत्यादी संस्था कार्यरत आहेत. या सर्व संस्थांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या या कार्यास मदत केली. त्याबद्दल त्यांचे आभार.

शिव ऑफसेट प्रिंटर्स, सांगली यांनी आकर्षक आणि दोषरहित वाजवी दरात योग्य वेळी काम करून दिले. त्याबद्दल त्यांचे आभार.

कै. रा. वा. चिणीसकृत 'श्री ब्रह्मानंद जीवन गाथा' व प्रज्ञानंद स्वामी कृत 'ब्रह्मानंद उपासना' या ग्रंथातून समग्र आरत्या, भजन, अष्टक वगैरे उपासना सामुग्री मिळाली. त्याबद्दल त्यांचे आभार.

या ग्रंथाची प्रथम प्रत अत्यंत विनम्रतेने व भक्तिभावाने श्री ब्रह्मानंद महाराज चरणी अर्पण करुन त्यांच्या नामस्मरणाने व ग्रंथ पारायणाने आपल्या प्रापंचिक जीवनात स्वास्थ्य, शांती आणि सुखवृद्धी होऊन भक्तीभाव वाढावा एवढीच श्री ब्रह्मानंद चरणी प्रार्थना करूया...!!

आपले नम्र,
**सर्व भक्तगण**

Scanned by TapScanner

## अध्याय पहिला

॥ श्री गणेशायनमः ॥ श्री सरस्वते नमः ॥ नमो नमो गणनायका । गौरीपुत्रा विनायका । वक्रतुंडा वरदायका । कृपा करी मजवरी ॥१॥ लंबोदरा सेंदूर लेपना । विघ्न राजेंद्रा गजवदना । एकदंता धूम्रवर्णा । विघ्नहारक नाम तुझे ॥२॥ करिसी गदा त्रिशुल धारण । मुषक असे तव वाहन । पायी पैंजन रूणझुण । कर चार तुज शोभे ॥३॥ करितो तुज आवाहन । त्वरीत येई धावोन । ब्रम्हानंद चरित्राकारण । घेई वदवून मजमुखे ॥४॥ कुलदेवते भवानी आई । लेकरासाठी धावोन येई । सहाय्य करी लवलाही आपुल्या बाळास ॥५॥ नमन माझे जगपालन लक्ष्मीपते क्षिराब्धी नायका। शंख चक्र गदा धारका । शेषशयना सार्वभौमा ॥६॥ प्रार्थितो तुज शिव शंकरा । भोलेनाथा गौरीहरा । अर्धनारी नटेश्वरा । निवारी मज यातना ॥७॥ नमन माझे ब्रम्हकुमारी । विणा शोभे व्दयकरी । कृपा करुनी मजवरी । पूर्तता करावी चरित्राची ॥८॥ नमो नमो तुज गजानना । शेगावीच्या योगीराजा । भक्तसखा विघ्ननाशका । वरदहस्त ठेवी ममशीरी ॥९॥ नमन माझे ज्ञानेश्वरा । विठ्ठलसुता ज्ञानसागरा । कृपाकरूनी दीनपामरा । ज्ञानी करावे मज कारणे ॥१०॥ आता नमन नामानंदा । निवारूनी भवभय आपदा । पोहचवितो ब्रह्मपदा । त्या सदगुरू माऊलीस ॥११॥ अज्ञानी मी मुढमती । नाही ज्ञान नाही भक्ती । न



जाणे काव्य व्युत्पत्ती । ऐसा हिन दीन असे गा ॥१२॥ परी करितो मी धाडस । जाणूनी आपले पाडस । करूवून येई कार्यास । दीन बंधू मायबापा ॥१३॥ आता श्रोते सावधान । चरित्र करतो कथन । ऐका एकनिष्ठ करून ब्रह्मानंद चरित्र सुरस ॥१४॥ ही भारत भू पवित्र धरणीवर । येथे महापुरुषांचे अवतार । झालेत आणि होणार । शंका नुरे तिळभरी ॥१५॥ सत्पुरूषांचे अवतार पाहता । अवांतर देशा न दिसे तत्वता । भारतखंडातची अवतरला ।आनंदलया बहु मिळे ॥१६॥ कांकी भारतभू पुण्यपावन । येथे अवतरले रामकृष्ण । नरसिंह आणि वामन । वराह कुर्म परशुराम ॥१७॥ इथे बहुत भक्नगण । त्यांचा उध्दार करण्याकारण । अवतार घेई लक्ष्मीरमण । ऐसी पावन ही भूमाता ॥१८॥ म्हणूनी सत्पुरूषांचे अवतार । होती भारत भूमीवर । करण्या जडजिवांचा उध्दार । इषाज्ञेने जाण पां ॥१९॥ ब्रम्हानंद ब्रम्हीभूत । ज्यांच्या लिलेचा न लागे अंत । उध्दारण्या जड जिवाप्रत । इषाज्ञेने येती महिवरी ॥२०॥ महादेव भटजी पिता । पार्वतीबाई माता । यांचे उदरी अवतार होता । हर्ष तया बहु वाटे ॥२१॥ दोघेही सदाचार संपन्न । ईश्वरभक्त परिपूर्ण ईश्वरावरी निष्ठा ठेवून । संसार चालवी आपुला ॥२२॥ नर्मदातीरी होते सदन । आठवे वर्ष होता पूर्ण। माता पिता गेले निघोन । छत्र पूर्ण उडाले ॥२३॥ सोडोनी नर्मदातिरी । भटकत आले काशीपुरी । गौरीहाराचे चरणावरी । नतमस्तक जाहले ॥२४॥ तेथे भेटी विद्यानंद महाराज । परमार्थ चर्चा निघे सहज । तयी प्रकाशले ज्ञान तेज । ब्रम्हानंद योग्याचे ॥२५॥ त्याचा संक्षेपे देतो सार । ऐका चित्त करूनी स्थिर । ब्रम्हानंद विचारी

Scanned by TapScanner

बाचे मधुर । प्रश्न गहन विद्यानंदा ॥२६॥ हे स्वामी दयानिधे । भवतारका कृपानिधे । करी शंका मजविषे । त्याचे निरसन करावे ॥२७॥ जीव परमात्मा असे एक । की दोही असे भिन्न देख । हाची विचार मज चोख । समजावूनी सांगावा ॥२८॥ जरी जीव हाची परमात्मा असे । तरी तळमळ असमाधान का जी दिसे । चिंता हृदयी सदा बसे । ऐसे व्हावे का बरे ॥२९॥ जीव जरी म्हणावा परमात्मा । 'ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः।मनःष्ठष्ठानीद्रियाणी प्रकृतीस्थानी कर्षती'। ऐसे भगवंत वदले ना । अर्जुनासी गितेठायी ॥३०॥ म्हणूनी स्वामी शंका निवृत्ती करावी ॥३१॥ ऐकूनी ब्रम्हानंद वचन । स्वामी विचार करी गहन । बाल दिसतो लहान । परी प्रश्न थोरा ऐसे ॥३२॥ तव पाही अंतरी शोधून । ही आठ वर्षाची मूर्ती जाण । असावी गर्भज्ञानी पूर्ण । ऐसे तया दिसतसे ॥३३॥ मुखकमली ब्रम्हतेज दिसे । शरीर शांत योग्याऐसे । गंभीर मुद्रा नयनी भासे । म्हणोनी योगी निःसंशय ॥३४॥ ऐसे विचारूनी चित्ती । स्वामी बोले बालमुर्ती । तव शंका योग्याकरीता असती । तू तर सद्चिदानंदी रमणार ॥३५॥ तरी शास्त्र वचनाप्रमाणे । ब्रम्हचर्याची दिक्षा घेणे । हेची योग्य असे जाणे । बालमुर्ती ब्रम्हानंदा ॥३६॥ तरी तू जाई हरिव्दारास । भेटूनी केशवनंद स्वामीस । दिक्षा देण्यास प्रार्थी त्यास । दिक्षेस पात्र दिससी तू ॥३७॥ केशवानंद व्रतस्थ महान । ते पूर्ण पणे योगी असून । त्यांचाच मी शिष्य जाण । तू गुरू बंधू माझा गा ॥३८॥ ब्रम्हानंद ऐसे ऐकून । म्हणे गुरूबंधू जनार्दन । आपल्या विचारा अनुमोदन । सदाशिवाचे घेवू या ॥३९॥ उभयंता गेले शिवमंदिरात ।



दर्शनाचा धरूनी हेतु । तेथील दर्शनाचा परिपाठ । ऐसा होता जाण पां ॥४०॥ नंदीकेश्वराचे अंडास हात लावावे । व्दय सिंगामधुन शिवाचे दर्शन घ्यावे । तदनंतर मंदिरी जावे । दर्शन घेण्या महादेवाचे ॥४१॥ ब्रम्हानंदे अंडासी हात लाविता । नंदीकेश्वर दगडी असता । गरगर फिरला तत्वता । अपूर्व दृश्य घडियेले ॥४२॥ ब्रम्हानंद म्हणे गुरूभ्राता । पुढील विधी कोणता । मज सांगावा आता । दर्शनापूर्वी शिवाचे ॥४३॥स्वामी बोले बालका। दर्शन घेई मी वेळ कितीका। परि आज देखिले अलौकीका। संगतीने तुझ्या की।।४४। दगडी असता नंदिकेश्वर। तुवा हात लाविता गरगर। फिरू लागला सत्वर। मला काही समजेना।।४५॥ ऐसे होण्यास काय कारण। हे गुढ सांगावे उकलोन । पडीलो मी संभ्रमी जाण। ब्रम्हानंदा बालका।।४६॥ ऐकोनी विद्यानंद वाणी। ब्रम्हानंद बोले हासोनी। मी पूर्णपणे अज्ञानी। मज काय कळतील।।४७॥ जाणण्यास समर्थ असता। मज अज्ञाना काय विचारिता। परि मन अल्पविचारे तत्वता। भोलानाथ नाही येथे।।४८॥ तो कोठे तरी गुंतला । किंवासंताचे आश्रमा गेला। ऐसे वाटते मला। स्वामी नाथा गुरुबंधो।।४९॥ स्वामीस नवल वाटे फार। यात असावा काही सार। त्यांचा आत्मा बोले निरंतर। हा बालक योगी असावा।।५०॥ स्वामी विचारी ब्रम्हानंदाला तुची सांगावे आता मला। कोठे जावे सदाशिवाला। प्रत्यक्ष भेटण्यास।।५१॥ ब्रम्हानंद बोले स्वामीस। जावू आपण व्यास काशीस। तेथे माधवनाथाचे आश्रमास। माझे वडील असतील की ॥५२॥ ऐसे बोलोनी उभयता चाले। व्यास काशीमध्ये आले । तेथे सदाशिवाचे दर्शन झाले । दोघाही गुरुबंधूस ॥५३॥ ऐसी

Scanned by TapScanner

ब्रम्हानंदाची करणी। अलौकीक अवतारिक जाणी। पाहून आपुले नयनी विद्यानंद त्या नमस्कारी॥५४॥ सदाशिवाने प्रत्यक्ष दर्शन दिले । म्हणून आनंद पूर्ण। होवूनी आले परतून। काशीक्षेत्रा जाण पां॥५५। तेथे महिमा वाढे फार। किर्ती सुगंध पसरे चौफेर। दर्शनिच्छूचा लोटला पूर। म्हणूनी तया त्रास होती॥५६॥ मुक्तहोण्या त्रासातूनी। निघाले हरिद्वारालागूनी। गुपारुपे एके दिनी। कोणा न दिसती जाताना॥५७॥ निघाले पायी फिरत। तिर्थयात्रा करित करिता ब्रम्हानंद जीवनमुक्त। महासमर्थ सिध्दयोगी॥५८॥ ब्रम्हानंद गर्भज्ञानी । म्हणूनी हिंडती रात्रंदिनी। तिर्थास करण्या पावनी। निसंशय जाण पां॥५९॥ उत्थान पावे ऐसी शंका। तिर्थी स्नान केले जर का। मुक्त होतो मनुष्य देखा। तिर्थे पावन कैसे होती॥६०॥ शंका निरसन ऐका आता। मनुष्ये तिर्थी स्नान करिता। पाप मुक्त होतो तत्वता। परी पापे राही तिर्थात॥६१॥ त्याने तिर्थे अशुध्द होती। ब्रम्हनिष्ठांची वाट पाहती। पाप क्षालणाकरिता निश्चिती। म्हणूनी तिर्थास जाती ब्रम्हानंद॥६२॥ ते तिर्थक्षेत्री गेले असता। ब्रम्हतेजे पापे धुतात। पुनरपी पापनाशना करीता। पापी मानवी जनांचे ॥६३॥ ब्रम्हनिष्ठ देती ब्रम्हशक्ती। तेथे तिर्थ पावन होती। पापी जनांचेपाप नाशिती। ऐसे महिमान तिर्थाटनाच ॥६४॥ दुसरी शंका दिसे बरवी। साधकांनी तिर्थयात्रा का करावी । तर सद्‌गुरूची प्राप्ती करावी । तिर्थयात्रा करूनिया ॥६५॥ जया गुरुलाभे निश्चीयेसी॥ तयाने ''गुरुगंगा गुरु काशी, सकल तिर्थे पायापासी''। ऐसे धरून चालावे॥६६। तया ना तिर्थाचे प्रयोजन। गुरु निर्मळ भागिरथी जाण। गुरुसेवा करूनी



शिष्यांनी। तिर्थाची फले भोगावी॥६७॥ यासीपाही पुढील उत्तर। सावध चित्ते ऐकावे॥६८॥ तिर्थ यात्रा केल्या पामरजनी। ईश्वर अस्तीत्व बिंबे अंतरकरणी । अप्रत्यक्ष संतभेटी जाणी । होती तया जनासी॥६९॥ म्हणोनी तिर्थयात्रा कराव्या। तेणेची उध्दार जडजीवा । तरुनी जातील या भवा। संशय येथे न धरावा॥७०॥ श्री ब्रम्हानंद चरित्र ग्रंथ। आनंद देवो भक्तांप्रत हाची ठेवोनी हृदयी हेत। चरित्र लेखन करितसे॥७१॥ श्री शामसुंदर रचित। ब्रम्हानंद चरित्र सार ग्रंथ। वाचिता पुरवो श्रीदत्ता । मनोरथ भक्तांचे ॥७२॥

॥इति श्री ब्रम्हानंद चरित्र सार ग्रंथ॥

प्रथमोध्याय समाप्त

ब्रम्हार्पन मस्तु

दत्तात्रमय महाराज की जय, पार्वतीपाते हरहर महादेव

Scanned by TapScanner

# अध्याय दुसरा

श्रीगणेशायनमः। श्रीदत्तात्रेयनमः॥ लक्ष्मीवल्लभा वैकुंठवासी। वस्त्रे पुरविशी द्रौपदीसी। मजविषयी न्यूनता तुजसी। कैसी पडली दिनबंधो॥१॥ लाक्षागृही जळता पडूसूत। धावोनी गेलासी त्वरित। मग मज अनाथाप्रत। का गा उपेक्षी रमावरा॥२॥ तुझे चरणी ज्याचा हेत। त्याजसी का केले फजित। तुज हे कैसे पाहावत। पांडुरंगा परेशा॥३॥ पाही मज दिनाकडे काय पडले तुज कोडे। पुरविण्या मम साकडे। क्षण न लागे कृष्णराया॥४॥ मागील अध्यायी केले कथन। महाराज निघाले हरिद्वारालागुन। पुढील गोष्टीसी अवधान। द्यावे श्रोते सुजन हो ॥५॥ हल्लीचे काही मतप्रचार। गुरू करण्याची काय जरूर। गुरु वेदांत शिकवी साचार। तो आम्हा पुस्तकी मिळतसे॥५॥ सगुण उपासनेने भगवंता। प्राप्त केले तत्वता। हे जरी सत्य असता। तरी नामदेवा गुरू करणे आले की॥६॥ साक्षात विठ्ठल त्यासी प्रसन्न । तयाचे करी सेवी अन्न । तरी कच्चेपणाचे खापर फोडोन । हिरमोढ केला गोरोबाने॥७॥ नामदेवे बोले पंढरीनाथा। तुची सांगी देवा आता। तू मजसंगे जेवित असता। मी कच्चा कैसा राहिलो॥८॥ गोरोबाने थापटी मारून। कथिले सर्व संताकारण। नामदेव आहे कच्चा जाण। अपमान केला मंडळीत॥९॥ भगवंत म्हणे नामदेवा। तू मज आवडतो बरवा। परी गुरुशी शरण जावा। तरी तू पक्का होशील॥१०॥ नामदेव म्हणे भगवंता गुरूची मज काय आवश्यकता। तुम्ही माझे संगती नित्य



असता। गुरू काय देई आणखी॥११॥ नामदेवासी बोले श्रीपती । गुरुविण नाही गती। रामकृष्ण अवतारी। मजप्रती। गुरू करणे आले की॥१२॥ तयी शरण गेला विसोबा खेचरास। म्हणे उपदेश द्यावा मज पामरास। धरूनी आलो चरणी आस। नामदेव आवडता विठ्ठलाचा॥१३॥ यालागी साधू जयांनी। तैसेचि इतर मनुष्यांनी। गुरु करावा श्रोतेजनी। तरीच तरणोपाय जाणावा॥१४॥ परी ब्रम्हानंद महाज्ञानी असती पूर्ण गर्भज्ञानी। गेले हरिद्वारालागुनी। गुरू करण्या कासया॥१५॥ याचे असती हेचि कारण। रामकृष्ण अवतारी भगवंत जाण। वशिष्ठ सांदिपनीस गेले शरण। कित्ता त्यांनी गिरविला॥१६॥ ऐसेच ब्रम्हानंद स्वामी असोनी पूर्ण गर्भज्ञानी। शरण गेले गुरुलागुनी मार्ग जाणोनी पूर्वीचा॥१७॥ तेविषयीची सांगतो कथा। अवधान द्यावे श्रोते आता। पायी करीत तिर्थयात्रा। हरिद्वारा पोहचले॥१८॥ धरणीवर पाऊल पडता । तिला वाटतसे धन्यता । तिर्थामध्ये स्नान करीता । पवित्र होती तिर्थक्षेत्रे ॥१९॥ तिर्थामध्ये पायी फिरता। तिर्थक्षेत्रे पवित्र करिता। पोहोचले हरिद्वाराप्रत । ब्रम्हानंद बालक॥२०॥ तयी केशवानंद स्वामींनी अंतरी पाहिले शोधुनी। अवतारी पुरुष दिक्षेलागुनी। येत असे आपणाकडे॥२१॥ आता करित असे गंगेचे स्नान। म्हणजे जारे जारे शिष्यालागुन। आणा ब्रम्हानंद बोलावून। मजकडे जाण पां॥२२॥ शिष्य येई बोलावण्या पाही। ब्रम्हानंदा उडी घेई। गंगेच्या अथांग डोही। बुडू लागलेपाण्यात॥२३॥ हे कृत्य केले जाणण्यालागी। कोण वाचवी मज वेगी। उडी घेवूनी सवेगी। प्राण संकटी घालून॥२४॥ म्हणती धावा धावा कोणीतरी।

Scanned by TapScanner

# अध्याय तिसरा

॥श्रीगणेशायन:॥ रावणांतक रामराया। रघुकुलभुषणा करूणालया। सितापते करा दया। या अजान लेकरावर॥१॥ तुम्ही जेव्हा कृपा केलीत । तेंव्हा वानरा शक्ती आली। लंकेची करूनी होळी। देव सकळ सोडविले॥२॥ मग मज दीन अनाथा। कां गा उपेक्षी अयोध्यानाथा। कृपा करूनी सत्वरता। सावरी घडी विस्कटलेली॥३॥ मी हीन दीन अती। धनाचा अभाव निश्चिती। मग कैची घडावी भक्ती। यदुराया मायबापा॥४॥ पोटाची चिंता सदोदीत। मम चित्तासी भासत । कोणी हात देत । मजकडे प्रेमाचा॥५॥ जन सुखाचे सोबती। निर्वाणीचा तु श्रीपती। म्हणूनी वाहतो तुजप्रती। कृपा करी मजवरी॥६॥ दरिद्री सुदामा तुजप्रत । मुष्ठी पोहे अर्पित। म्हणूनी त्यासी केले भाग्यवंत । घटकेत एका वासुदेवा॥७॥ वाहतो तुला करूणा वचने। सहाय्य करी मजकारणे॥ शरणांगतासी तारणेला ब्रिद तुझे नारायणा॥८॥ मागिल अध्यायी कथन केले। स्वामी काशी क्षेत्री आले तिर्थी। दोन वर्षे राही ब्रम्हमुर्ती। महात्मा पुरुषांचे दर्शन होती। संथा देती साधकांना॥९॥ पुनरपी करित भ्रमणा॥ आले नरसिंगपूर ग्रामा। सोमेशेखर नामे जाणा लक्ष्मीपुत्र वसतसे॥१०॥ वृत्ती तयाची भाविक फार। करूनी प्रेमे आदर सत्कार । हरिहर मंदिरी नेले थोर। ब्रम्हानंदा महाराजा॥११॥ दररोज येई सेवे पुत्र कन्या कांता सवे। सेवा करी मनोभावे । निष्ठा जडली चरणावरी॥१२॥ एके दिनी कन्या नर्मदा। फराळ आणि ब्रम्हानंदा।



तिजसी म्हणे स्वानंदा। सुन मैया मेरी वाणी॥१३॥ जब तक हम दक्षणा नही लेते। तब तक फराल नही करते। नर्मदा विचारी तयाते। क्या दक्षणा चाहिये।१४॥ बोले ब्रम्हानंद वाणी। देना तेरे नाकमेकी नथनी। ऐसे ऐकुनी श्रवणी। नथ दिली काढून॥१५॥ किंमत तीची तिन हजार। काढून ठेवि स्वामी समोर। म्हणे जोडोनी दोन्ही कर। अब फराळ किजिये॥१६॥ नथ घेऊन हातात। नर्मदित फेकूनी देत। मग फराळ करी आनंदात। ब्रम्हानंद योगिराज॥१७॥ आणि करी मधुरोत्तर। नर्मदा माईची नथ साचार। नर्मदामाईत अर्पण येर। काही न दुजे घडलेसे॥१८॥ फराळ आटोपता पाही। नमस्कार करूण चरण द्वयी। निघोन गेली नर्मदाबाई । घराकडे आपल्या॥१९॥ जावोन घरी पतीस। भोजन वाढी सुग्रास नथनी न दिसता नाकास। प्रश्न तियेसी करीतसे॥२०॥ नथनी का ठेवी काढून । तव ती उत्तर देई तयालागुन। महाराज नथनी दिल्यावाचून। फराळ न घेईच॥२१॥ म्हणोनी नथ काढून दिली। ऐकता कृपणा तळमळ लागली । पुढ्यातील समोरील ताटे फेकिली। करू लागला दुरुत्तोर॥२२॥ तुम्हा बायका नाही अक्कल। कोणी काही जरी मागेल। विचार न करता द्याल। पती आज्ञा न घेता॥२३॥ किती केला गाढवपणा। तिने हजारांनी बुडलोना। पतिचे ऐकूनी वचना। वाईट वाटले नर्मदेस॥२४॥ म्हणू लागली पतीस। की हा लोभ तुम्हास। अती लोभे जाती नरकास। ऐसे भगवंत वदले ना॥२५॥ काम क्रोध लोभ सारे। नरकाची आहेत द्वारे। तिनही आपणा जवळी स्थिरे। गती काय पुढे जी॥२६॥ ऐकताची लोभी चांडाळ। रागे बोली वाचाळ। घराचे करोनी वाटोळ। मज

Scanned by TapScanner

वेदान्त शिकविसी॥२७॥ तो योगी ना महासंत। तयाचा द्रव्यावरी कां हेत। धिक्कार त्याचे वैराग्यप्रत। ऐसे उन्मत्तपणे बोलीला॥२८॥ ऐकूनी पतिचे वचना। नर्मदा म्हणे नारायणा। कां गा बांधी पदरी कृपणा। दीनबंधो दयाळा॥२८॥ मग म्हणे अहो भ्रतारा। भाग्य उदेते आपुले घरा। सत्पात्री दान गेले पहा जरा। तेणे मोक्ष प्राप्त होय॥३०॥ सत्पात्री दिले दान। मोक्ष परमात्मा आपुला जाण। ऐसेचि आहे विधान। चित्ती आपुल्या जाणा हो॥३१॥ काही तरी करा विचार। बळी राजा महाथोर। पृथ्वी दान देवूनी परमेश्‍वर। द्वारपाळ द्वारी केला॥३२॥ सत्पात्री गेलेदान म्हणून। कांतेस आनंद परिपूर्ण। अनंत जन्म पुण्य करून। सत्पात्री दान जात असे॥३३॥ आडवा आला शुकाचार्य गुरू। झारीत घातला दर्भ थोरू। तेणेची आंधळा झाला येरू। सत्कर्मी विघ्न म्हणोनिया॥३४॥ आडवा आला म्हणोनी फोडीयेला डोळा॥ ऐसी येती अवकळा। दानास बाध्य झाल्याने॥३५॥ तिन पावलाचे सोडी उदक। म्हणोनी परमात्मा राही देख। द्वारपाल होवूनी चोख। द्वारी त्या बळीच्या॥३६॥ बळीचे द्वारी अजुनी तिष्ठत। तुका म्हणे माता धन्य त्याची। ऐसे तुकाराम बोलिला। म्हणुनी पाहीजे पुण्यसंचय केला। तेणे होतो भगवंता आपुला। धन्य तो बळी जिवात्मा॥३७॥ असो पुढे पाही निरूपण। कांतेस काय बोली कृपण। तुला एकदा दिले सांगुन । वेदांत ना शिकवी मजलागी॥३८॥ जावे तुवा येथोनी। यावे घेवोनी नथनी। ना तर प्राण दे नर्मदालागोनी। मुख नको दावू मज॥३९॥ ऐकोनि पतीचे वचन। नारिसी आनंद परिपूर्ण। पती आज्ञा मानुनी प्रमाण। प्राण द्याया सिध्द झाली॥४०॥ पतीस



करूनी नमस्कार। शिर ठेविले चरणावर। चरण धुली घेवोनी सत्वर। प्राण द्याया निघाली॥४१॥ इकडे ब्रम्हानंद माउली। समाधीतून उत्थान झाली। तयानी मात सर्व जाणीली। जी का झाली नर्मदिघरी॥४२॥ बाई निघाली जीव द्याया। बाहेर येवोनी पाही तया। दिसती दहा विस पुरूष बाया। हात जोडूनी विनविती॥४३॥ बाई नका देवू आपुला प्राण। नथीची भरपाई आम्ही करून। देऊ अवघे मिळोनी जन। चिंता तुम्ही करू नका॥४४॥ पतीची घालू समजूत। आत्महत्या महापातक । तैसेची देह जाईल अमोलीक। पुन्हा न मिळणारा॥४५॥ नरदेह उत्तम पूर्ण। त्यातची परमपद प्राप्त जाण। नाश करता तयालागुन। अधोगती सर्वदा॥४६॥ महात्म्याची होईल अपकीर्ती। नथ दिली म्हणुनी म्हणता। देह अर्पिला नर्मदिप्रती। सदाचारी नारीने॥४७॥ महाराज जाती तया स्थाना। कृपणही आला त्वरे जाणा। पतीकी आज्ञा झुठ न करना। बाईस बोलले महाराज॥४८॥ स्वामींची ऐकुनी वाणी। स्त्रियांचे हाता झटका देवुनी। वंदून महाराजाचे चरणी। घेई उडी नर्मदित॥४९॥ पाच हजारका नुकसान हुआ भयी। हमारी औरत भी गयी। दौडो । दौडो जी कोई। ऐसा बोले कृपण॥५०॥ काही मंडळी झाली तयार। परी नदीस पुर भयंकर। म्हणूनी करी विचार। धैर्य त्यांना होईना॥५१॥ महाराज बोले घाबरूनका। नदीत उडी टाकू नका। नर्मदा गेली नर्मदिजवळीका। नथनी अपुली आणावया॥५२॥ येईल ती परतुन। ऐसे स्वामींचे भाषण ऐकुन। मंडळी आणि तो कृपण। आश्‍चर्यचकित जाहले॥५३॥ नर्मदाबाईंची नथ। पाण्यात गेली कैसी देख। ऐसा विचार करीत

Scanned by TapScanner

लोक। पाहू लागले एकमेका॥५४॥ स्वामी बोले जनालागुन। या बाईने नथ दिली मज दान। ती मी सांभाळण्याकारण। नर्मदामाईकडे दिली॥५५॥ तव तो बोलला एक पुरुष। स्वामींनी नथ अर्पिली नदीस। हे मी पाहीले प्रत्यक्ष। आपुल्या या नेत्रांनी॥५६॥ तव तो कृपण बोलीला पाही। मेरी औरत अब मर गई। अभी उपर नही आयेगी। अब मैं क्या करूँ॥५७॥ महाराज बोले तयासी। मेजवानी देवून तव पत्नीसी। ओटी अहेर करूनी तिसी। तुजकडे पाठवितो॥५८॥ चमत्कार हा पहाण्याकरीता। लाखो लोकांची दाटी तत्वता। नर्मदा आली अवचिता। पाण्यातून बाहेर॥५९॥ भरदार जरीची चोळी। मळवट चर्चिला भाळी। नाकात नथ झळाळी। लक्षावधी रुपयांची॥६०॥ ओटीत दिसे नारळ। आश्चर्य करिती सकळ। स्तुती सुमनांची वाही माळ। ब्रम्हानंदांचे चरणावरी॥६१॥ कृपण बोले हे प्रिये। अग तू लवकर वर ये। नथ ही कोणाची सखये। पाहू दे मज येधवा॥६२॥ तव ती नर्मदा आली वरी। महाराजास नमस्कारी। नयनास आणूनी वारी। सदगद कंठे बोलीली॥६३॥ तुम्ही तात माझे असुनी। नर्मदेनी तुमचे आज्ञेनी। केली मज मेजवाणी। ओटी भरूनी धाडीले॥६४॥ आशिर्वाद दिला वरी। सुपुत्र येईल तुझे उदरी। नथ कपडे देवूनी भारी। बाळविले मजलागी॥६५॥ आपुले कृपेनी मी धन्य। धन दौलतीची इच्छा नसून। कृपाप्रसादाची वांच्छा जाण। ती माझी पूर्ण करा॥६६॥ तथास्तू म्हणूनी आशिर्वाद। देई स्वामी ब्रम्हानंद। तो कृपण घाली वाद। नथ आणिली बेगडाची॥६७॥ कृपणाची जाणा स्थिती। आजचा दिन सुदिन निश्चिती। येवून तत्काळ प्रचिती। धनाचा हव्यास



जाईना॥६८॥ महात्मा पुरुषाच्या कृपेने। देवलोकी घडले जाणे। बोळवण करूनी नर्मदेने। पाठविले स्त्रियेस॥६९॥ जीवंत आली नदीतून। आशिर्वादरुपी प्रसाद घेऊन। धन्य धन्य सत्पात्री दान। कृतार्थ केले नर्मदेस॥७०॥ परी कृपणासी त्याचे काय। धनास्तव करी हायहाय। सन्मार्गाने कधी ना जाय। भलते सलते करी धनासाठी॥७१॥ पापपुण्याची नाही चाड। धन मिळविता न धरी भिड। परमार्थी खर्चिता तया जड। ऐसा दुराचारी अधम तो॥७२॥ असो आपणा याचे ना प्रयोजन। आपणा कथेसी कारण। कृपण करी बाईस प्रश्न। ही बेगडी नथ कोणाची॥७३॥ खरी नथ गमाविली। ही तू कोणाची आणिली। ऐकता तयाचे बोली। राग स्त्रियेस विशेष॥७४॥ एक नथ नाकिची। दुसरी काढी कमरेची। फेकीयेली पति पुढे साची। घ्या नथ तुमची म्हणे॥७५॥ नथ उचलून घेतली। परीक्षा तिची पुरी केली। ही तर नथ आपली। आहे यात शंका नाही॥७६॥ आपली नथ मिळाली। लक्षावधीची दुसरी आली। खरोखरी साक्षात्कारी माऊली। चमत्कार नोहे सामान्य॥७७॥ तरी अजूनी मागावे काही । वैराग्याचा धिक्कार पाही। मागे केला लवलाही। क्षमा त्याची मागावी॥७८॥ ऐसा ऐकूनी तयाचा हेतू। उडी घेई नर्मदेत। योगीराज ब्रम्हानंद। अदृष्य व्हाया कारणे॥७९॥ ऐसी प्रचिती येई कृपणासी। तरी खरी खोटी पाहण्यासी। नथ नेई जबलपुरासी। सराफासी दाखविली॥८०॥ किंमत तिची काय ठरते। विचारी तो सराफासे। लोभ जडीला तयाते। सत्य किंमत बोलेना॥८१॥ किंमत म्हणे ऐंसी हजार। कृपण मुढासी काय कळणार। तेचि सत्य मानी साचार। महानष्ट

अधमाधम॥८२॥ उलटे ठेवियेले घागरी। तिच्यात टाकीयेले वारी। तरी ती कदाची न भरणारी। तैसाची कृपण जाणावा॥८३॥ बिज पेरीले खडकावरी। उगवणार का ते कधीतरी। मुळचाच मुढमती, दुराचारी। काय जाणी योग्यासी॥८४॥ ब्रम्हानंद अवतारी पुरुष। कळो येती सुज्ञ लोकास। काय त्याचे लोभी कृपणास। पापे भोगण्या येती महिवरा॥८५॥ ब्रम्हानंद चरित्र सुरस पूर्ण। ऐकता पढता घडे पुण्य। पुढील चरित्रा सावधान। व्हावे श्रोते सकळीक॥८६॥ श्री शामसुंदर रचित। ब्रम्हानंद चरित्र सार ग्रंथाभक्ता देवो कल्याणप्रत। हिच मम प्रार्थना॥८७॥

॥इति श्री ब्रम्हानंद चरित्र सार ग्रंथ॥

तृतियोध्याय समाप्त

दत्रात्रय महाराज की जय।



# अध्याय चवथा

श्रीगणेशायनम:॥ जयजयाजी राधवा रामा। जयजयाजी मेघश्यामा। जयजयाजी वैकुंठधामा। परात्परा जगत्पते॥१॥ जयजयाजी कंसांतका। जयजयाजी रावनांतवण। जयजयाजी भवतारका। संकट नाशना म्हणती तुज॥२॥ जयजयाजी रामराया। दयासागरा करूणालया। सितापते करा दया। या अजान लेकरावर॥३॥ माझे संकटा का न वारी। किती अंत पाहसी श्रीहरी। धाव दाव रे मुरारी। सोडवी मज यातुनी॥४॥ पाप्यावरी प्रेम अमीत। असते देवा तुमचे सत्य। पापी जनांनी तुज प्रत। महत्व आणिले भुवरी॥५॥ वालया तरला तुझीया नामे। गणिका गेली स्वर्ग भुवने। अहिल्या तरली पादकणे। मजकडे दृष्टी का न करी॥६॥ मागिल अध्यायी कथन। कृपणाचा हेतू जाणून। नदित उडी घेऊन। गुप्त झाले महाराज। तथनंदर ब्रम्हानंद स्वामी पायतळी फिरोनी। आले दक्षिण हिंदुस्थानालागुनी। तिर्थे बहुत आरंभिली॥८॥ देहु आळंदी पंढरपूर। नाशिक पैठण त्र्यंबकेश्वर। वैजनाथ परळी माहूर। औंढ्या नागनाथ अंबा जोगाईची॥९॥ भगवान बार्शी आटोपून। आले गाणगापुरालागुन। राही तिन दिवस पूर्ण। तया पवित्र स्थानासी॥१०॥ तेथे नृसिंह सरस्वतीचे। म्हणजे गुरु दत्ताचे। साक्षात दर्शन झाले साचे। गुरु स्वामी सांगितले॥११॥ तुम्ही माझाची अवतार। जायी कृष्णातीरावर राहुनी नरसोबाची वाडी आणि औदुंबर। सकाम निष्काम भक्ता तारावे॥१२॥ अधिकार परत्वे फलप्राप्ती। धावी

Scanned by TapScanner

तुम्ही तयाप्रती। ऐसे बोलता नृसिंह सरस्वती। आनंद स्वामीस विशेष पै॥१३॥ आज्ञा मानोनी प्रमाण। ब्रम्हानंद निघाले तेथोन। आले कोल्हापुरालागुन। दर्शन घेतले लक्ष्मीचे॥१४॥ लक्ष्मीने देवूनी साक्षात्कार। कथिले तुम्ही दत्त अवतार। राहूनी कृष्णतीरावर। भक्तजनास तारावे॥१५॥ तेथोनी फिरत फिरत । आले शिराळ नामे ग्रामात। तेथे अधिष्ठानी वसत। गोरखनाथ नाथपंथी॥१६॥ भेटी गोरखनाथा झाली। तयांनी अंतरीची मात कथिली। वस्ती बद्रिपुरा आपुली। कृष्णातीरी होईल॥१७॥ तेथोनी जाल कौंडव्यपुरी। म्हणजे कुंडलगावचे डोंगरावरी। तेथे शिष्य भक्तगण। कृतार्थ करी। काही दिवस राहून॥१८॥ शेवटी भिलवडी नजिकचे स्टेशनाजवळी साचे। गाव बुरुंगवाडी नावाचे। समाधी तेथे होईल॥१९॥ ऐशारीती भेटीत। पुढील वृत्तांत सांगत। नाथपंथी गोरखनाथ। ब्रम्हानंद स्वामीस॥२०॥ तेथोनी दुधोडीस आले। तिन रात्री तेथे राहीले। एक दिवशी प्रगटले। दोन दिवस गुप्तरिती॥२१॥ तेथून दर्ग्यातून सगुणरुप धरून। गौरीसाहेब वर येवून। दर्शन देई ब्रम्हानंदा॥२२॥ ब्रम्हानंद होते एकांती। गौरीसाहेब बोले तयाप्रती। आप यहाँसे जावे सिघ्रगती। जादा दिन ठहरना नही॥२३॥ महात्म्य यही का हमारा। लय हो जायेगा सारा। आप जाईये बद्रीपुरा। निवास करना वहाँ पे॥२४॥ अच्छा है म्हणुनी। दत्तात्रय, देवी गोरखमुनी। यांनी मागे सांगितल्यावरूनी। स्वामी बद्रीपुरा निघाले॥२५॥ दुधोडीवरून निघोन। कृष्णातीरी आले बोरगावालागुन। मारुतीचे मंदिरी जावून। स्वस्थ मुद्रे बैसिले॥२६॥ गावातील मंडळींनी। पाहिले त्यांना अवलोकुनी। सिध्द पुरुष



जावूनी। हात जोडी निष्ठेने॥२७॥ परी स्वामी न करी भाषण। केले मारुती रायाचे अवलोकन। तेथे न दिसे चैतन्य। म्हणोनी निघाले तेथोनी॥२८॥ गेले जोतीबाचे मंदिरी। मारुतीरायाचे चैतन्य खरोखरी। येथे नसून बेहे नगरी आहे ऐसे जोतिबा म्हणे॥२९॥ येथोनी बहे तीन मैल। ऐसे ऐकता तत्काळ। हातातील फुलांची माळ। जोतिबाचे गळा घातली ॥३०॥ आणि मुखातुनी काढी बोल। जोवर मंदिर चांगले राहील। मनोभावे गावकरी भजतील । तोवरी सौख्य जाणावे॥३१॥ अधिक न्यून घडता । अधर्माचे बंड तत्वता। मानुनी मतमतांतरता। हानी पावेल सर्वही॥३२॥ काढूनी ऐस उद्‌गार। पडले तेथोनी बाहेर। बहे ग्रामी सत्वर। येवोनिया पोहचले॥३३॥ तेथे कृष्णेच्या पात्रात। राममंदिर स्थापिले असत। रामलिंग तयाप्रत । म्हणताती जाण पां॥३४॥ राममंदिरी येवोन। मूर्ती करी अवलोकन। तेथेही न दिसे चैतन्य। म्हणोनी मारुती मंदिरी निघाले॥३५॥ येता हनुमान मंदिरी। ब्रम्हानंदास धरून करी। प्रमोदे वाचे उच्चारी। मारुतीराय साक्षात॥३६॥ या कलीयुगामाझारी राखरांगोळी झाली सारी। न जाणती जन थोरी। ब्रम्हचर्याची ब्रम्हनंदा॥३७॥ तुम्ही आम्ही म्हणोनी। ब्रम्हाचारी असोनी। तपोबले निष्काम बुध्दीनी। मुढजना तारावे॥३८॥ तू आता तपश्चर्या करी। जावूनिया बद्रिपुरी। कृष्णामायी व्यवस्था सारी। करतील आपुली की॥३९॥ मी तेची करतो आहे। ऐसे बोलोनिया पाहे। अदृश्य होई लवलाहे। मारुतीराय रामभक्त॥४०॥ येवोनी बोरगावास । बैसिले कृष्णामायीचे तिरास॥ अखंडता तिन रात्रंदिवस। तपश्र्या करीतसे॥४१॥ पाऊस ते वर्षे

Scanned by TapScanner

जोरदार। खंड न त्याल तिळभर। ऐसी असून साचार। तपश्चर्या चालली॥४२॥ जवळ लोटा भगवतगीता। छत्री घेवूनी वरूता। तपश्चर्या चालली तत्वता। तो एक सोनार पातला॥४३॥ सोनार बोले स्वामीया। साधुस छत्री कासया। ती संसारीका उपयोगिया। आमचे सारिखे जनास॥४४॥ छत्री दिली सोनारा। परी धोतर आसन सदरा। यासी थेंब न लागे जरा। पावसात कोरडे राहीले॥४५॥ नदिस पूर आला। पलीकडील घाट वाहवला। परी चमत्कार विशेष घडला। स्वामी जवळ न येई॥४६॥ पाहूनी ऐसे चमत्कारा। स्तवूनी करी नमस्कारा। जनसमुदाय जमलेला सारा। ब्रम्हानंद स्वामीस॥४७॥ सिध्द कोटीतील पुरुष। आहे न धरावे संशयास। तव तो पुढे येई एक माणूस। तुकाराम माने नाव पै॥४८॥ लोकांस नेवूनी बाजूला। तयासी सांगू लागला। दिसतो हा ढोंगी भला। सोंगासी ना भुलावे॥४९॥ ढोंगी लोक पोटात उष्ण। वनस्पती घेती खावून। पाण्यात राहती बैसून। लोकास वाटती चमत्कार॥५०॥ फसविती आपणा सर्वतोपरी। म्हणूनी न जावे ऐसियाचे करी। सावध असावे निर्धारी। ऐसा लोकापासून॥५१॥ ऐसे म्हणूनी नदित गेला। स्नान करूनी भरी घागरीला। सत्वर येऊनी घराला। वस्त्र परिधान करितसे॥५२॥ बैसोनी गंध उगाळण्याला। घागरीत पाही जलाला। एकही थेंब न पडे दृष्टीला। रागे विचारी मुलास॥५३॥ आतची आणिली घागर। काय जाहले यातील निर। मुले देती उत्तर। आम्ही न शिवलो तयासी॥५४॥ ऐकोनी तयांचे उत्तर। आश्चर्य वाटे तया फार। पुन्हा उचलोनी घागर। पाणीयासी जात असे॥५५॥ घागरीत घेवोनी पाणी। येत



असे पुन्हा परतोनी। ढोंगी काय करतो म्हणूनी पाहण्या स्वामीस येतसे॥५६॥ तयासी स्वामी म्हणतात। ढोंगी साधू पोटात। उष्ण वनस्पती खातात। आणि बैसती जलांतरी॥५७॥ परी संसारातील सोंगी माणसे। रिकामी घागर नेतसे॥ आणि दुसऱ्यासी। दाटवितसे। पाणी काय झाले म्हणूनी॥५८॥ परी मला द्यावे थोडे पाणी। मानेरावाचे आले मनी। म्हणूनी घागर उतरवोनी। पाणी पाही तयात॥५९॥ परी घागरीत पाणी नाही। स्वामी बळे रागवून पाही। म्हणू लागले त्यासही। खोटे कासया बोलला॥६०॥ आपणच सोंगी असता। दुसऱ्यास ढोंगी म्हणता। घागरीत पाणी नसता। आम्हास चाळवी निरर्थक॥६१॥ पाहूनी बोल चमत्कार। मानेस वाटले आश्चर्य फार। दोन वेळा आणूनी घागर। पाणी काय होतसे॥६२॥ जाणूनी महात्मा पुरुष। नमस्कार करूनी सद्गुरुस। लागला चरणी लोळावयास। स्वामी अभय देतसे॥६३॥ स्वामी म्हणती तयाला। जरी तू मज निंदीला। त्याची माफी आहे तुजला। पूर्व अवतारी तू भक्त माझा॥६४॥ केले तुझे कल्याण। ऐकूनी ऐसे वचन। मानेराव स्थिर होवून। भक्त तयांचा झाला पै॥६५॥ पुढे एकदा गोष्ट खरी । घडली मानेच्या शेता भितरी। हरभऱ्यांची भरणी भोरी। चालली होती जाण पां॥६६॥ संध्याकाळी घरी येता। दोन चोर झाले विचारता। राखणदार कोण शेता । आहे तुमचे मानेराव॥६७॥ माने देई तया उत्तर। ब्रम्हानंद राखणदार। माझे शेती साचार। आहे आहे शंका नको॥६८॥ चोर म्हणती आपसात। असा काय देवाबसला शंखत। पोहचले जावून शेतात। नवल त्यांनी पाहिले॥६९॥ महाराज बैसले घोड्यावर। हातात नग्न

Scanned by TapScanner

तलवार। पाठीस लागले साचार। त्या दोन चोरांच्या॥७०॥ पळाले चोर तेथून। आले मानेच्या घरालागुन। वृत्तांत सांगितला परिपूर्ण। जो का घडला शेतात॥७१॥ आपण ऐकतो पुराणी। नाथा घरी वाही पाणी। जनाईची धुतली धुनी। दळण दळी भगवंत॥७२॥ घोडे धुतले अर्जुनाचे। तैसेची कलीयुगी साचे। कामे करितो भक्तांचे। देव सर्वस्वी जाण पां॥७३॥ परी भक्त पाहिजे निष्ठावंत। अंतरी शुध्द अत्यंत। तरीच धावतो भगवंत। कामे करण्या भक्तांची॥७४॥ असो मानेराव प्रतिदिवशी। नेई दूध महाराजाशी। तनमन धनानी भक्तीसी। करूनी चरणी देह अर्पिला॥७५॥ तयाची समाधी कृष्णातीरी। आहे बोरगावचे मठाभितरी। सेवा करूनी साचारी। भक्त झाला संसारा॥७६॥ हल्ली मुलगा तयाचा झाला दास चरणाचा। सेवा करीतो साचा। ब्रम्हानंद स्वामींची॥७७॥ तैसीच सर्वांनी तनमनधन अर्पूनी। सद्गुरू नाथाचे चरणी। सेवा तयांची करावी॥७८॥ तरीच तो पावेल मनोकामना पुरवूनी सकल। भवसागरातूनी तारील। परी निष्ठा पाहीजे॥७९॥ ब्रम्हानंद महामुनी। तारक आपुल्या भक्तालागुनी चरित्र त्यांचे ऐकूनी श्रवणी। पावन व्हावे श्रोते हो॥८०॥ श्री शामसुंदर रचित। ब्रम्हानंद चरित्र सार ग्रंथ। असा दावो सत्यय। हिचचरणी प्रार्थना॥८१॥

॥इति श्री ब्रम्हानंद चरित्र सार ग्रंथ॥

चतुर्थोध्याय समाप्त

श्री गुरुदेव समर्थ



## अध्याय पाचवा

॥श्रीगणेशायनमः ॥ श्री गुरुभ्योनमः। जय जय सच्चीदानंदा श्रीहरी ।कृपा करावी लवकरी। तुम्ही पदनताचे वरी। कधी कठोर ना होशी गा ॥१॥ तू सागर करूणेचा। कल्पतरू भक्तांचा तू माहेर दीन जनांचा। भक्तासी तारिता तूची गा॥२॥ ऐसा तुझा महीमा अगाध। संतगाती सदोदीत। ठेवी डोई वरदहस्त। दासाचिया पुरूषोत्तमा ॥३॥ मागील अध्यायी कथन। मानेराव भक्तालागुन चरणी ठाव देऊन। भवबंधन सोडविले ब्रम्हानंद राहिले बोरगावास। शांत स्थिती तया आवडत। परी लोक येवूनी सदोदीत। त्रास तया देतसे॥४॥ बोलण्याकरीता हट्ट धरी। महाराज म्हणती त्यावरी। संध्याकाळचे अवसरी। यावे पाच ते सात पर्यंत॥५॥ मध्यंतरी न द्यावा त्रास। ऐसी ताकीद दिली त्यास। तरी तात्यासाहेब चिटणवीस त्रास देई मध्यंतरी॥६॥ ते असती आंधळे। म्हणती महाराज जर सत्य असले। तर देतील मला डोळे। पाच सात मिनिटे तरी॥७॥ सोंगी ढोंगी पोटभरे। समजू आपुले अंतरे। ऐसा निश्चय दृढतरे। करूनी एकदा पातला॥८॥ परिक्षा स्वामींची घेण्याकरिता। येता झाला काठी टेकीता। स्वामीपुढे न बोलता। बैसला अधोवदन जाण पां॥९॥ स्वामी बोले तयास। अहो आंधळे सुरदास। आम्ही ढोंगी सोंगी आहेस। सत्य महाराजाकडे जावे जी॥१०॥ तयाचे कृपा प्रसादे बरवे। डोळे उघडूनिया घ्यावे।

Scanned by TapScanner

तयाचेच मुखावलोकन करावे। आम्हापाशी काय मिळे।।११।। ऐसे म्हणता चिटणविसांनी। स्वामींचे पाय घट्ट धरूनी। म्हणती तुम्ही सर्वज्ञ अंतज्ञानी। सोडूनी चरण कोठे जाऊ।।१२।। कृपा करूनी आपणची। मुख दाखवावे आपलेची। हिच आस मनिची। पुरवावी सद्‌गुरूनाथा।।१३।। ऐसे बोल कळकळीचे पाहुनी पाणी लोचनाचे। हृदय द्रवले स्वामीचे। नेत्र पुसले स्वहस्ते।।१४।। वरदहस्त ठेविता शिरी। रवि जैसा प्रकाश पसरी। नंतर मूर्ती गोजिरी। ब्रम्हानंदांची दिसली पै।।१५।। ऐसा चमत्कार जयी घडला। अष्टसात्विक उचंबळला अश्रूंचा पूर लोटला। प्रेमालिंगन दिले स्वामीसी।।१६।। अश्रूपातांनी केला अभिषेक। स्वामीजीचे चरणास। स्वामी विचारी तयास। ऐसेची नेत्र पाहिजे काय?।।१७।। बोलता झाला चिटणविस। वाटेल ते करण्यास। आपले सामर्थ्य आहे खास। परी नेत्र झाकावे पुनरपी।।१८।। पवित्र रामचंद्रांची। सुंदर मूर्ती पाहीली साची। याहीपरता श्रेष्ठची। आणखी काय दिसणार।।१९।। हे प्रभो झाका माझे डोळा। जगाचे पाहूनी खेळा। जाईल दृष्टी निर्मळा। पाप दृष्टी येईल पै।।२०।।

।पापाची वासना नको दाऊ डोळ।

।त्याहूनी आंधळा बराच मी।।

ऐसे तुकारामाचें वचन। म्हणूनी आपले दर्शना। तारण्या भवसागरातून। समर्थ असती दयाळा।।२१।। झाकले चिटणवीसाचे नयन। परी सगुण साक्षात्कार पूर्ण। होऊ लागला क्षणोक्षणा। परमेश्वराचा अंतरी।।२२।। शेवटी त्याची मागणी एक। अंत:काळी साक्षात्कार देख।



व्हावा मज सद्‌गुरुनाथ। आशिर्वाद देवून कबूल करी।।२३।। कृपाप्रसाद होता ब्रम्हानंदांचा। चिटणविसावरी साचा। मुलगा तयाचा अन्नासाहेब नावाचा। भक्तीत लागला स्वामींच्या।।२४।।जाणूनी तयाची भक्ती । महाराज दररोज येती। चिटणविसांचे घराप्रती। देवघराजवळ बैसितसे।।२५।। चिटणविसाचे कुटुंब पूर्ण । पूजा करिती प्रेमे करून। नदीवर परतून। येतसे स्वामीनंतर।।२६।। तेथेही भाविक सुत जनी। पाच ते सात पर्यंत जाणी। प्रश्न करिती अमृतवाणी। उत्तर स्वामी देतसे।।२७।। बाकी वेळ योगात। निमग्न राहती नित्य। एकदा तयांचे मनात। विचार ऐसा आला पै।।२८।। लाकडी खोका राहण्याकरिता। पाहिजे आपणा निश्चिता। मला कोणती इच्छा नसता। ऐसे का वाटावे।।२९।। स्वइच्छा ज्ञात्यास। नसते जाण निश्चियेस। ही इच्छा पराची खास। असावी की निसंशय।।३०।। मजविषयी साचार। ऐसी इच्छा कोण करणार। तत्काळ सुचला विचार। अन्नासाहेबांची इच्छा ही।।३१।। तयाचे मनी आला विचार। ते डबा करून देणार। आपणासाठी साचार। म्हणोनी ऐसे वाटले।।३२।। अन्नासाहेब दुसरे दिवशी। येते झाले दर्शनासी। हात जोडोनी विनंतीसी। करिते जाहले स्वामीस।।३३।। स्वामी सद्‌गुरू भक्तारका। माझी विनंती मानाल का। अहो तुमची विनंती देखा। काल चार वाजता पोहचली।।३४।। लाकडी डबा तुम्ही जर। तयार केला साचार। तयात आम्ही बसणार। ऐकूनी आनंद वाटला तया।।३५।। म्हणू लागले धन्य धन्य। मनातील संकल्प जाणीला पूर्ण। ऐसे सद्‌गुरूनाथ मिळोन। कृतार्थ मी झालो पै।।३६।। पुढे अन्नासाहेबांनी। चार चाके लावून।

Scanned by TapScanner

लाकडी डबा तयार करून। ब्रम्हानंद स्वामीस अर्पियेला॥३७॥ ब्रम्हानंद चरित्र अमृत। तुम्ही प्राशिता श्रोते बहुत। नेणेची भवसागराप्रत। दूर सारिल सद्गुरू॥३८॥ श्री श्यामसुंदर रचित। ब्रम्हानंद चरित्र सार ग्रंथ। भक्तांचे पुरवो मनोरथ। ब्रम्हानंद कृपेने॥३९॥

॥इति श्री ब्रम्हानंद चरित्र सार॥

पंचमोध्याय समाप्त



## अध्याय सहावा

॥श्री गणेशायनमः॥ श्री गुरभ्योनमः। जयजयाजी शिवशंकरा। हिमनगजामात। उमावरा। वांच्छा पुरवी दीनपामरा। तोषवी मज दयाविधे॥१॥ समुद्र मंथनी हलाहला। निर्मिता तुची प्राशिता झाला। तेणे निलवर्ण झाला गळा। म्हणोनी निलकंठ नाम तुझे॥२॥ वससी स्मशाना जवळी। भोवती भूतांची वेटाळी। आज्ञेत राहती सगळी। म्हणोनी भूतनाथ नाम तुझे॥३॥ प्रार्थितो तुज उमाकांता। पावावे दीन अनाथा। करूनी सर्व दुःखांना। तोषवावे जी लेकराची॥४॥ गोकुळी गोपालकृष्ण। बालकासवे बालक्रीडा करून। रमविती तयालागुन। खेळ खेळी नाना तऱ्हेचे॥५॥ भोवरा विटीदांड, सुरपारवा आंधळी। गोट्या कोशिंबिरीचा खेळ खेळी। तैसेची ब्रम्हानंद माऊली। बालकासवे खेळती॥६॥ इच्छित पदार्थ तयांना। करून देती नाना। लाडू पेढे अनारसे जाणा। फळफळावळ साखर॥७॥ साखर करीत वाळूची। यावर शंका एकची। गारूडी देखिल ऐसेचि। सिध्दी पासूनी करीताती॥८॥ नवल कोणते याती। हे जरी सत्य असती। तरी ते उपयोगा न येती। हाती न जाती दुसऱ्याच्या॥९॥ महात्मे लोकांचा महिमा। वेगळाची असतो जाणा। ईश्वर शक्तीला उपमा। नाही कोठे शोधता॥१०॥ पांडव असता वनात। साठ हजार ऋषी समवेत। दुर्वास ऋषी तृप्त होत। भोजन करूनिया कृष्ण लिले॥११॥

ही करणी ईश्वर शक्तीची। नव्हे जी अष्टसिध्दीची। महात्मे लोका जवळ साची। तिच शक्ती वसतसे॥१२॥ असो सुकिर्ती पसरे जिकडे तिकडे। जन म्हणती रोडके। बावन किराच्या विद्येत फाकडे। महाराज असावे की॥१३॥ कोणी म्हणती सिध्द सिध्द। कोणी म्हणती वाचा सिध्द। कोणी म्हणती तपो सिध्द। आसरा प्रसन्न असती तया॥१४॥ ऐसे बोले पात्रतेनुसार। स्वामी प्रौढा जनाबरोबर। चर्चा करिती साचार। केवळ पाच ते सात पर्यंत॥१५॥ बाकीचे वेळात। राहून योग स्थितीत। क्रिडा करी बालका सोबत । रात्री अकरापर्यंत पै॥१६॥ रात्री अकरा पासून। पहाटे पाच पर्यंत जाण। राहती पाण्यात बैसून। कुंभक क्रिया करितसे॥१७॥ डब्याजवळ एकनिर्झर। केला होता बहू थोर। त्यातची बैसूनी योगीवर। ही क्रिया चालवी॥१८॥ निमग्न असता या क्रियेत। कोणी न तया जवळी येत। प्रौढा किंवा मुलगा देख। ऐसीच आज्ञा तयांची॥१९॥ कैसी शक्ती योग्यात। निसर्ग राहती आज्ञेत। तेची आता तुम्हाप्रत। कथन करूनी सांगतो॥२०॥ ब्रम्हानंद एके दिनी। दहा पंधरा मुले घेवूनी। खेळत असता जाणी। एक मुलगा विचारी॥२१॥ बाबा माझे वडीलांनी। पाऊस केंव्हा येईल म्हणोनी। येई तुम्हा विचारूनी। ऐसे मज सांगितले॥२२॥ पहिला खेळ मांडोन। दुसरा मांडला मागुतेन। मेघाची आई नामाभिधान। दिले त्या स्वामींनी॥२३॥ ब्रम्हानंद म्हणती मुलांना। मेघाची आई करिता जाणा। नदीतुनी चिखल आणा। मूर्ती तिची करण्यास॥२४॥ मुलांनी चिखल आणिला। पुतळा तयाचा तयार केला। कुंकवाचा मळवट भरिला। फुले वाहिली पुजूनी॥२५॥ धुप दिप आरती



केली। नैवेद्य दाखविली। येणे रिती संपविली। पुजा त्या मुर्तिची॥२६॥ मुले म्हणती स्वामीला। आपण कोणता देव केला। स्वामी बोलती हसून तयाला। मेघाची आई नाम याचे॥२७॥ गणपत नावाचा त्यातला। ब्राम्हणाचा मुलगा बोलला। मेघाची आई आपणाला।ताय देईल महालाजा॥२८॥ ऐकूनी तयाचे बोबडे बोला। अंतरी प्रेमोद्भव झाला। मेघाची आई आपणाला। पाणी देणार आहे रे॥२९॥ सर्वा मुर्तिसमोर बैसवोन। म्हणती घ्या पाऊस मागून। मंत्र कथिला तया लागुन। तो ऐसा असे की॥३०॥ मेघा आई पाऊस दे आता। पाऊस दे आता। नाहीतर आमचे गुरू मारतील लाथा। मारतील लाथा। ऐसा मंत्र म्हणण्याकरीता। सांगितला मुलांना॥३१॥ लहान मोठी सर्व मुले। मंत्र म्हणू लागले। काही त्यातील बोबडे बोले। निष्कपट भाव सर्वांचा॥३२॥ ऐसे पाहून स्वामीया। आनंद झाला बहुवस। चेष्टा तयांची प्रौढ माणस। करू लागले ऐसे की॥३३॥ काय हा पोरखेळ पोरांचा। पाऊस काय नोकर यांचा। मेघाची करूनी साचा। पुजा तयाची केली पहा॥३४॥ मुलासी मंत्र देऊनी । सांगे जप करण्यालागुनी। घ्यावे आता दोन दोन हातांनी। ऐसी चेष्टा आरंभिली॥३५॥ इकडे मुलास स्वामीने। सांगितले म्हणा वेगाने। मुले म्हणता जोरजोराने। वर्षे पाऊस जोरदार।३६॥ आश्चर्य वाटले सर्वांना। आकाशी ढग नसताना। पाऊस वर्षाव झाला ना। खरोखरीच अधिकारी॥३७॥ तोंडात मारून घेवू लागली। आम्ही तयाची निंदा केली। खरोखरीच सद्गुरू माऊली। साक्षात्कारी आहे हो॥३८॥ मुले स्वामी मोकळच्या जागेती आनंदाने बैसिले असती। परी तयांचे अंगावरती।

Scanned by TapScanner

पाऊस पडला नसे की॥३९॥ गावात पाणी मावेना। शेतातील बांध फुटलेना। झाली सर्वांची फार दैना। पाणीच पाणी सगळीकडे॥४०॥ आता सांगतो ऐका। स्वामी प्रौढासी त्यागिती कां। लहान बालकांत खेळती कां। याचे ऐका कारण॥४१॥ प्रौढ मानसे सदोदीत। संकल्पाने भारले असतात। निष्काम संकल्प स्वप्नात। न दिसती तयांच्या॥४२॥ निष्काम संकल्पी साठी वर्षाचा। म्हातारा जरी असला साचा। तरी तो बालकाचा। सहचारी आहे की॥४३॥ लहान बालकाचेपाही। दुजाभाव तेथे नाही। प्रेम निष्कपटा असूनही। दीर्घकाळ टिकते पै॥४४॥ ऐसे थोरांचे नाही। मग म्हणाल तुम्हीही। एका लहान बालकानेही। संकल्प केला पावसाचा॥४५॥ परी ती त्याची नव्हे गरज। जैसे सावकारे सकाज। मनुष्य पाठविला ऋणज। तैसाची निरोप वडीलांचा॥४६॥ असो इकडे स्वामींनी। मेघांचे आईची आरती करूनी। ठेवी नदित नेऊनी। म्हणूनी सांगितले मुलास॥४७॥ स्वामी आता मानुनी प्रमाण। ठेविले नदीत नेवून। मग येवूनी परतून। नमस्कार केला स्वामीस॥४८॥ अनारशाचा प्रसाद पोटभर। मुलास देवूनी साचार। सांगितले गाठावे घर। उड्या मारित गेली घराकडे॥४९॥ पुढे घडली गोष्ट ऐसी। गेली असता कुस्ती पाहण्यासी। प्रचिती दाखविली नावाड्यासी। तेचि आता परियेसा॥५१॥ महाराज असता नदीत। डब्यात होवून स्थित। दादू, कृष्णा, बळवंत। रसुलभाई मुले पातली॥५१॥ मुलांनी स्वामीसी। विनंती केली ऐसी। आज कुंडलवाडीसी। (किर्लोस्करवाडी) कुस्त्या आहे महारज॥५२॥ तरी चलावे पहाण्यास। महाराज म्हणती तयास। कुस्त्यांचे ज्ञान आम्हास। काय



कळणार मुलांनो॥५३॥ मुले म्हणती देव आपण। सर्वच निर्माण करून। आम्हास ज्ञान नाही म्हणून। मुलास काय नाडवता॥५४॥ स्वामी म्हणती चला। सर्व लागले मार्गाला। आलेताकारीला। मुलगा पाठवी एक पुढे॥५५॥ नावाड्यासी निरोप द्यावा। नाव आपली थांबवा। आम्हास पैलतीरी न्यावा। रसुलभाई पुढे धावला॥५६॥ तैसाची निरोप सांगितला। परी नावाडी उर्मट बोलीला। फुकटे बुवा जागजागता। निर्माण असती जाहले॥५७॥ तो माझे मर्जिचा प्रश्न। दुसऱ्या नावेत नेईन। ऐसे हुडपणाने बोलोन। नाव तयाने हाकली॥५८॥ तो महाराज पोहोचले येवून। मुलाने करून निवेदन। सांगितला वृत्तांत पूर्ण। जो का घडला संप्रत॥५९॥ मुलास बोले स्वामीया। मुर्खाचे बोलणे कासया। वाईट मानतो करूया। आपली नाव तयार॥६०॥ ऐसे बोलोनी गेला। अंगावरील चौपट केला। पाण्यावरी टाकीला। आपण बैसिले मध्यभागी॥६१॥ मुलास म्हणती कोपरे धरा। जाणतो मी उतारा। उजवे बाजूने चला जरा। पाणी नाही जास्त तेथे॥६२॥ मुले म्हणती डोह भयंकर। त्या बाजूने आहे साचार। नावाडी सुध्दा नाही जाणार। आज्ञा आपली प्रमाण आम्हा॥६३॥ पूर्वी तेथे डोह होता। उतार थोडा आहे आता। ऐसे म्हणूनी चालता। नावाडी नी माणसे काय बोली॥६४॥ मुले डोहात बुडणार। घमेंड बुवाची जिरणार। ऐसे ऐकूनिया साचार। मुले म्हणती एकमेका॥६५॥ करा सद्गुरूचा नाम गजर। तेचि भवसागर करणार। तेथे पाणी काय करणार। ऐसे म्हणूनी चाले लीकरी॥६६॥ महाराजांचे संगतीत। मुले तरबेज पोहण्यात। पैलतीरा पोहचत। नावाड्याचे

Scanned by TapScanner

# अध्याय सातवा

।।श्रीगणेशायनमः।। श्री दत्तात्रेय नमः।। जयजयाजी हनुमंत। बनारी अंजनीसुता। पातालदेवताहंता। पुण्यवंत पुण्यशिला।।१।। लक्ष्मणा लागता शक्ती। द्रोणागिरी उचलोन आणिती। ऐसी तुझी प्रचंड शक्ती। बाचविले लक्ष्मणा।।२।। वायूवेगे उडून। पोहचला लंके जावूनी। सितेशी काढिले शोधूनी। जाळीली लंका रावणाची।।३।। ब्रम्हानंदाच्या अदभूत लीला। डबा पाण्यात कैसा पोहिला। हाची वृत्तांत पुढे कथिला। सावध चित्त ऐकावे।।४।। औदुंबरातील पुजाऱ्याची मुले। दर्शना बोरगावासी आले। स्वामींच्या डब्याजवळी गेले। पाहू लागले तयांना।।५।। परी महाराज नाही दिसले। म्हणूनी मूला दुःख झाले। स्वामीचे दर्शन राहीले। म्हणूनी दुःख करितसे।।६।। दर्शनाचा धरून हेत। आम्ही आलो दुरून येथ। परी स्वामी ना दर्शन देत। दैव खडतर आमुचे।।७।। इतक्यात गावातील मंडळी। येवून म्हणू लागली। तुम्ही अजून जेवला नाही । भोजन करावे थोडेसे।।८।। तुम्ही जेवला नाहीतर । स्वामी रागावतील आमचेवर। मुले म्हणती त्यावर। दर्शनाविणे खाणे नाही।।९।। डब्याजवळ बैसिले। भजन सद्गुरूचे सुरू केले। रात्री अकरावाजता ऐकिले। आवाजास स्वामीच्या।।१०।। डब्यातून आरोळी देवून। स्वामी बोले मुलालागुन। काय रे बापू आत्माराम। उपवाशी अजून वेडया ऐसे।।११।। ऐसे बोलणे ऐकता । मुलासी आनंद पुरता। हात जोडोनी तत्वता। उभे राहीले समोर।।१२।। स्वामी



बोलती रोकडे। अरे बाळांनो तांदूळ शिजवा थोडे। बापू म्हणती कोण धडपडे। तांदूळ भांडे आणण्यास।।१३।। आम्ही आपल्या दर्शनाने। तृप्त झाले अंतःकरणे। स्वामी म्हणती हात बेडे जाने। माझी आज्ञा मोडता काय।।१४।। ऐसे श्रवण करिता। म्हणती हात जोडोनी तत्वता। आज्ञा ऐकण्याकरिता। तयार आम्ही आहोत।।१५।। त्या वाळूमध्ये तांदूळ। आहे काय ते पहाल। आत्माराम वाळू काढी सढळ। तांदूळच तांदूळ दिसले तया।।१६।। महाराज येथे तांदूळ। आहेत की पुष्कळ। परी भांडे कोठे सापडेल।झऱ्यात पहावे आपुल्या।।१७।। कोणाचे विसरून राहिले काय कोण जाणे। बापूने पाहीले शोधुन। भगुन व ताम्हण सापडले।।१८।। ते घेऊन स्वामीजवळ। आला शिजविले तांदूळ। आज्ञा घेऊन तत्काळ। भोजन करिते जाहले।।१९।। पोळभर तांदूळ नाही संपले। स्वामींनी आज्ञापिले। म्हणून भांडे नदीत टाकले। निद्रीस्त जाहले रात्रीसी।।२०।। दुसरे दिवशी बापू विचारी। नदीस पाणी आले जरी। आपला डबा साचारी। वाहुनी जात नाही काय।।२१।। स्वामी बोले हसून। जैसे पोहतो आपण। तैसाची पोहतो डबा जाण। ऐकूनी आश्चर्य दोघासी।।२२।। पुनरपी दर्शन घेवून। गेले औदुंबरालागुन। पुढे एकदा कोण्या कारण। स्वामी गेले औदुंबरासी।।२३। मुलांनी स्वामींची भेट घेऊन। दत्तमंदिरी घातले आसन। हात जोडोनी विचारी प्रश्न। डबा केव्हा पोहणार।।२४।। बाबांनो डबा म्हणाला मज। पोहत येतो मी आज। तुमचे मागे सहज। औदुंबरासी जाण पां।।२५।। घाटावर चला लवलाही। डबा आलाकिंवा नाही। पाहू आपण सर्वही। म्हणूनी आले घाटासी।।२६।। डबा त्यांनी पाहिला।

Scanned by TapScanner

महाराज बैसिले थोडा वेळा। पुन्हा आज्ञा केली त्याला। बोरगावी जाण्याची॥२७॥ डबा गेला परत। पाहुनी लोक आश्चर्य करीत। निर्जिव पदार्थावर्त सत्ता या स्वामींची॥२८॥ सामान्य नव्हेची साचे। हे आहेत उच्च कोटीचे। अवतारी पुरुष साचे। सामर्थ्य असते ऐसेची॥२९॥ मुलगा नामदेवाचा। नारायण नामे सांचा। काय बोलीला वाचा। तेची परिसावी॥३०॥ संत महीमा वर्णू किती। निर्जीव चालविल्या भिंती। ही तयाची असे उक्ती। यथातथ्य जाण पां॥३१॥ पुन्हा स्वामी व काही मंडळी। बोरगावी परत आली। तो डबा पूर्व स्थळी सर्वास दृष्टी दिसतसे॥३२॥ एकदा सुर्यग्रहणाचे वेळी। महाराज मुलात खेळी। पत्र्याची नाव केली। मुले म्हणाली म्हणोनिया॥३३॥ स्वामी व मुले नावेत बैसून। औदुंबरास निघाले बोरगावावरून। अंतर चौदा मैल जाण। नदीत पूर भयंकर॥३४॥ ऐसे स्थितीत चालली। मुलांना मध्ये भूक लागली। निरनिराळी इच्छा प्रकट केली। स्वामी जवळ तयांनी॥३५॥ कोणी म्हणती अंजीर नारळ। कोणी चहा सीताफळ। ऐसी इच्छा तत्काळ। स्वामीजींनी पुरविली॥३६॥ ऐशारिती पुढे गेले चालून। एक म्हणती लगाली तहान। थोडी नाव थांबवून। पाणी मज द्यावे जी॥३७॥ तयासी सांगितले स्वामींनी। नावेत येत आहे पाणी। तृप्त व्हावे पिऊनी। सर्वांनी तृष्णा भागविली॥३८॥ एक मुलगा म्हणतो। आपण बुडून मरतो। ब्रम्हानंद उत्तर देतो। हातवेडच्या पाणी आहे कोठे॥३९॥ ऐसे ऐकताची मुले। नावेत पाहू लागले। परी त्यात पाणी न दिसले। सर्व गेले निघोनी॥४०॥ पुन्हा एक म्हणाला। तुम्ही फराळ दिला आम्हाला। परी ते नकोत



मला। भात पाहीजे तो द्या मज॥४१॥ स्वामींनी एका मुलास। खिशात तांदूळ पहावयास। लाविले असता सकस। तांदूळ तेथोन निघाले॥४२॥ आता पाहीजे सर्पन॥ आडवे येईल झाड जिर्ण। त्याचे घेवू सर्पन। म्हणता लागले झाड एक॥४३॥ सर्पन घेण्यास सांगितले। नंतर भातासी शिजविले। मुलासी भोजन दिले। जेवूनी ने झाले सर्वांचे ॥४४॥ ऐसी क्रिडा करीत करीत। पोहचले औदुंबराप्रत। आणि पुन्हा परत। बोरगावासी निघाले॥४५॥ पत्र्याची ती नाव सांप्रत। आहे बुरूंगवाडीचे मठात। जरी कोणाची इच्छा असत। तरी ती पहावी प्रत्यक्ष॥४६॥ राजेराम बापू शिष्याची। परीक्षा घेतली कैसी। निवेदन पुढे तेची। केले परिसावे भक्तजनी॥४७॥ राजेराम बापू मुसलमान। जातीचे ते असून। प्रेमकरी लहानपणापासून। ब्रम्हानंद स्वामीवरी॥४८॥ पाटीलकी होती तयाचे पदरी। ऐके दिनी आले स्वामींचे अंतरी। परीक्षा घेवून तयाची खरी। मग करावा प्रसाद॥४९॥ ऐशा करूनी विचारा। नावेत बैसवूनी साचारा। घेवून गेले ब्रम्हानाळ नगरा। जल पर्यटन म्हणूनी॥५०॥ तेथे एक सत्पुरूषाची। समाधी वार्षिक रितीने साची। डुलत असते नित्याचि। ती दाखविली तयासी॥५१॥ किर्तन श्रवण करून। पुन्हा नावेत बैसून। परत निघाले नदितून। नाव स्वईच्छे चालवित॥५२॥ एका खेडेगावी आले। जळते प्रेत पाहिले। बापू थंडीस त्रासले। जाणून सांगितले तयासी॥५३॥ मला थंडी वाजते फार। जावे बिस्तवाजवळी साचार। विस्तव आणि लाकडे सत्वर। घेऊन यावे मजकडे॥५४॥ तेथेच नाव थांबविली। झाडास तिला बांधिली। दोघेही खाली उतरली। बापू

Scanned by TapScanner

निघाला प्रेताकडे।।५५।। तया वाटू लागली भिती। न आणिता । आज्ञा भंग होती। धैर्य धरूनी सत्वरगती। लाकडे विस्तव आणिला।।५६।। हातपाय शेकले दोघांनी। बोरगावी आले परतुनी। तेथेही परिक्षा स्वामींनी । घेतली राजाराम बापूची।।५७।। राजाराम बापू प्रेमळ सात्विक। होता म्हणूनी देख। वचन निभावले चोख। इतरा न साधे ते।।५८।। पुढे विरभद्राचे डोंगरावर। जावूनी महाराज झाले स्थिर। डोंगरावरील वोवऱ्या साचार। पडल्या असती पूर्वीच्या।।५९।। त्या दुरुस्त करण्याकरिता। मजूर झाले लाविता। मजूर काम करित असता। साप एकाओवरिता।।६०।। सहा हात लांबीचा। सव्वा वित रुंदीचा। चाल करूनी आला साचा। मजुराचे अंगावर।।६१।। मजूर ओरडत ओरडत। आले स्वामीजवळ धावत। महाराज येवून ओवरित। विचार करू लागले।।६२।। या दृष्टाचा रहिवास येथून। गत्यंतर नाही काढल्यावाचून। ऐसा विचार करूनी पूर्ण। दोन छडच्या आपटल्या।।६३।। आणि म्हणू लागले। तुमचे साल संपले। म्हणूनी पाहिजे येथून गेले। साप निघाला तेथोनी।।६४।। साप पायऱ्या उतरून जाता। राजाराम दिसले येता। दोन छडच्या आपटून तत्वता। उभे राहण्यास सांगितले।।६५।। साप उभा राहिला। राजाराम बापू घाबरला। स्वामीने बापूस आज्ञापिला। वर येण्यास सांगितले।।६६।। साप आहे भयंकर। परि वचनाची किंमत थोर। ऐसा करूनी विचार। सापावरून उडी मारली।।६७।। महाराजा जवळी गेले। दर्शन चरणाचे घेतले। भूक लागली निवेदिले। स्वामीस बापूने।।६८।। तेव्हा स्वामीने काय केले। मजुराजवळी शिळे तुकडे घेतले। राजारामास खावया दिले। आनंदे केले भक्षण।।६९।।



मजुराने आग्रहा धरिले। म्हणूनी स्वामीने दोन घेतले। घास दुधभाताचे तेही केले। वमन, भक्षी राजाराम बापू ते।।७०।। आजचा सुदिन समजूनी। आपणास धन्य मानिले त्यांनी। हे महाराजांनी जाणूनी । तथास्तू म्हणूनी आशिर्वाद दिला।।७१।। राजाराम बापूस तेथून। कवित्वशक्ती आली जाण। मायाब्रम्हाचा संवाद पूर्ण। लिहिला असे तयांनी।।७२।। सद्‌गुरू चरित्र अनेक पदे। भेदिक लावण्या अनेक छंदे। ओव्या लिहिल्या कृपा प्रसादे। ब्रम्हानंद स्वामींच्या।।७३।। श्रोत्यास अनुभव तयाचा। वाचुल्याविना नाही कळायचा। म्हणून एकदा ग्रंथ तयाचा। चाळूनिया पहावा ।।७४।। श्री शामसुंदर रचिता। ब्रम्हानंद चरित्र सार ग्रंथ। भक्ता सुखी ठेवोत। ब्रम्हानंद कृपेन ।।७५।।

।।इति श्री ब्रम्हानंद चरित्र सार ग्रंथ
साप्तमोध्याय समाप्त

Scanned by TapScanner

# अध्याय आठवा

श्री गणेशायनमः। श्री दत्तात्रेय नमः। जय जय आदिमाया। वससी तू सर्व ठाया। कृपा दृष्टी पाहूनिया। तारावे लोकास॥१॥ लक्ष्मी माते विश्वजननी। जिवन चित शक्ती विलासिनी। स्वरूप सुंदरी महाविष्णू कामीनी।दया करी शरणांगता ॥२॥ तुज अनन्य बाहता पुरविसी भक्त मनोरथा। मग माझा वृथा। अंत का पाहसी जननीये ॥३॥ मृत चंद्राबाईचे । प्रेत स्वामींनी उठीवले साचे । निवेदन त्या गोष्टींचे। करीतो ब्रम्हानंद कृपेने ॥४॥ कुंडलचे डोंगरावर ब्रम्हानंद असता। नागराळचा तुकाराम शिष्य धावता पळता। स्वामी जवळ येवूनी झाला म्हणता। सद्‌गुरूनाथा दयासागरा ॥५॥ तिर्थ द्या आपुल्या पायाचे। स्वामी बोले काय काम त्याचे। चंद्राबाईचे शवावर साचे । शिंपण्यास ते पाहीजे ॥६॥ ती बाई सात्वीक फार । वाईट वाटले स्वामीस साचार। सद्‌वर्तनी मरता सामान्य हळहळणार। ते तर चाहते तयांचे॥७॥ महाराज म्हणाले बेधडक। मुर्ख तुम्ही लबाड लोक। ती मेली नसेल बहुतेक। असत्य तुम्ही बोलता॥८॥ चला आपण तेथे जावू। काय झाले ते पाहू। ऐसे बोलोनी अजानबाहू। कृष्णातिरावर पोहोचले॥९॥ कृष्णानदीवर तत्वता। दिवसाचे दहा वाजता । प्रेत आणिले आप्ता। जाळण्यासी विबुध हो॥१०॥ तेथे महाराज येवून । म्हणाले आणावे बोलावून। पाटील कुलकर्ण्यांसी जाण। आप्ते बोलाविले तयासी॥११॥ पाटील कुलकर्णी येता। उभे राहीले हात जोडता। स्वामी बोले



हात का जोडता। खटला भरतो तुमचेवर॥१२॥ तुम्ही जिवंत मानस जाळता। नाही स्वामी रात्री दहा वाजता। ही बाई मेली असता। आता जाळावया आणिली॥१३॥ ते असो काही। जिते मानस जाळता पाही। खटला तुमचेवर लवलाही। भरतो आता मी पहा॥१४॥ ऐसी गंमत दोन तास केली। मग छडी हातात घेतली। प्रेतावर दोनदा मारीली। नी म्हणाले ऐसे की॥१५॥ थेरडे तू मेल्याचे। सोंग घेवूनिया साचे। निजली ऐसे बोलता वाचे। बाई उठूनी बैसली॥१६॥ विचारिले तिस तू कोणाची। आजवर होते आप्तवर्गाची। आता झाले मी तुमची। गुरूराया भवतारका॥१७॥ डोंगरावर सेवा करीत बैस। ऐसें म्हणोनीया तिस। अंगावरील धोतर नेसावयास। चंद्राबाईस दिले पै॥१८॥ त्या बाईस नेले डोंगरावर। ती अजून आहे जिवंत साचार। पहावयाची असेल कोणा जर। प्रत्यक्ष जावूनी पहावी॥१९॥ वयाला साठ वर्षे झाले। तेव्हा काळाने नेले। डोक्याचे केस पांढरे झाले। दंत असती हालत॥२०॥ तिस जीवंत करून। केस बनले कृष्ण। दात झाले टणटण। हरबरे आता फोडतसे॥२१॥ तिला जिवंत केल्यास। वर्षे झाली तिस। ती बुरुंगवाडीचे मठास। आजूनी आहे श्रोते हो॥२२॥ बोरगावचे डब्यात स्वामी बसले असता। तुकाराम माने आबासाहेब झाले बोलता। आजकाल येथे न येता । किर्लोस्कर वाडीस राहता की॥२३॥ किर्लोस्कर वाडीचे डोंगरावर । योगाभ्यास करीता साचार। कोठडी केली तयार। इकडे येता केव्हांतरी॥२४॥ आम्हास त्या योगानं। बरेच दिवसापासून। आपले हातचा प्रसाद जाण। मिळाला नाही गुरूराया॥२५॥ ऐसे स्वामींनी ऐकूनी। बोलावले

Scanned by TapScanner

साखरभाताचे सामान। स्वहस्ते तयार करून। निमंत्रण दिले मंडळीस॥२६॥ अन्न चार माणसास पुरत नाही। हजारो माणसास आमंत्रण पाही। दिले स्वामींनी बरी गत नाही। म्हणून घाबरले माने चिटणविस॥२७॥ स्वामी झाले विचारता। विचार कशाचा करता। डब्यातून अन्न आता। देतो काढून तुम्हाला॥२८॥ ऐसे म्हणोनी डब्याजवळ गेले। त्यातूनी अन्न काढीले। हजारो मानसे जेविले। दोन मानसाचे शिल्लक॥२९॥ चमत्कार पाहून लोक म्हणत। वशिष्ठाचे आश्रमात। साठहजार शिष्यासमवेत। विश्वामित्र जेवले॥३०॥ हे ऐकीले पुराणी। परंतु आम्हा सद्गुरूनाथांनी। दिले प्रत्यक्ष दावूनी। धन्य धन्य सद्गुरू माऊली॥३१॥ कलीयुगी पावन करण्यास। अवतार त्यांनी घेतलास। ऐसी स्तुती करून बोरगावास। घराकडे परतले॥३२॥ एकदा स्वामींनी। गुराखी मुलालागुनी। गाई कृष्ण दाखवूनी। दर्शन तयांचे करविले॥३३॥ ती कथा ऐसी साचार। असता कुंडलचे डोंगरावर। आले सात आठ गुराखी पोरं। सात ते चौदा वर्षाची॥३४॥ नमस्कार करूनी प्रेमभावे। कृष्णास लोक म्हणती देव। गुरे राखीली तयांनी सदैव। तुम्ही देव आमुचे॥३५॥ तुम्ही तैसे का न करी। ऐसा प्रश्न विचारी। ऐकूनी स्वामीस साचारी। आनंद बहू वाटला॥३६॥ महाराज म्हणाले तयासी। गंमत दाखवितो तुम्हासी। चला माझे संगतिसी। एकेक शिरले कोठडीत॥३७॥ मुलांनी आत प्रकाश पाहीला। पुढे रूंद रस्ता दिसला। त्या रस्त्याने जायला। मुले भराभर लागली॥३८॥ महाराज गेले मागुता। ऐसे सर्व चालता चालता। एक गाव लागले तत्वता। गोकूळ नाव असें पै॥३९॥ पुढे लागली नदी एक।



नाम तियेचे यमूना देख। मुलांना पिण्यास उदक। स्वामींनी सांगितले॥४०॥ गम्मत आली जवळ आता। तुम्ही चलावे तत्परता। ऐसे मुलास सांगता। मुले निघाली जल्दीने॥४१॥ पुढे दिसला गाईचा गोठा। आणि गुरांचा कळप मोठा। हजारो गाईंचा तयात साठा। गुराखी बालके पाहीली॥४२॥ त्यातील एकासी चार हात। तयाशी कृष्ण कृष्ण म्हणत। तो होता मुरली वाजवित। गोड मधुर नाद तियेचा॥४३॥ चार हाताचा गुराखी प्रकाशमान। मुरलीच्या नादाने तल्लीन। ब्रम्हानंद मुले जाहली॥४४॥ सावध होता तयातूनी। मुले देखती अवलोकूनी। चार हाताच्या गुराख्यानी। स्वामीस जवळ बसविले॥४५॥ दोघांचे भाषण चालले। महाराज त्या गुराख्यास म्हणाले। आमचे कळप कोठे गेले। सांग मजसी सावळ्या॥४६॥ तुमचे कळप येथे आहे। हाका मारूनिया पाहे। महाराजांनी लवलाहे। गाईस हाका मारिल्या॥४७॥ गंगा, कृष्णा, यमुना, नर्मदे। सरस्वती, कावेरी, तुंगभद्रे। हाका मारील्या ब्रम्हानंदे। जवळ गाई पातल्या॥४८॥ ऐसा चमत्कार डोळ्यांनी। पाहीला कुंडलच्या मुलांनी। म्हणती एकमेका लागुनी। महाराजांच्या गाई आहेत॥४९॥ ऐकूनी महाराज हसले। कृष्णे स्वामीस आलिंगन दिले। नंतर ब्रम्हानंद मुले। बाहेर आले निघोनी॥५०॥ कोठडी रूंद पावणे दोन हात। अडीच हात लांबी त्यात। ऐसा चमत्कार घडला असत। ती प्रत्यक्ष पहावी॥५१॥ एकदा बोरगावासी स्वामी। डब्यात बसले असता जाणी। काही मुले दर्शनी। आले असती जाण पां॥५२॥ महाराजांनी त्या सर्वाला। वाळूचा चिवडा करून दिला। एक म्हणती त्यातला। आषाढी एकादशी आहे मज॥५३॥ मग

Scanned by TapScanner

चिवडा कैसा देई । महाराज म्हणती त्यासहीं। देवाचे दर्शन झाल्या शिवायी। फुकट फराळाचे आवडेना॥५४॥ मुले म्हणती महाराज। पांडुरंगाचे दर्शन करवा आज। पंढरपूर पंचेचाळीस कोस सहज। कैसे जावे तेथे रे॥५५॥ चारपाच दिवस पायी चालता। अडीच दिवस रेल्वेनी जाता। जुने पंढरपूर मज माहीता। ते तरी तुम्ही पहावे॥५६॥ बोललेले वचन सत्य केले। पाहिजे म्हणूनी उठले। नदीकडे पाहू लागले। नदीस पूर भयंकर॥५७॥ महाराज शिरले पाण्यात। मुले एकमेकाचे धरून हात। स्वामीजींचा हात धरत। पाठीमागे चालले॥५८॥ बाबांनो, चला माझे उतारांनी। माझ्या इतके आहे पाणी। मुले पोहण्यात पटाईत जाणी। महाराजांच्या आश्रयाने॥५९॥ वय त्यांचे दहा, बारा, पंधरा। पोहचले सर्व पैलतीरा। महाराजांचा आश्रय खरा। होता त्या मुलास॥६०॥ तयांना दगडी घाट लागला। टाळांचा आवाज आला। मुले म्हणती स्वामीला। हे गाव कोणते॥६१॥ महाराज म्हणाले त्यावर। हे आहे जुने पंढरपूर। भजन चालले वासकरांचे फडावर। आवाज तयाचा ऐकू येतो॥६२॥ तेव्हा एक मुलगा झाला म्हणता। त्या फडावर आहे माझा चुलता। ते काही असो चला आता। किर्तन तुम्हा दाखवितो॥६३॥ ऐसे ऐकूनी सर्व निघाली। वासकरांचे फडावर आली।तेथे मुलास चुलत्याची भेट झाली। चुलता विचारी पुतण्याला॥६४॥ अरे बाळा तू कोणाबरोबर। गावावरूनी आला साचार। मी आलो महाराजा बरोबर। आजच निघालो संध्याकाळी॥६५॥ ऐकूनी त्या गृहस्थास। आश्चर्य वाटले बहुवस। बोरगाव येथून पंचेचाळीस कोस । थापा मारतो गाढवा॥६६॥ करीत असता बोलणे।



धमकावीले हवालदाराने। किर्तन संपल्यावरी करणे। विचारपूस काय ते॥६७॥ असो पुढे महाराजांनी। नेली सर्व देव दर्शनि। तेथे एक रात्र राहुनी। निघाले दुसरे दिवशी॥६८॥ तेथे व्दादशी सोडून। घोड्याचे टांग्यात बैसून। आले कुर्डुवाडी लागून। तिकीट घेतले पुण्याचे॥६९॥ पुण्यात येऊन पोहचले। कापडाचे दुकानी गेले। प्रत्येकास कपडे घेतले। सद्गुरू माऊलीने॥७०॥ पटलोन सदरा बास्किट। टोपी उपरने कोट। मोत्यांचा जोड बुट। ऐसे प्रत्येका घेतले॥७१॥ कपडे घालण्यास सांगितले। दुकानदाराने बिल दिले। नव्वद रूपये एकूण झाले।हिशोब चुकता करावा॥७२॥ जयास दिले कापड। तयासी मागावी रोकड। आम्ही साधू आम्हा ना निकड। पैसे कोठे आम्हापाशी॥७३॥ कपडे घेतले कशाकरीता। मी पैसे घेतल्यापरता। तुम्हास जावू न देता। पोलीसचे स्वाधीन करणार॥७४॥ मुलास म्हणती स्वामी। खिशात पहा शोधूनी। मुले शोधताजाणी। पैसे निघाले तयात॥७५॥ प्रत्येकाचे कापडाची किंमत। निघती झाली प्रत्येकाचे खिशात। प्रत्येकांनी स्वामींप्रत। रक्कम दिली स्वहस्ते॥७६॥ स्वामी बिल देवू लागले। दुकानदारास नवल वाटले। तयाने शिंप्यास विचारीले। खिशात पैसे टाकले काय॥७७॥ शिंपी म्हणती नाही। दुकानदार पैसे ना घेई। पैसे दुकानात टाकून देई। मग आले स्टेशनासी॥७८॥ सर्वांची तिकीटे घेतली। बोरगावासी परत आली। ऐसी सद्गुरूमाऊली। दर्शन करविले विठ्ठलाचे॥७९॥ परत बोरगावासी येता। तपास करी मुलाचा चुलता। तयी त्यास कळले निश्चिता । एकादशीस मुले नव्हती घरी॥८०॥ असो सद्गुरूची

Scanned by TapScanner

लीला। अगम्य असे सर्वाला। तेथे मज पामराला। कैसें सामर्थ्य वर्णण्याचे॥८१॥ श्री शाम सुंदर रचित ब्रम्हानंद चरित्र सार ग्रंथ। आल्हाद देवो भाविकाप्रत । ब्रम्हानंद कृपेने॥८२॥

॥इती श्री ब्रम्हानंद चरित्र सार ग्रंथ॥
अष्टमोध्याय समाप्त.



## अध्याय नववा

श्रीगणेशायनम: दत्तात्रेय नम:। जय पद्मपलशाक्षी सुरेश्वरी।दारिद्रय हरिणी विश्वेश्वरी। मातामहालक्ष्मी दु:खहारी। विष्णूप्रीये भगतानंद दायिनी॥१॥ दयानिधे त्रैलोक्यजननी। दयावती त्रैलोक्यपावनी। क्षीरार्णवखुले त्रैलोक्यधारिणी। हरिप्रीये शरण तुज॥२॥ रक्षिले तू सर्वासी। मग का दुर्लक्षी। पाही कृपाकटाक्षी। या दीन अर्भकाशी॥३॥ श्री क्षेत्र बारशीचा। रहीवाशी नामदेव नावाचा। तयाशी तिर्थयाचा फिरण्याचा। ध्यास बालपणापासून॥४॥ ऐसेची एकदा फिरत फिरत। काशी व इतर यात्रा करीत। आला पुणे शहराप्रत। मुक्काम तेथे ठेविला॥५॥ तेथे तयासी भेटला। कुंडलचा गोपीनाथ गवंडी भला। फिरण्याचे कारण विचारिता झाला। नामदेव निवेदी तयाशी॥६॥ मला पाहिजे सदगुरुनाथ। म्हणूनी हिंडतो शोधार्थ। कुंडलचे डोंगरावरी यथार्थ। गुरू तुज भेटेल ॥७॥ त्यांची भेट घेवून। जावे तयाशी शरण। ऐसे वचन ऐकून। नामदेव डोंगरावरी निघाला॥८॥ येवूनी स्टेशनावरी पुण्याचे । तिकीट घेतले सहा पैशाचे। ते होते घोरपडी स्टेशनचे। ताकारीचे पडती सव्वादोन॥९॥ आणि अंतरी म्हणू लागला। खरोखरी सदगुरू भेटतील मला। तर नेतील कुंडलचे डोंगराला। याच की तिकीटाने॥१०॥ ऐसा विचार करून गाडीत बसला। आला ताकारीचे स्टेशनाला। तिकिटे देवून स्टेशन

मास्तराला रस्ता विचारीला डोंगराचा॥ ११॥ न अडविता तयाला । मास्तरांनी रस्ता सांगितला । नामदेव डोंगरावरी गेला । परी महाराज नव्हते तेथे॥१२॥ तिन दिवस केले उपोषण। चौथे दिवशी रात्री बाराला जाण। महाराजांनी दिले दर्शन। आणि म्हणाले तयाशी॥१३॥ बहीण, भाऊ, बाप, आई। स्त्री पुत्रादिक आम्हा नाही। म्हणूनी आम्ही डोंगरावर पाही। अरे वेडया राहतो। आम्ही॥१४॥ सर्व सोडून तू कां आला। तिर्थयात्रा पायी फिरला। याचे कारण आम्हाला सांगावे लवकरी॥१५॥ ऐसे करिता श्रवण। म्हणू लागला कर जोडून। तारी मज भवसागरातून। बुडतो त्यात गुरूराया॥१६॥ सद्गुरूनाथा करूणार्ववा। अव छेडका दयार्णवा। बुडतो मी या भवा। शरण आलो चरणाशी॥१७॥ ते सर्व ठेव बाजूला। तू आम्हास त्रास का दिला। तेव्हा नामदेव म्हणाला। आजच घेतले दर्शन॥१८॥ जन्मात नाही पाहीले। आजच दर्शन घेतले। मग मी त्रासा कैसे दिले। सांगा मज स्वामीजी॥१९॥ पोटात माझे आग पडिली। नी म्हणतो तकलीफ नाही दिली। पोटात आग कशी पडली। सांग मज नामदेवा॥२०॥ तिन दिवस उपोषित। माझे नावे तू असत। त्याचा त्रास कोणाप्रत। दुसऱ्यास कां होईल रे॥२१॥ चल आता कोठडीस। तुला काही खावयास। आहे काय ते पहाण्यास। आत जावूनी पहावे नामदेव॥२२॥ दिवा आहे एक जळत। पळसाचे पात्री लोणचे मीठ दिसत। येवूनी ब्रम्हानंदाप्रत। तेच सर्व सांगितले॥२३॥ स्वामींनी त्याचा हात धरून। नेले कोठडीलागुन। म्हणती नामानंद शिष्या साधुजन। लबाड बोलतात काय रे॥२४॥ नामदेव आत पहात। चतकोर भाकरी शाक भात।



पूर्वी तर मिठ लोणचे असत। आता कोठून हे आले॥२५॥ बरे मी चार दिवसाचा उपवाशी। याने काय होणार मजसी। अरे साधुने अल्पसंतोषी। असावे म्हणती महाराज॥२७॥ तुप नसलेले अन्न। कैसे खावे आपण। ऐशी शंका मनी जाण। आली असे नामदेवाच्या॥२८॥ ब्रम्हानंद स्वामीनी। चाफ्यांच्या पानाचा द्रोण करूनी। फेकला पाच सहा हातावरूनी। नामदेवाच्या पानावरी॥२९॥ घे वेडया तुप द्रोण भरून। ऐसे महाराजाचे वचन। खाली न जाता द्रोण। भरला ततकिळ तुपानी॥३०॥ पात्रातील अन्न संपले नाही। दृष्टीस नाही दिसली कोणी । आनंदे भोजन करूनी पाही। तुप्त तो जाहला॥३१॥ महाराज म्हणती तयाशी। राहीला काय उपवाशी। रोजचे पेक्षा अत्ताशी। तिप्पट खाल्ले असेल मी॥३२॥ आता हे सर्व पूर्ण करी। वेदान्त चर्चा सुरू करी। मग भोजन आटपवून सत्वरी। चर्चेशी केला प्रारंभा॥३३॥ स्वामी वचन मानुनी प्रमाण। प्रश्न केले नामदेवान। त्याची उत्तरे आनंदात। देते जाहले ब्रम्हानंद॥३४॥ जिवाची तळमळ केव्हा मिटेल। त्यास उपाय काय असेल। सिध्दी म्हणजे काय सखोल। ज्ञान आम्हा सांगावे॥३५॥ निजानंदी जीव ऐक्य पावेल। तेव्हा जीवाची तळमळ मिटेल। समजूनी घ्यावे सकल। ज्ञानासी नामदेवा॥३६॥ त्यास उपाय एकची। सद्गुरूची किंवा श्रीहरीची। योग किंवा उपासनाची। हाची उपाय जाणावा॥३७॥ सिध्दी म्हणजे कायी। याचे उत्तर आता पाही। मनोवांच्छित फल तेही । आहे गा नामदेवा॥३८॥ पूर्वजन्मी परमार्थ केला किंवा नाही हे यथार्थ। कैसे कळते सद्गुरूनाथ। ते मज सांगावे॥३९॥ स्वरूप प्राप्ती अन्य साधानाने। न

Scanned by TapScanner

आल्या ती होणे। किंवा सद्गुरूची प्राप्ती बालपणी होणे। तयांनी परमार्थ केला पूर्वजन्मी॥४०॥ सद्गुरू प्राप्ती न होणे। किंवा आत्मज्ञान न होणे। तयांनी ऐसे जाणणे। परमार्थ नाही केला पूर्वजन्मी॥४१॥ दु:ख अपकिर्ती दारिद्रच रोग। हे कशाने येती सांगा मज। पूर्वजन्मीच्या पापकर्माचे उपज। जाणावे शिषोत्तमा॥४२॥ औदार्य व प्रिय वक्तृत्व। कशाने ही प्राप्त होत। स्वरुप प्राप्ती कशाने मिळत। जीव अक्षयी सुखी होईल केव्हा॥४३॥ इच्छा मरणी जीव कशाने होते। योग सिध्दी कशाने मिळते। दारिद्रच रोग कशाने येते। हेची सांगावे स्वामीया॥४४॥ प्रिय वक्तृत्व औदार्य। पूर्व कर्मानुसार प्राप्त होय। अंतरीची काळजी नि प्रयत्न योग्या तरीच स्वरूप प्राप्ती होईल॥४५॥ अखंड स्वरूपा नुसंधान ठेविल । तर जीव अक्षयी सुखी होईल। जीव इच्छा मरण पावेल। पूर्ण प्राणायाम योगाने॥४६॥ मनाचया धैर्यानि। परी लवकर सदगुरूच्या आश्रयाने। योग सिध्दी प्राप्त जाणे। म्हणूनी गुरू करावा॥४७॥ संताशी निंदीले। कि अधर्मानि वागले। त्याने दारिद्रच रोगा जवळ केले। समजावे सुज्ञजने॥४८॥ अपमृत्यू कशाने येती। ब्रम्हचर्य कायम कशाने टिकती। तयाचे प्रकार कोणते आणि किती। वागण्याची मर्यादा सांगावी॥४९॥ अनियमित वागण्याने। देव संताच्या द्रोहाचे। अपमृत्यू होती जाणे। बालका नामदेवा॥५०॥ योगाने वैराग्याने। स्वस्वरूपाने व अभ्यासाने। ब्रम्हचर्याचे कायम टिकणे। होत असते जाण पां॥५१॥ ब्रम्हचर्याचे चार प्रकार। असती नामदेवा साचार। आता सांगतो येर। वागण्याची मर्यादा॥५२॥ स्त्रीचे ठायी मर्यादितके शांत असणे। योग



बलानी विर्य बिंदूस अधोगती न होऊ देणे। ब्रम्ह अभ्यास तिनही अवस्थेत करणे। ही पथ्ये ब्रम्हचर्याची॥५३॥ शरीरास स्त्रीचा संपर्क न होऊ देणे। ब्रम्ह अभ्यासही न करणे। आचार्य सेवा स्वप्नीही न करणे। यास घोड ब्रम्हचर्य संबोधिती॥५४॥ घोडचाला शक्ती येण्याकरीता।अथवा कायम टिकण्याकरीता घोडीचा संपर्क न येवू देता। बांधुन ठेविती ठाण्यावरी॥५५॥ ऐसे ब्रम्हचर्य त्याज्य जाणी। उलटपक्षी वैराग्य नसुनी। जरी असेल वेश्यागमनी। परि करितो ब्रम्हचिंतन॥५६॥ करूनी ब्रम्हचिंतन। आचार्य उपासना परिपूर्ण। तो उत्तम घोड ब्रम्हचर्याहून । असतो जाणावे बालका॥५७॥ ऐशा प्रकारे प्रश्नोत्तर। बरेच आले गुरूशिष्याभितर। तयाचा वेगळा ग्रंथ तयार। होणार असती म्हणोनिया॥५८॥ संक्षेपे येणे केले कथन। पुढील कथेसी अवधान। द्यावे तुम्ही श्रोतेजन। पुढील चरित्र मनोहर॥५९॥ श्री शामसुंदर रचित। ब्रम्हानंद चरित्र सार ग्रंथ। भक्ता ठावो सन्मार्गाप्रत। सद्गुरू कृपेने॥६०॥

॥इति श्री ब्रम्हानंद चरित्रसार॥
नवमोध्याय समाप्त

Scanned by TapScanner

# अध्याय दहावा

श्री गणेशायनम:॥ श्री दत्तात्रेय नम:॥ जय जय क्षिरसामरवासी। शख चक्र गदा धारण करिशी। प्राणीमात्रा सांभाळीसी। सत्ता तुझी तिन्ही जगी॥१॥ क्षत्रीय माजता धरणीवर। घेतला परशुराम अवतार। सात वेळा करूनी समर। पृथ्वी निक्षत्रीय केली त्वा॥२॥ पितृआज्ञा मानुनी प्रमाण। केले मातेचे हनन। पित्यासी प्रसन्न करून। पुन्हा सजीव केले तिसा॥३॥ ऐसा तू जमदग्नी कुमार। पाहू न शकला क्षत्रियाचे अत्याचार। मुक्त केले ऋषीवर। सोडवूनी जाचातूनी॥४॥ मग माजी तुज करुणा। का न येई परशुरामा। शामसुंदरसी का करीना। मुक्त या जाचातुनी॥५॥ महाराज असता कुंडलचे डोंगरावर। तुकाराम नगराळचा राहणार। येता झाला दर्शनासी साचार। प्रश्न करी महाराजा॥६॥ सगुनदेव आवडतो मजसी। निर्गुण म्हणजे लागणे वाऱ्याच्या पाठीशी। की झटणे शुन्य आकाशासी। म्हणुनी निराकार वस्तू न आवडे मज॥७॥ सगुण प्राप्ती होईल कैसी। ते सांगावे मजसी। महाराज म्हणती तयासी। प्रेमाची अतिसिमा पाहिजे॥८॥ प्रेमळ संतांचे संगतिन। भजन किर्तन करून। अष्टसात्वीक भाव उचंबळून। आला पाहिजे तयासी॥९॥ ऐसी मूती होती पंढरपुरी। प्रेमरसाचा पुतळा भारी। जेवढी गावा तयाची थोरी। तेवढी कमी असेल॥१०॥ ते नामदेवराय होत। तुझे मन त्या प्रमाणात। भारले जाईल। तेव्हा साक्षात। सगुण साक्षात्कार खेळेल तुजसवे॥११॥ दुसरे ब्रम्हनिष्ठ महात्मा गुरूची। हरीचा



सगुण अवतारची। ऐसे वर्णिती शास्त्रेची। पहावे ते शोधुनिया॥१२॥ त्यावर निष्ठा असली वा नसली। तरी साधनेचे अनुष्ठान करूनी पाहिली। त्याची फले पाहिजे घेतली। बरे जरा इकडे ये॥१३॥ अरे येई जरा इकडे। बैस थोडा माझे पुढे। ऐसे म्हणूनी रोकडे। शिरी ठेवी वरदहस्त॥१४॥ तुकाराम झाला निमग्न। झाले पांडुरंग दर्शन। मग पूर्व स्थितीवर येवून। ब्रम्हानंदाशी म्हणाला॥११॥ बोले तो हात जोडून। आपले कृपेने जी मी धन्य। आपली कृपा आहे परीपूर्ण। ऐसे मी समजतो॥१६॥ माझी इच्छा आहे एक। मला संन्यास द्यावा देख। अरे मुर्खा ऐक। संन्यास म्हणजे काय ते॥१७॥ शिखा सुत्राचा त्याग काढणे। मिशा काढून भगवी वस्त्रे घालणे। मान्य आहे तुकाराम म्हणे। इच्छा माझी पूर्ण करा॥१८॥ यासी ज्ञानाचा गंध नाही। तरी इच्छा पूर्ण पाही। केली पाहीजे कृपा आपणही। विचार करी ब्रम्हानंद॥१९॥ मग तत्काळ औदुंबरास जावून। त्यांच्या मिशा काढून भगवी कफनी घालून। दर्शन दिले रात्रीसी॥२०॥ नंतर महाराज म्हणाले त्यासी। आजपासून अर्ध सन्यांसी। लवकर बनुन येशी। मजकडे तुकाराम॥२१॥ महाराज डोंगरावर गेले। पुढे तुकारामाचे वडील वारले। आठ पंधरा दिवसांनी भले। मिशा काढल्या पितृक्रियेत॥२२॥ नंतर गेला डोंगरावर। महाराज म्हणती साचार। अर्ध सन्यासी बनून लवकर। आलासी गा मजकडे॥२३॥ तुकाराम बोले त्यावर। आपले वचन कोठूनी खोटे होणार। असो सद्गुरू जवळ मागण्या फार। अक्कल पाहीजे संग्रही॥२४॥ की चांगले मागण्यास सुचने। पूर्व जन्मीचे प्राक्तन जाणे। येरव्ही काय घडणे।

Scanned by TapScanner

अशक्य आहे सुज्ञ हो॥२५॥ एकदा काय घडली मात। बैसिले असता शिष्यासमवेत। छोटू बुवा मालवणकर त्यात। नामदेव बुवा संगतीला॥२६॥ नामदेव काढी विषयी देख। थोर महात्मे आहे टिळक। बाबारे, महात्मे असो की व्यावहारिक। प्रारब्ध कर्म न चुके कोणा॥२७॥ आजपासून आठ महिन्यांनी त्यास। सहा वर्षाची होईल तुरुंगवास। ऐसे ऐकता शिष्य मंडळीस। नवल फार वाटले॥२८॥ खरे झाले समर्थांचे भाकीत॥ त्याच साली टिळकाप्रत। शिक्षा होवूनी तुरुंगात। मंडाल्यासी पाठविले॥२९॥ शिष्य म्हणतात सद्गुरूनाथास। प्रारब्ध कर्माचा होतो नाश। श्रीहरीच्या भक्तीने खास। शास्त्र नि संतवचन सांगती॥३०॥ ''एका जनार्दनी भोग प्रारब्धचा। हरीकृपे त्याचा नाश झाला॥ ऐसे म्हणती एकनाथ। त्याचा काय आहे अर्थ। हेची आम्हा यथार्थ। समजावूनी सांगावे॥३१॥ महाराज म्हणती ऐका शिष्य। भक्त, ज्ञानी यांच्या प्रारब्धाचा क्षय। वेगळा आहे निसंशय। तेची तुम्हा सांगतो॥३२॥ पांडव वनवासी असता। त्यांना तहान भूक व उष्णता। याचा त्रास न होता। सुख लाभले वनात॥३३। कां की भगवंत सहाय्यकर्ता। असल्यास दु:खे तत्वता। त्रास न देती मुख्यता। दुर पळती तयापासूनी॥३४॥ परमात्म्याचे सहाय्याने भली। अन्नपूर्णारुपी मिळाली थाळी। लाखो मानसाचे अन्न मिळी। स्वयंपाक व धुराचा त्रास न होता॥३५॥ शत्रूपासून संरक्षण स्वत: परमात्मा करीत जाण। दुसरे आल्यास अवशिष्ट प्रारब्ध असून। ते दग्धपट न्याये असते की॥३६॥ घडी जाळली नविन कापडाची। तरी ती तैसीच दिसते साची। परी नसते उपयोगाची। झाल्याचा प्रारब्ध कर्म तेणेपरी॥३७॥ ज्ञात्यास खरे



पाहता। देहभावना मुळीच नसता। प्रारब्ध कर्मही नसते तत्वता। याचे कारण तत्वता। याचे कारण सांगतो॥३८॥ स्वरुप ज्ञान जेव्हा होते। तेव्हा प्रारब्ध क्रियामान नासते। परि संचित असते। ऐसे शास्त्र सांगती॥३९॥ परि एखाद्यास बायका तिन। असता गेला मरून। दोन विधवा होवून। एक स्वासीन होते काय?॥४०॥ ऐसे आहे ज्ञात्याचे। स्वरुप ज्ञान झाल्या साचे। काहीच न उरायचे। परी शंका ऐशी की॥४१॥ काहीच शिल्लक नसल्यावर। तो जगतो कैसा साचार। यासी आहे एक उत्तर। ऐका ते शिष्यगण॥४२॥ नदी मिळते समुद्राला। परी ती दोन्ही तिराला। असलेली झाडी, मनुष्याला। आपुले जल देते की॥४३॥ ऐसेच महात्मे लोक करतात। त्यांचे पाप पुण्य दोन तिर आहेत। सेवा करणाऱ्यास पुण्य मिळत। निंदकासी पाप पै॥४४॥ ''लाभ अथवा हानी। येती घरासी चालूनी''। ऐसी आहेएक उक्ती। तैसे महात्मे कोणा काही न देती। आपआपले कर्तृत्वे घेती। पाप अथवा पुण्य पैं॥४५॥ स्वरुप ज्ञान झाले असता। जर देह ठेविला तत्वता। ज्ञान म्हणूनी जगता। काहीच शिल्लक नसते की॥४६॥ म्हणून महात्म्यास भगवंतांनी। आयुष्यपर्यंत दग्धपट न्यायानी। प्रारब्ध कर्म ठेवूनी। जगदोध्दारार्थ पाठविले॥४७॥ यावरूनी जाणावे ज्ञाती। संचित क्रियामान नसती। प्रारब्धाची तिच गती। जाणावे श्रोते हो॥४८॥ एके दिनी इच्छा ब्रम्हानंदांची। कसोटी पहावी नामदेवाची। म्हणोनी केली आज्ञाची। जवळ बोलावूनी तयाला॥४९॥ नामदेव जवळ येवून। उभा राहीला कर जोडून। महाराज म्हणती ऐसे पाहून। शिष्यपण याने होत काय॥५०॥ आपण करावी आज्ञा।

Scanned by TapScanner

करण्यास तयाची अवज्ञा। होणार नाही आमची प्राज्ञा।। ऐसे नामदेव बोलीला।।५१।। बरे, बरे, आज्ञा ऐकता जाणी। तर सिता जानकीचे मंदीरी जावोनी। आज झोपावे तुम्ही। नमस्कार करी नामदेव।।५२।। पोथी आणि आसन। आपले ताब्यात घेवून। सिता जानकीचे मंदिरी येवून। आसन टाकूनी बैसिला।।५३।। सुरू केले भजन। थोडावेळ जाता निघोन। चार लांडगे येवून। गुरगुर करू लागले।।५४।। तरी भजन न सोडता। बैसता झाला स्वस्थ चित्ता। लांडग्याचा बाजार संपता। गर्जना वाघाची ऐकिली।।५५।। नामदेव विचार करी मनात। तुकाराम महाराज म्हणतात। झाडाची पाने देखिल हालत। भगवंताच्या सत्तेने।।५६।। मग आपणास काय भिती। वाघ जरी देह खाती। तरी सत्कारणी लागती। जाळले असता भस्म होय।।५७।। पुरल्यास होती कृमी। परी पशुपक्षी भक्षीता जाणी। आत्मा तयांचा शांत होवूनी। विष्ठा होती तदनंतर।।५८।। जे व्हायचे ते जाईल होवूनी। आपणास काय त्याचेनी। ऐसा विचार करून मनी। भजनी निमग्न झाला।।५९।। शेवटी वाघ ओरडून। दारापर्यंत येवून। शेपटी आपटून आपटून। जाता जाहला मार्गाने।।६०।। रात्रीचे दोन वाजता। निद्रा येवू लागली असता। गेला निद्रीस्त होण्याकरिता। पोटासी साप झोपला।।६१।। मग उठला तेथून । बाहेरील टाक्याजवळ येवून। निद्रा केली असता जाण। अंगास मुंग्या चावती।।६२।। म्हणूनी सुर्योदयापर्यंत। बैसता झाला जागत। मुखी सद्गुरूचे नाम घेत। महाराज आले प्रात:काळी।।६३।। कायरे अंत:करण तुझे दगडाचे। एकटयाला करमले कैसे। आमचे सारख्यासी साचे। राहणे नसते जाहले।।६४।। बरे येथूनी चाल



आता। विरभद्राचे मंदिरी झाले नेता। पुढे काही दिवस लोटता। आज्ञा कडक केली ऐसी।।६५।। धैर्यवंत तुम्ही फार। आमची आज्ञा ऐकणार। तरी जावूनी डोंगरावर। उडी टाका तेथोनी।।६६।। ऐसे ऐकता साचार। करूनी सद्गुरू नमस्कार। चढूनिया डोंगरावर। उडी टाकीता जाहला।।६७।। जय सद्गुरूनाथ म्हणता। वरूनी खाली उडी टाकीता। तिळमात्र इजा न होता। दु:ख न होई किंचित।।६८।। जैसे पक्षी फिरती आकाशी। परी दु:ख न होई तयासी। तैसे होवूनी नामदेवासी। उभा ठाकला खाली येता।।६९।। येवून धावत धावत। स्वामीस घातले दंडवत। महाराज म्हणती तयप्रत। पुण्य जबर तुझे गा।।७०।। काशी यात्रा केली पायांनी। म्हणूनी इजा न होई तुजलागुनी। आम्ही उडी टाकता क्षणी। मृत्यू येता लवकर।।७१।। जरी मृत्यू न येता। तरी इजा होवूनी तत्वता। हातपाय मोडता । जाहला असता नामदेवा।।७२।। नामदेव बोली मनात। स्वामी काहीतरी बोलत। हेची सद्गुरू नाथाचे सामर्थ्य। वाचलो उडी टाकीता।।७३।। एकदा डोंगरावर असता सद्गुरू। मनासी आले साचारू। उपदेश करावा थोरू। मालवण शिष्यास।।७४।। म्हणूनी त्यास हाक मारी। तिन गावची मालगुजारी। असता जाण तुझ्याघरी। सर्वसंग त्याग का केला।।७५।। स्त्रि पुत्रादिक भाऊबंद पूर्ण। आईबाप तुला असून। तू मूळचाच श्रीमान। मग ऐसे का केले।।७६।। ऐकूनी ऐसे भाषणाला। पराकाष्ठेचा आनंद झाला। आणि मनात म्हणाला। दैव उघडण्यासी आली वेळ आता।।७७।। घर सोडूनी मी साचार। नरसोबाचीवाडी औदुंबर। राहीलो क्षेत्री गाणगापूर। दृष्टांत तेथे मज झाला।।७८।। जाई

Scanned by TapScanner

डोंगरावर कुंडलचे। दर्शन होईल श्री दत्ताचे। म्हणून चरणी देखिले तुमचे। येवूनी येथे सद्गुरू ॥७९॥ दत्त दर्शनाची मनीची आस। पुरवावी सद्गुरूनाथ। विनंती माझी आपणास। कर जोडूनी म्हणाला ॥८०॥ त्यास बोले महाराज। दर्शन देण्या रात्री तुज। श्री दत्त येणार । म्हणूनी सावध असावे ॥८१॥ ऐसे अमृततुल्य वचन। मालवणकरास ऐकून। आनंद झाला बहुगुण। पुढे घडले ते ऐका ॥८२॥ त्या मध्यरात्रीचे समयास। पुढे पसरला प्रकाश। दत्ताची मूर्ती तयास। दिसू लागली प्रत्यक्ष ॥८३॥ तिन शिरे सहा हात। झोळी होती बगलेत। शंख चंद्र गदा हातात। पायी खडावा शोभती ॥८४॥ सुवर्णमय जटा माथ्यावर। भगवी वस्त्रे अंगावर। ऐसी मूर्ती उभी समोर। भय वाटले मानसी ॥८५॥ कापू लागला थरथरी। महाराज महाराज हाका मारी। ऐशा स्थिती माझारी। अर्धातास राहीला ॥८६॥ हा खेळ जेव्हा संपला। महाराज पातले तयी स्थळा। म्हणती मालवणकर बुवाला। काय ओरडत होतास ॥८७॥ चावले का तुला काही। मालवणकर म्हणाला नाही। आपले वचना प्रमाणी पाही। दत्त दर्शन जाहले ॥८८॥ भितियुक्त आनंद झाला। म्हणूनी बाहीले तुम्हाला। महाराज म्हती तयाला। दत्तापेक्षा श्रेष्ठ मी का? ॥८९॥ पुण्य तुझे जबर म्हणून। दिले दत्ताने दर्शन। आम्हाला नाही अजून काळे की गोरे दिसत ॥९०॥ मालवणकर म्हणती सद्गुरूनाथा। आपली कृपा मजवरी होता। दत्त दर्शन झाले तत्वता। आपणासी मग कैसे न घडे ॥९१॥ येणे रिती स्वामीनी। दत्त दर्शन करवूनी। अनुगृह त्यास देवूनी। कृतार्थ केले मालवणकरा ॥९२॥ श्री शामसुंदर रचित। ब्रम्हानंद चरित्र सार ग्रंथ।



भक्ताचे दु:ख हरोत। ब्रम्हानंद कृपेने॥९३॥

॥इति श्री ब्रम्हानंद चरित्र सार॥

दशमोध्याय समाप्त

Scanned by TapScanner

# अध्याय अकरावा

।श्री गणेशायनमः।। श्री दत्तात्रेय नमः। श्री पांडुरंगा रुक्मिणीवरा। दया तुज का नये जरा। संत पिटती डांगोरा। दीनदयाळू म्हणूनिया।।१।। म्हणुनी आलो तुज शरण। परी तू दूर सारून। अव्हेरीसी मज कारण। दया न करी किंचीत।।२।। की पाहसी माजा अंत। की बैसला संत मंडळीत। की ऐकसी किर्तनाप्रत। तल्लीन तेथे जाहला।।३।। अंत जरी पाहसी। तरी पुरे करी त्यासी। लवकरी करी कृपेसी। दयासागरा दयाळा।।४।। कुंडलची मंडळी दर्शना येता। महाराज झाले विचारता। संत भंडारा वार्षिकरित्या। करित नाही काय हो।।५।। आम्ही करितो अन्नदान। परी पाणी आणावे कोठून। पाणी संपले दयाधन। म्हणून विचार चालला।।६।। पाणी नाही म्हणून। पाण्याचे नावानं ओरडून । अन्नदानाची तयारी पूर्ण। आहेकाय तुमची अगोदर।।७।। हो हो आहे तयारी आमची। पाण्याची बाब तुमची। तर मग तयारी करून लवकरची। यावे तुम्ही डोंगरावर।।८।। सर्व तयारी करून। आले डोंगरावरी घेऊन। टाक्यात पहाती डोकावून। घागरभर पाणी दिसतसे।।९।। विचार करू लागले। म्हणती महाराजांनी ठकविले। कणकीचे आता भले । काय करावे आपण।।१०।। मनातील हेतू जाणला। महाराज म्हणती तयाला। संत लोक जगाला। फसविणार काय की।।११।। स्वयंपाकाची वेळ बारा वाजता। पाणी मिळेल त्या



करिता। ऐसे बोल ऐकता। सर्पनाचे तयारीस लागले।।१२।। स्वयंपाक आहे रात्रीस। म्हणूनी झाले निद्राग्रस्त। महाराज छडी घेवूनी हातात। मंडळी जवळ पातले।।१३।। महाराजांनी फसविले म्हणती। छडच्या मारल्या अशाप्रती। पाच सहा होती ती।

उठून पहाते जाहले।।१४।। तो महाराज रागावले असती। स्वयंपाकास उठा म्हणती। भरलेली पाण्याची दोन टाकी। पाहूनी करी नमस्कार।।१५।। पुरे आता नमस्कार। स्वयंपाकास लागा सत्वर। मग स्वयंपाक करूनी तयार। दवंडी दिली भोजनाची।।१६।। सर्व करूनी भोजने। तृप्त केली अंतःकरणे। कुंडलचा बाजार असल्याने । पाच हजार मंडळी भोजनास।।१७।। पुरुष मंडळी पैकी उपवासी। राहीला कां कोणी ऐसी। चौकशी करता नकारासी। देते जाहले सर्वहीं।।१८।। अन्न अवघे दोनशे माणसाचे। परी अर्धेही न संपले साचे। स्त्रीयास बोलवा गावचे बाजारचे। सांगितले हराप्पा जंगमास।।१९।। आणि आपण गेले बोरगावास। स्त्रिया आल्या भोजनास। प्रसाद मिळून तयास। पुन्हा शिल्लक राहिला।।२०।। निर्जीव पदार्थावर सत्ता साची। असते महात्मे पुरुषाची। कथितो आता तेचि। अवधान द्यावे सर्वही।।२१।। शिष्यासह असता डोंगरावर। बाजार बेलवडे येथील साचार। भजनी मंडळी साठ सत्तर। गुरुचरणी हजर झाले।।२२।। महाराजास आनंद झाला। सांगुनी नामदेव शिष्याला। किर्तन भजन गजर करविला। नंतर तयारी भोजनाची।।२३।। भोजनास बैसविले मंडपात। म्हणूनी जय जय सद्गुरूनाथ। भोजनास केली सुरूवात। गडगडला मंडप विरभद्राचा।।२४।। नामदेव करी

Scanned by TapScanner

विचार। मंडप खाली पडला जर। सर्वांच्या समाध्या होणार। आरोप येईल सद्गुरूनाथा।।२५।। जाणूनी ऐसे सद्गुरूनाथ। नामदेवा जवळी येत। म्हणती भोजन करा यथास्थित। चिंता कोणी करू नये।।२६।। चिंता नका चिंतन करा। श्रवूनी ऐसी अमृत धारा। भोजन करिती समुदाय सारा। खुण पटली नामदेवा।।२७।। सर्वांची भोजने आटोपले। दिंडीला रवाना केले। शिष्य मंडळीस सांगितले। बाहेर कट्टयावर बसण्यास।।२८।। उठली मंडळी तेथून। बैसली बाहेर येवून। बाबांनो! खुशाल या मंडपाने। खाली आता पडावे।।२९।। ही आहे एकांताची वेळ। ऐकुनी निघाले शिष्यांचे बोल। खरोखर आता जर पडेल। तर चांगले होईल की।।३०।। अरे गम्मत पहा जरा। दृष्टीस पडते प्रकार सारा। ऐसे म्हणता मंडप थोरा। गडगड करूनी कोसळला।।३१।। ऐसी स्थिती पाहून। आश्चर्य करिती अवघेजण। सद्गुरूचा खेळ अजब पूर्ण। नवल मिळती बघाया।।३२।।

तुझीया सत्तेने वेदासी बोलणे। सुर्यासी चालणे तुझीया सत्ते।।१।।
ऐसा तू समर्थ ब्रम्हांडाचा धनी। वर्म हे जाणूनी शरण आलो।।२।।

ऐसेची आज स्वामींनी। प्रत्यक्ष अनुभव दाविला जाणी। मुखातुनी बोलल्याप्रमाणी। मंडप खाली कोसळला।।३३।। ऐसी स्तुती करीत। पोहचले सर्व घराप्रत। सद्गुरूचे अद्भूत सामर्थ्य। वर्णण्या मज नाही शक्ती।।३४।। एकदा नामदेवादिक शिष्यमंडळी। येवून बसले असता जवळी। अध्यात्म चर्चेस सुरुवात झाली। नामदेव विचारी प्रथम।।३२।। सर्व लोक उद्योग करिती। म्हणूनी



सुखरूप नसती। महाराज म्हणती खरे असती। परी रिकामे करमेना।।३६।। याच करिता हिंदू ऋषींनी। काढीले वेगवेगळे प्रकार शोधूनी। अंतरंग बहीरंग पुजा ध्यान धारणी। मानस पुजा समाधी।।३७।। सुर्यनमस्कार, पुराण श्रवण। तुळसी, प्रदक्षिणा, भजन पुजन। आत्मचर्चादिक किर्तन। ऐसे काढीले ऋषींनी।।३८।। सृष्टी' व्यवहार नियमीत। चालण्याकरिता अबाधीत। मर्यादारूपी कायदा करित। धर्माचा शिष्य हो।।३९।। तुझे म्हणणे ऐसे दिसती। उद्योग न करिता सुख लाभती। परी काही एक न करणे असती। मोठा उद्योग नामदेवा।।४०।। तो सामान्य माणसाचे हातून। होणे आहे कठीण। ऐसे ऐकता शिष्यगण। म्हणू लागले महाराजासी।।४१।। काही उद्योग न करिता। जर असेल खाण्यास मिळता। तर शांत राहील तत्वता। स्वामी देती उत्तर त्यासी।।४२।। छे छे वेडच्या जरी आयते। मनुष्यास खाण्या मिळते। तरी धडपड तळमळ करूनी ते। उदास होवूनी करिती वेडचा ऐसे।।४३।। त्यावर म्हणती नामदेव। याचा द्यावा अनुभव। आज्ञा करिती स्वामीराव। चार मजूर घेवून ये।।४४।। नामदेव गेला गावात। दुप्पट रोज मजुराप्रत। कबूल करून डोंगरावरून। घेवूनी आला स्वामीपुढे।।४५।। उद्योग सांगा यासी। महाराज म्हणती मुजरासी। विरभद्र. जवळचे ओवरीसी। शांत नि स्वस्थ बैसावे।।४६।। हालचाल न करा थोडीही। दुप्पट देवू रोजही। किती दिवस उद्योग पाही। माझे मर्जीवर जाणावा।।४७।। आगावू न्यावी मजुरी। मजूर बोलती अंतरी। ऐसा मालक आजवरी। आम्हासी न भेटला।।४८।। उद्योगहीं न ऐसा करी। परी वेळ आली खरी। करून पाहू या कसे तरी। जुळते की न जुळते

ते।।४९।। चौघे आले ओवरीत। बैसले स्वस्थ नी शांत। दहा पंधरा मिनिटाचे आत। धडपडू तळमळू लागले।।५०।। काही वेळाने मनात। कल्पना विचार सुचत । शांत न राहता बडबडत। राहीले येणे रिती।।५१।। काय रे गडचांनो आपल्याला। ऐसे बसवत नाही बोला। काही तरी करा गोष्टीला। मग गोष्टी सांगू लागले।।५२।। ऐसा गेला काही वेळ। मांडीस लागली कळ। लांबलचक केले पाय। तरी समाधान होईना।।५३।। उठ बस करू लागले। कोणी लघविस जावू लागले। कोणी तंबाखू ओढू लागले। ऐसे नाना प्रकार।।५४।। बाराचा वेळ झाला। साखर भाता स्वयंपाक केला। स्वामींनी दिला सर्वाला। आनंदाने केले भोजन।।५५।। मजूर म्हणाले स्वामीस। दुसरा उद्योग द्या आम्हास। ऐसा उद्योग आमचे बापास। होणार नाही कदापी।।५६।। हात वेडे हो उद्योग हा मजेशीर। दु:ख न तिळभर। ऐसे असूनी साचार। वाईट का मानता।।५७।। ऊन थंडी पावसात। कामे करीत असता नित्य। त्यापेक्षा वाऱ्यात सौख्य । तुम्हा नाही काय।।५८।। दुप्पट रोज मिळून। आनंद राहता बसून। उठा जा उद्योगालागुन। जाते जाहले निमुटपणे।।५९।। बसले जावून ओवरीला। म्हणती काय हा त्रास झाला। धडपड तळमळ जिवाला। म्हणे सुर्या मावळ बापा लवकरी।।६०।। संध्याकाळ पर्यंत बसले। इतक्यात महाराज आले। म्हणती उदयीक हाजर झाले। पाहिजे आपले कामावर।।६१।। चौघे देती उत्तराला। हाच जर उद्योग असला। तर तोंड न दाखविन तुम्हाला। दुसरा सांगा कोणता।।६२।। दगड फोडणे, चिखल करणे। ऐसी कामे आम्हा सांगणे। रोजही एकपट देणे। तरी करू आनंदे।।६३।। हा वृत्तांत



ऐकण्यास । जवळ बोलविली नामदेवास। दाखविले अनुभवास। खात्री पटवून स्वामींनी।।६४।। मग सांगितले मजुरास। मजुरी मागा विरभद्रास। देव कैसे देईल आम्हास। विचार करी मजुर ते।।६५।। परी एक मजूर आता गेला। आठ रुपये सापडले तयाला। तो विचार करी मनाला। चार दाखवावे सोबत्यास।।६६।। चला म्हणे सर्व घरी। देईन म्हणे तेथे मजुरी। ऐसे ऐकूनी सारी। मार्गाला लागली।।६७।। त्याचे जवळचे पैसे । सर्व झाले नाहीसे। जाणूनी तो ऐसे। विचारात पडीयेला।।६८।। तैसे सांगून सोबत्यास। विचार करीत बैसे रस्त्यात। महाराजांनी पाहून त्यास। हाक सर्वास मारिली।।६९।। विचारिता महाराजांनी। हकीकत सांगितली त्यांनी। क्षमा करूनी स्वामींनी। दोन दोन रुपये दिले प्रत्येकास।।७०।। करूनी स्वामीस नमस्कार। घरा गेले मजूर। निरूद्योग हा धंदा थोर। जाणतील सुज्ञ जन।।७१।। श्री शामसुंदर रचित। ब्रम्हानंद चरित्र सार ग्रंथ। जना लावो भक्तीमार्गात। हिच माझी प्रार्थना।।७२।।

।।इति ब्रम्हानंद चरित्र सार ग्रंथ।।

।।एकादशोध्याय।। समाप्त

Scanned by TapScanner

## अध्याय बारावा

श्री गणेशायनमः।। श्री दत्तात्रेय नमः।। जय जय विठ्ठल आई। तुझी सत्ता सर्व ठायी। लेकराचा अंत पाही। धावून यावे सत्वर।।१।। तुची जगताचा त्राता। तुची जगताचा पोषिता। ऐसे असूनी तत्वता। मज का सांडिले मायबापा।।२।। माझी दुःखे परिपूर्ण। जाळी कृपाकृशाने करून। यासी ना तुज कठीण। अनाथनाथा पंढरीनाथा।।३।। साफ करिते घानीसी। म्हणूनी धुणे येते जलापाशी। तैसेची तुझे चरणाशी।लिन मी जाहलो।।४।। एकदा नामदेवाचे मनी भले। आले हरभरे खाण्याचे ओले। त्यासी कैसे बोधा केले। तेची आता परिसावे।।५।। तैसेची झाड असता केळीचे। रामफळ लागले साचे। ऐसीया कथेचे वर्णन ऐका थोडेसे।।६।। डोंगरावर असता स्वामी। म्हणती नामदेवास बोलावूनी। हरभऱ्याची उसळ जाणी। खाण्याची इच्छा आम्हास।।७।। आता आहे चैत्रमास। ताजे हरभरे कोठे त्यास। मिळतील म्हणे स्वामीस। नामदेव शिष्य पै।।८।। अरे आपल्या जवळ आहे पाणी। चंद्राबाई जवळ वी जाणी। मग लावण्यास आळस कोणी। कां करावा नामदेवा।।९।।वाळूत बी लावले । दररोज पाणी घातले। अठ्ठावीस दिवसांनी झाले। डहाळे उत्तम तयार।।१०।। दाणे त्याची काढीली। उसळ तयार केली। खाण्यास सुरूवात केली।



शिष्यासह स्वामींनी।।११।। खाता खाता जाणी। महाराज बोले वचनी। सांगली संस्थानचे राजे असूनी। तात्यासाहेब जाणं पां।।१२।। त्रिकाल स्नान संध्येता। ते आहे निष्णात। परी आमचे जैसे भिकारी संत। कैसी इच्छा करतात।।१३।। ऐसे बोलता क्षणी। नामदेवाचे अंतःकरणी। प्रकाश पडला जाणी। हे बोलणे आपल्याला।।१४।। ओले हरबरे खाण्याची। इच्छा आपले मनीची। जाणती सद्गुरू नाथची। म्हणूनी ऐसे बोलले।।१५।। स्वामीस करूनी नमस्कार। म्हणे ऐसी इच्छा ना करणार। आपण इच्छा रहीत साचार। माझेसाठी हे सर्व केले।।१६।। परी माझे मनीची। एक इच्छा आहे साची। सांगतो तुम्हा तेची। परिसावे सद्गुरु।।१७।। तुकाराम बुवा नांगराळ करनी। पाच सहा खुंट जाणी। केळीचे लावले म्हणूनी। मी त्या सांगितले।।१८।। ह्या केळीस पाणी। नित्य आपण घालूनी। फळ त्या येईल जाणी। परी सद्गुरुस नावडते।।१९।। म्हणूनी माझे कष्ट व्यर्थ। ऐवजी रामफळाचे यथार्थ। झाड लाविता सार्थ। जाहले असते की।।२०।। त्यास रामफळ आले असते । सद्गुरू ते सेविते। कष्टाचे सार्थक पुरते। झाले असते माझ्या की ।।२१।। नामदेव ऐसे बोलोनी। स्तब्ध राहिला बैसोनी। जाणीली महाराजांनी। अंतरीची मात तयाच्या ।।२२।। नामदेवाचे अंतःकरणी। तयार झालेले आपले कष्टांनी। फळ दयावे मजकरणी। आहे ऐसे दिसतसे ।।२३।। मग म्हणती तयाला। एक मंत्र सांगतो तुला। त्याने केळीचे झाडाला। रामफळ येते की ।।२४।। विरभद्रराया पडतो मी पाया। केळीचे झाडास रामफळ या या। ऐसा तो मंत्र आहे की ।।२५।। हा मंत्र वेळा सात। म्हणावा पाणी घालीत।

Scanned by TapScanner

केळीचे झाडा फळ येत। रामफळाचे निश्चित॥२६॥ नामदेवानी तैसे केले। काही काळानी पाहीले। त्यास कमळ आलेले। नंतर रामफळ॥२७॥ ऐसा पाहूनी चमत्कार। लोका वाटले नवल फार। एकविस दिवसांनी साचार। रामफळ पिकले पैं॥२८॥ नामदेवा हाते तोडोनी। भक्षिले ते महाराजांनी। सर्वास प्रसाद वाटूनी। चवी त्याची दाखविली॥२९॥ केळीचे झाडास रामफळ। कधि का ऐसे घडते। परी सद्‌गुरुचे सबळ। ऐसे घडते श्रोते हो॥३०॥ तैसेची असला पापी चांडाळ। उध्दारण्यासारखा नसेल। सद्‌गुरूची कृपा असेल। तर तो उध्दारतो निसंशय॥३१॥ सद्‌गुरूचे वचनावरी। विश्वास ठेविला पूर्ण जरी। चांडाळ पापी असला तरी। उध्दार होतो तयाचा॥३२॥ विश्वासाची जाती। तेथे वसती देवची। ऐसी सबळ निष्ठा साची। तारिते मानवा॥३३॥ तुका म्हणे आले समर्थाचे मना। तरी होय राणा। रंक त्याचा॥३४॥ तुकारामाचे वचनाप्रमाणी। जर का आले सद्‌गुरूचे मनी। जे न घडे तेची जाणी। घडविती सद्‌गुरु सामर्थ्य॥३४॥ नामदेव म्हणे एकदा। योगाचा अभ्यास मज द्या। महाराजांनी कोठडीत तया। बसण्यास सांगितले॥३५॥ संथा दिली योगाची। मग प्राणायाम करण्यासाची। आरंभ केला त्यानेची। सद्‌गुरु आज्ञेने॥३६॥ आहारासाठी महाराजांनी। पुजाऱ्यास दिले सांगुनी। अर्धा शेर दूध आणूनी। देत जावे दररोज॥३७॥ ऐशारीती सहा सात महिन्यांनी। अर्धा पाऊण तास पर्यंत जाणी। प्राणायाम कुंभक करण्यालागुनी। तयार तो जाहला॥३८॥ एके दिनी प्रकार घडला। तोची कथितो इथे स्थला। कुंभक प्राणायामाचे बाहेर झाला। भान नसे तयासी॥३९॥ वायू



तुफान होवून। ब्रम्हरंध्राकडे जावून। स्थिर जाहला जाण। एक दिवस एक रात्र॥४०॥ दुसरे दिवशी दहा वाजता। हराप्पा जंगम झाला येता। तो पहिले दिवशीचा लोटा। दुधाचा होता तैसाची साचा ॥४१॥ हि काय भानगड आहे। दुध कैसे शिल्लक पाहे। ऐसे विचारूनी तोहे। नामदेवास मारी हाकेला॥४२॥ नामदेवाने ना आवाज दिला। म्हणून तपास करू लागला। योगाचे कोठडीकडे गेला। ती बंद आतून॥४३॥ जोराने हाका मारिल्या पाही। तरी हालचाल दिसली नाही। संशय आला त्याही। नामदेव मृत जाहला॥४४॥ प्राणायामाचे साधन। कमी जास्त होवून। नामदेव पावला मरण। आपण येथे न बैसावे॥४५॥ कळवावे गावातील लोकास।किंवा फौजदारास। नाहीतर आपणास। खून केला म्हणतील॥४६॥कां की पुजारी डोंगरावर। आपण करूनी विचार। निघाला तेथूनी सत्वर। गावाकडे येण्यास॥४७॥ महाराज होते कोल्हापूरी। तयांना अंतर्ज्ञाने लवकरी। मात कळली सारी। जी कां घडली डोंगरावर॥४८॥ मनोवेग सिध्दीचा। उपयोग करुन साचा। मार्ग आक्रमीला डोंगराचा। कोल्हापूरवरून॥४९॥ कुंडलचे वेशीत। येता पायी चालत। निघाले डोंगरावत। योगीराज ब्रम्हानंद॥५०॥ येत असता डोंगरावरी मध्येच भेटला पुजारी। अरे वेडचा अपकिर्ती साचारी। आमची करण्या निघाला कां॥५१॥ पुजाऱ्यासह गेले डोंगरावर। दारासी मारली ठोकर। हाक मारिता सत्वर। दार उघडी नामदेव॥५२॥ महाराजास नमस्कार करून। उभा राहिला हात जोडून। महाराज म्हणती तया लागुन। समाधी केंव्हा लागली॥५३॥ याची आठवण आहे

Scanned by TapScanner

कायी। दुधाची दोन भांडी पाही। आजचा वार कायी। नामदेव म्हणती शनिवार॥५४॥ मग बाजार कैसा कुंडलचा। तो तर असतो रविवारचा। काय या भानगडीचा। उलगडा तूज झाला काय॥५५॥ आता प्राणायामास कृष्णार्पण। टाकावे तू करून। नाहीसा झाल्यावर देह सगुण। माझी अडचण तुज पडेल॥५६॥ सन्निध असल्याशिवाय योगनिष्ठ गुरू। योगाचा थभ्यास नये करू। केवळ ध्यान धारणा करून सुरू। सहजावस्था मिळवावी॥५७॥ गुरू खेरीज प्राणायाम करती। तयाची डोकी बिघडली। कितीकांची प्राणहानी होती॥५८॥ ब्रम्हरंध्री अडकला। त्याची परिक्षा न करता। म्हणती मेला आता। व्यवस्था करिती अखेरची॥५८॥ स्वानुभवातून सांगतो हे। आता तुझा एक हेतु आहे। त्याची पुर्तता पाहे। माझे कृपेने होईल॥५९॥ सद्गुरूचे वचनावरूनी। प्राणायाम सोडला नामदेवानी। सद्गुरूची ध्यान धारणा करूनी। निवांत तो राहिला॥६०॥ आता ऐका कथा। चंद्राबाईंची तत्वता। फुकट यात्रा झाले करविता। तिये लागुनी॥६१॥ एकदा चंद्राबाईने। स्वामी जवळ धरले धरणे। तिर्थ यात्रा आहे करणे । मजकारणे स्वामीया॥६२॥ नाशिक,पंढरपूर,त्र्यंबकेश्वर। ऐसी तिर्थे करणार। आज्ञा द्यावी सत्वर। जा म्हणूनी सांगितले॥६३॥ करुनी क्षेत्र पंढरपूर। वैष्णव लोकांच्या दिंडी बरोबर। जाण्या निघाली त्र्यंबकेश्वर। पायतळी चालत॥६४॥ मध्ये आला ज्वर तिशी। वैष्णवे गाडी घोडचासी। न आणता वृक्ष छायेसी। ठेविले पडून तियेस॥६५॥ वैष्णव गेले पुढे निघुन। वृतांत जाणिला स्वामींनी। परिपूर्ण अंतर्ज्ञानानी। चंद्राबाई पडलेली वृक्षाठायी॥६६॥ ध्यान करिते



आपले। ऐसे समजता वहिले। एकतीस कोसावर असलेले। नाशिक क्षेत्री अवतरले पै॥६७॥ आपल्या योग प्रभावानी। पाव तासाचे आत जाणी। ठेविले नाशिक क्षेत्री नेवूनी। चंद्राबाईस॥६८॥ नाशिकचा भटजी अनंत। घेवून गेले गंगेत। संकल्प सांगितला यथास्थित । परी पैसा नाही जवळ तिचे॥६९॥ अनंत म्हणे चंद्राबाई। तुझी यात्रा फुकट पाही। पैका आम्हा पाहिजे नाही। उभी राहिली स्नान करून॥७०॥ देवालयात दिली जागा करून। दोन वेळ ताजे अन्न । देई चंद्राबाईस आणून। याचे कारण ऐसे पहा॥७१॥ दृष्टांत दिला प्रभू रामचंद्रानी। त्या बाईची यात्रा फुकट जाणी। तिची बरोबर सेवा करूनी। व्यवस्था ठेवावी अनंता॥७२॥ नाहीतर तुझा नाश। पाहूनी ऐशा दृष्टांतास। अनंत लागला सेवेस। चंद्राबाईच्या॥७३॥ तिसरे दिवशी बाराला। दिंडी समाज पोहचला नाशिकला। पाहूनी तेथे चंद्राबाईला । विचारीते झाले ओळखणारे॥७४॥ आपण येथे केव्हा कसे आला। चंद्राबाई देती उत्तर त्याला। मी आपले परवाला। कैसे आले नेणती मी॥७५॥ मंडळीस वाटला चमत्कार। हि असता बिमार। वृक्षाठायी पडून साचार। समोर कैसी पोहचली॥७६॥ भेटला असावा खरोखर। हिस सद्गुरू परमेश्वर। पुढे चंद्राबाई त्र्यंबकेश्वर। पायी करिती जाहली॥७७॥ श्री श्यामसुंदर रचित। ब्रम्हानंद चरित्र सार ग्रंथ। भक्ताचे पुरवो मनोरथ। गुरूकृपा प्रसादे॥७८॥

॥ इति श्री ब्रम्हानंद चरित्र सार ग्रंथ॥

द्वादशोध्याय समाप्त

Scanned by TapScanner

## अध्याय तेरावा

श्री गणेशायनमः।। श्री दत्तात्रेय नमः।। जय जय श्री अनंता। पंढरीनाथा रूक्मीणी कांता। का धरली निष्ठूरता। मज कारणे दिनबंधू।।१।। नामदेवास लागता तहान । सत्वर गेलासी धावोन। विहीरीत जल आणून। तृष्णा शमविली तयाची।।२।। नरसी मेहता दरिद्री असती। व्याह्याकडे कार्यास जाती। सर्व पाहूणे चेष्टा करिती। म्हणून पाठविला अहेर।।३।। ऐसा भक्तांचा कनवाळू। दीन जनांचा कृपाळू। मज का गा वेल्हाळू। अव्हेरीसी दयाळा।।४।। महाराज असता औदुंबरी। नामदेवादीक शिष्य बरोबरी। नामदेवास विचारी। नित्य काय वाचतो।।५।। होण्याचे अगोदर आपले भेटी। नाटके कादंबऱ्या कल्पीत गोष्टी। हरिविजय पांडवप्रताप पोथी। भक्तीविजय वाचीत होतो।।६।। जेव्हा दर्शनाचा लाभ झाला। पातंजलयोग हट स्वानंद रामराज्याला। दोन प्रहरी वाचितो।।७।। चरित्र आपुले प्रितीनी। लिहिलेले राजाराम बापूंनी। नित्यपाठ प्रतिदिनी। वाचितो स्वामीजी।।८।। यातील एका ओळीचा अर्थ पाही। मला काही समजत नाही। तोची आपण लवलाही। समजावूनी सांगावा।।९।। संकट समयी गुरूराज पडे कामा। तोची जाण खरा परमात्मा। त्यासीच देवाची उपमा। गुरू ओळखून करिणे।।१।। ऐसी आहे ती ओवी। बाबारे यास तू अनुभवी। थोडेच दिवसात बरवी। ऐसे स्वामी बोलीले।।१०।। या अमृततुल्य बोला।



लिहून ठेवी हृदयपटला। नामदेव शिष्य भला। ऐका पुढील कथेसी।।११।। काही दिवस लोटले। नामदेवासी आज्ञाविले। तिर्थयात्रेसी पायतळे। जावूनी यावे तु गा।।१२।। सद्गुरू आज्ञा ऐसी होता। करूनी साष्टांग दंडवता।। नाशिक त्र्यंबकेश्वरी झाला जाता। नामदेव शिष्य पैं।।१३।। इकडे स्वामी विचार करी। दत्ताची जी सेवाधारी। त्यांच्या अनुष्ठाना नुसारी। फल दिले पाहिजे।।१४।। औदुंबरातील सेवक जनास। कोणास झाले सहामास। एक दोन साल कोणास। चार सहा वर्षे अनुष्ठानमासी।।१५।। ज्यांच्या त्यांच्या इच्छेनुसार। फल द्यावे करूनी विचार। आत्माराम व बापूला साचार। सेवक बोलविण्या सांगितले।।१६।। दोघेही गेले त्वरीत। अनुष्ठान धारका सांगितली मात। ब्रम्हानंदची आहे दत्त। फल मागावे तयासी।।१७।। श्री दत्ताच्या नावानी। अनुष्ठान केले ज्यांनी। आपले इच्छेनुसार त्यांनी। फल मागावे महाराजा।।१८।। सर्व अनुष्ठान धारकास। आणिले नरसोबाचे वाडीस। फल मागण्या स्वामीस। पुढे केले एकेका।।१९।। एक सेवक बोलती। माझा हेतू ऐसा असती। दहा हजार कर्ज मजवरती। आहे वडिलांचे हातचे।।२०।। ते फिटावे माझे कडून। स्वामीने तथास्तू म्हणून। बारामहिन्याचे आत जाण। फिटेल कर्ज सांगितले।।२१।। जा आता येथून। दुसरा सेवक बोले येवून। माझे उदरी शूळ कठीन। तो बंद व्हावा स्वामीजी।।२२।।बारा महिने केले अनुष्ठान। महाराज म्हणती तयालागून।तिन दिवसाचे आत आजपासून। शूळ तुझा जाईल की।।२३।। तू जावे आता अनुभव घेवूनी पूरता। झाला तेथूनी तो जाता। आपुल्या गेहाकारणे।।२४।। कोणी म्हणती वाद

Scanned by TapScanner

शेतीचा। तोची बाजूला व्हावा साचा। कोणी वडिलाचे इस्टेटीचा। दिसावा म्हणती गुप्त भाग।।२५।। कोणी म्हणती पुत्र व्हावा। कोणी पांढरा कोड जावा। घरी अन्न पुरवठा व्हावा। नंपुसकत्व जावे म्हणती कोणी।।२६।। त्यांचे त्यांचे इच्छेप्रमाणी। आशिर्वाद दिले स्वामींनी। तैसे फळ मिळाले म्हणोनी। बातम्या येत असे की।।२७।। असो सेवक राहिले दोन। पुजारी म्हणती तयालागून। सांगा आता तुमचे प्रश्न। स्वामीजवळ काय ते।।२८।। ते उत्तर देती फाकडे। आम्ही मानवरूपी दत्ताकडे। येत नाही आमचे कोडे। काय ते सोडविणार।।२९।। डॉक्टर ऐसी माहिती। त्यांना सांगावी लागती। मग दत्त कैसे असती। आणि काय ते देणार।।३०।। पुजाऱ्याचे मनात। राग आला अतोनात। सांगू लागला स्वामीप्रत। मगरमस्त दोन राहिली।।३१।। ते भलते सलते बोलत। ऐकूनिया ऐसी मात। स्वामी आले ओवरीत। जेथे होती ती दोघे।।३२।। पाच मंडळी थोर थोर। होती तयांचे बरोबर। एका बोलले वाचे मधूर। काय ते परियेसा।।३३।। नारायण तू पाटणचा असूनी। दुष्ट वासना तुझे मनी। चुलत भाऊ लवकर मरूनी। इस्टेट तयाची मिळावी।।३४।। ऐसी दुष्ट वासना धरून। मांडीले तू अनुष्ठान। सहा मास परिपूर्ण। परि उपयोग नाही तयाचा।।३५।। जरी वीस वर्षे राहिला। दत्त न पुरवी तव इच्छेला। ऐकून तो खजिल झाला। बैसला अधोवदन।।३६।। ऐकूनी ऐसे भाषण। चकीत झाले सर्वजण। दत्त अवतार जाणा असवा खरोखरी।।३७।। दुसरे सेवकास झाले बोलता। येथून व्हावे तू चालता। साताऱ्याचा असूनी तत्वता। दुष्ट हेतूने राही नवमास।।३८।। चल चालता हो येथून। गेला निमूटपणे निघून।



लोक म्हणती स्वामी लागून। दुष्ट हेतू काय त्याचा।।३९।। पर स्त्री या चांडाळांनी। जवळ राहावी म्हणूनी। स्वस्त्रीस विष देवूनी। मारूनी टाकीले असती पै।।४०।। ती पर स्त्री सांप्रत। दुसऱ्या जवळ राहीली असत। प्राप्त करूनी देईल दत्त। म्हणूनी राहिला येथे।।४१।। ऐसे बोल ऐकता। त्या सेवकास झाले गाठीता। खूप सपाटे मारिता। म्हणून लागले तयासी।।४२।। ज्या स्त्रीसाठी। विष घातले स्वस्त्रीपोटी। ती येतआहे तुजपाठी। ऐसे म्हणूनी पिटाळीले।।४३।। असो ऐशारिती स्वामी। सेवकाचा अधिकार जाणूनी। फल देत तयालागुनी। वारंवार भेटूनिया।।४४।। पुढे डोंगरावर जावूनी। बैसले असता अंत:करणी। नामदेवास संकट पडते म्हणोनी। संस्कार होवू लागले।।४५।। तेव्हा त्यांनी मनोवेगानी। त्र्यंबकेश्वराचे डोंगरावर जावूनी। लक्ष्मण कुंडाजवळ प्रगट होवूनी। प्राण संकटातूनी वाचविले।।४६।। तो आहे ऐसा प्रकार। एका ढोंगी संन्याशाबरोबर। नामदेवाचा वाद साचार। झाला असती जाण पां।।४७।। त्या ढोंग्याचे आले मनी। नामदेवासी द्यावे लोटूनी। या उंच डोंगरावरूनी। आठविली ओवी नामदेवा।।४८।। महाराजाचे केले स्मरण। तेव्हा तेथे प्रगट होवून। वाद दिला मिटवून। आणि संन्याशास सांगितले।।४९।। तुम्ही संन्याशी म्हणजे नारायण। तर उडी टाका या डोंगरावरून। संन्याशी बोलत स्वामी लागून। तुम्हीच उडी टाकावी।।५०।। उडी टाकीली स्वामीनी। संन्याशी घाबरला मनी। नामदेवास म्हणा पळा येथूनी। चालले दोघे खालती।।५१।। तेव्हा महाराज तया दिसले। विडी ओढीत बसलेले। दोघे तयांचे जवळ गेले। महाराज बोलती संन्यासाशी।।५२।। नपुंसक

Scanned by TapScanner

म्हणूनी संन्याशी झाला। गोपीचंदन लावा त्याला। उठोनी आले स्टेशनाला। नामदेवा बरोबर।।५३।। भयंकर गर्दी तेथे। तिकीट काढीली नामदेवा हाते। येवून एका डब्याते। बैसते झाले दोघेही।।५४।। नामदेवा डब्यात पाही। कोणीच आता येणार नाही। खरेच न आले कोणीही। कुंडलचे स्टेशनपर्यंत।।५५।। स्टेशनावर उतरले। पायी डोंगरावर पोहोचले। चंद्राबाईनी विचारले। काय हो नामोजी काय झाले।।५६।। सद्गुरूचा धावा का केला। ऐकूनी अश्रू गाळला। महाराज म्हणती तयाला। ओवी अनुभवास आली ना।।५७।। सद्गुरूस घातला दंडवत। मुखाने होय म्हणत। चंद्राबाईस कथिली हकीकत। जी का घडली त्र्यंबकेश्वरी।।५८।। श्री शामसुंदर रचित। ब्रम्हानंद चरित्र सार ग्रंथ। भाविका होवो आदर्शभूत। ब्रम्हानंद कृपेने।।५९।।

।।इति श्री ब्रम्हानंद सार ग्रंथ।।

त्रयोदशोध्या समाप्त



## अध्याय चवदावा

श्री गणेशायनमः।। श्री दत्तात्रेय नमः। जय जय श्री कृष्णराया। देवकीसुता करा दया। कंसातका करूणालचा। निष्ठूर का झालास।।१।। अर्जुनाची घोडी धुतली। कबीराचे शेले विणीली। जनिची दळणे दळीली। धावूनी रक्षी द्रौपदीस।।२।। ऐसा देवा तू दातारू। भक्तांना कल्पतरू। अससी नको अव्हेरू। मजसी मागणे तूज पाशी।।३।। एकदा प्रकार काय घडला। तोची कथितो तुम्हाला। करूनी एकाग्र चित्ताला। परीसा तुम्ही श्रोतेहो।।४।। येसु गोंदिल नावाचा। एक भक्त स्वामीचा। आला डोंगरावरी साचा। महाराजा भेटण्यास।।५।। ज्याची माता पावली मरण। ऐसे सहा मासाचे मुल आणून। म्हणती स्वामी कारण। सांभाळ याचा करावा।।६।। जैसी गेली याची माता। तैसाची जर हा मरता। तर आपले सेवेकरीता। अडचण नसती राहीली।।७।। म्हणती महाराज चंद्राबाईला। सांभाळ तू या मुलाला। साठ वर्षे या देहाला। दूध कोठून असणार।।८।। कैसे होईल पोषण। बोले चंद्राबाई कर जोडून। महाराज म्हणती तिजलागुन। ऐक वचन चंद्रबाई।।९।। आपले मूल समजून। जर का केले पोषण। दुध फुटते जाण। ऐसे चंद्राबाईस बोलती।।१०।। म्हणूनी सांगतो तुज। सांभाळ तू याज। ऐसे बोलता महाराज। चंद्राबाईस म्हणतसे।।११।। जरी सांगितले आजे पणज्याने। तरी त्यांचे बापाचेने।

Scanned by TapScanner

बोलून देणार। आम्हासही बोलू देवू नको॥४२॥ आणि आपले डोळे झाकले। तिन तासांनी उघडीले। आरती केली भजन आटोपले। घरी गेले सर्वही॥४३॥ पुन्हा तिसरे दिवशी। सुरू केले उत्सवासी। बोलाविले समाप्तीसी। दुरदुरच्या भक्तास॥४४॥ सातारा, कोची, कोल्हापूर, बेळगाव, हुबळी, संकेश्वर। येथच्या मंडळीस साचार। चिठ्ठया पाठवून बोलाविले॥४५॥ सर्व भक्त मंडळी आली। नामदेवांनी विचारणा केली। महाराज म्हणाले तार आली। याचा अर्थ काय हो॥४६॥ कोल्हापूरचे मंडळींनी। सांगितले तयालागुनी। कँप बावडया मध्ये जाणी। बापूराव शिंदेच्या वाडयात॥४७॥ फाल्गुन शुध्द ९मीस (नवमीस) रात्री दहाचे वेळेस। महाराज आले लग्नास। फराळही दिला तेथे॥४८॥ त्यांच्या भक्ती प्रेमानी। फराळ केला स्वामींनी। रात्री बाराला तेथोनी। गुप्त झाले क्षणात॥४९॥ बाळोबा हलवाई सातारचे। म्हणाले माझे घरचे। लग्नास आले मुलीचे। त्याच तिथीस अकरा वाजता॥५०॥ हे सर्वांनी ऐकिले। आश्चर्य तयासी झाले। दोघांनाही समक्ष विचारिले नामदेवाने लगीच॥५१॥ दोघाहीकडे एकाच तिथीस। महाराज आले कार्यासि। खराखोटा कोण आहेस। सांगा मज तुम्हीच॥५२॥ बापूराव म्हणाला शंभर। लोकांचा पुरावा साचार। दोनशेचा सातारकर। पुरावा देतो म्हणतसे॥५३॥ पुरावा पाहीजे कशास। मालवणकर बुवा छोटूबुवास। चंद्राबाई राजेबापूस। विचारा म्हणजे संपले॥५४॥ पाहूनी ऐसा प्रकार। म्हणाला अण्णा आष्टेकर। खुद्द महाराजास विचार। गोंधळ कशाला घालता॥५५॥ महाराजाजवळ जावून। विचारिले नत होवून। गेले होते का कोल्हापुरा



साताऱ्यालागुन। सांगावे आम्हासी स्वामीजी॥५६॥ महाराज म्हणाले लबाड। कोल्हापुरकर लबाड। सातारकर लबाड। लबाड आहे सारेची॥५७॥ कुंडलची मंडळी लबाड। साधुमंडळी लबाड। सारे जग लबाड। लबाड आहे तुम्ही आम्ही॥५८॥ म्हणणारे लबाड। ऐकणारे लबाड। सांगणारे लबाड। लबाड एकूण बेरीज॥५९॥ एकदा नामदेव बाजार बेलवडयाला। गेला तेथून कोल्हापूरला। आला असता समजले त्याला। गोकुळ अष्टमी आजची॥६०॥ मनी विचार केला साचा। जन काल्पनिक कृष्णाचा। करण्यापेक्षा सद्गुरूचा। मुखचंद्र का पाहू नये॥६१॥ कृष्ण जन्म करूनी आनंद। मानवापेक्षा सुखद। कृष्ण अवतार ब्रम्हानंद। दर्शन त्यांचे घेणे पै॥६२॥ आजचा असेल सुदिन। भाग्य माझे असून। ब्रम्हानंद देतील दर्शन। डोंगरावरी आज मला॥६३॥ ऐसा विचार केला। घेतले फराळाचे सामानाला। स्टेशनावरी निघाला। येण्याकारणे डोंगरास॥६४॥ रस्त्यात भेटला टांगेवाला। नामदेव विचारी तयाला। कुंडलची गाडी आम्हाला। भेटेल काय बापू रे॥६५॥ टांगेवाला देती उत्तर। त्या गाडीचे आणिले मी पॅसेंजर। तुम्ही पैदल केव्हा पोहोचणार। स्टेशन येथून तीन मैल॥६६॥ आजचा दिवस व्यर्थ जाणार। सद्गुरूचे दर्शन नाही होणार। ऐसा मनी येवूनी विचार। वाईट तया वाटले॥६७॥ सद्गुरूचा धावा करीत। आला स्टेशनावरी चालत। तयी समजले तयप्रत। इंजिन रुळावरून घसरले॥६८॥ म्हणून गाडी स्टेशनावर। उभी आहे साचार। ऐकूनी हा समाचार। आनंद तया वाटला॥५९॥ धन्य धन्य सद्गुरूनाथ। ऐसे म्हणूनी तिकिट काढीत। जावून बसला गाडीत। गाडीस उशिर पावणे तीन

तास॥७०॥ अखेर गाडी सुटली तेथून। पोहचली कुंडलला येवून। तो गाडीतून उतरून। गेला दर्शना स्वामींच्या॥७१॥ स्वामींचे दर्शन घेवून। उभा राहीला कर जोडून। स्वामी म्हणती तयालागुन। आता कैसा आलासी॥७२॥ ही गाडीची वेळ नसूनी। कैसा पोहचला येवूनी। स्पेशल गाडी रेल्वेवाल्यांनी। तुझ्यासाठी सोडली काय॥७३॥ नामदेव बोलला स्वामीस। गाडी लेट कऱ्हाडास। अरे तपश्चर्येचे फळ खास। तुझ्या हे असावे॥७४॥ तसे नव्हे सद्गुरूनाथा। उत्सवाची तळमळ जाणता। गाडीस लेट करूनी तत्वता। आपुले दर्शन दिले मज॥७५॥ बरबरे पितळेचे लाडू आम्हास। फराळास आणले ते द्यावेस। लाडू पितळेचे नाहीस। केशराचे आहेत स्वामीजी॥७६॥ ऐसे म्हणून लाडू काढीत। स्वामी समोर ठेवीत। पितळेचा तुकडा तयात। स्वामींनी दाखविला॥७७॥ असो, सर्वांचे फराळ आटोपले। घड्याळाचे ठोके पडले। चार वाजल्याचे भले। दोन प्रहरीचे सुज्ञ हो॥७८॥ या भेटीने नामदेवास। तैसेची महाराजास। आनंद जाहला बहुवस। वर्णन काय करावे॥७९॥ रामचंद्र रेद्रेकरनी। अंगासी चंदन लावता जाणी। व्याधी गेली पळूनी। तेची कथा परिसावी॥८०॥ या रेद्रेकर ब्राम्हणाला। महाव्याधीचा रोग जडला। केले नाना उपाय याला। परी रोग हटेना॥८१॥ स्वामीची ऐकूनी किर्ती। येता झाला डोंगरावरती। परी महाराज गेले असती। दुधोंडी ग्रामास॥८२॥ या दुधोडी ग्रामास। भरतसे उरूस। पिराची यात्रा तयास। म्हणतात श्रोतेहो॥८३। ही यात्रा पाहण्यास। महाराज गेले दुधोडीस। ब्राम्हण आला डोंगरास। महाराज तया दिसेना॥८४॥ महाराज नाही ऐसे कळता।



मनासी लागली चिंता। कर्मकहानी झाला सांगता। नामदेव चंद्राबाईस॥८५॥ औषधे घेतली बहुत। परी रोग ना हाटत। तरी तुम्ही महाराजाप्रत। उपाय सांगण्यास सांगावे॥८६॥ माहीती मज महाराजाची। आजच मिळाली साची। म्हणूनी आस चरणाची। धरून येथे पातलो॥८७॥ महाराज येता डोंगराला। महारोगी त्यांना दिसला। चिडूनी म्हणती नामदेवाला। आश्रय यासी का दिला॥८८॥ ऐशा रोग्याचे पाप वाटून। घेण्यास तुम्हा सांगितले कोण। मी तरी काय करून। रोग करूं बरा याचा॥८९॥ नामदेव म्हणाला महाराज। आपली किर्ती ऐकूनी आज। येथे आला चरणराज। सोडूने कोठे जाणार पै॥९०॥ त्याचा रोग बरा होईल। तरच जाता येईल। तुझी इच्छा जर असेल। तर उपाय सांगतो॥९१॥ एक पैशाचे गोपीचंदन। अंगास लावावे आणून। त्याप्रमाणे ब्राम्हण। करिता जाहला तेव्हाची॥९२॥ एक दिवसात साचा। रोग पळाला तयाचा। महापुरूषाच्या शक्तीचा। अंत न लागे कवणासी॥९३॥ महात्मा पुरूष धन्य धन्य। जन्मरोग नाहीसा करून। सुखी केले म्हणून। साष्टांग नमस्कार घातला॥९४॥ ब्राम्हण आपले घराला सुखाने जाता जाहला। चमत्कारिक सद्गुरूच्या लिला। वर्णव्या सामर्थ्य नाही मज॥९५॥ श्री शामसुंदर रचित। ब्रम्हानंद चरित्र ग्रंथ। आदर्श होवो भाविकप्रत। ब्रम्हानंद कृपेने॥९६॥

॥इति श्री ब्रम्हानंद चरित्र सार ग्रंथ॥

चतुर्दशोध्याय समाप्त

Scanned by TapScanner

# अध्याय पंधरावा

श्री गणेशायनमः। श्री गुरूदत्तात्रय नमः। गिरीजा सुता लंबोदरा। भालचंद्रा विघ्नहरा। ज्ञानदाता गणेश्वरा। गजवक्रा सिंदूरारे॥१॥ ज्ञानबुध्दीचा तू दाता। विघ्नासी संहारीता। भक्तमनोरथ पुरविता। कृपावंत होवूनी॥२॥ नाम तुझे चिंतामणी। चिंतीलेले दसी जाणी। भणे पडीता इंद्रालागुनी निवारीले तयात॥३॥ दृष्टी मजकडे फिरवूनी। निवारी मम दुःखालागुनी। अनन्य शरण तुजलामी। वेळ का हो विनायका॥४॥ जर का आणिले मनात। तरी क्षण न अेक लागत। निवारण्या तयाप्रता। काही करणे न लगे रविसी॥५॥ महाराज असता डोंगरावर। बुरूंगवाडी येथिल साचार। मंडळी येवूनी जोडी कर। आणि विनंती करी ऐसी॥६॥ आपण ईश्वर आहात। म्हणूनी बुरूंगवाडीस यावेत। कार्य करूनी घ्यावेत। आमचे हातून काहीतरी॥७॥ सध्या व्यवस्था तुमची। महादेव माळयाचे गोठयात साची। करून देतो लवकरची। मठ बांधूनी मग देवू॥८॥ भक्तांचे वचन ऐकीले। बुरूंगवाडी स्वामी आले। महादेव माळयाचे गोठयात राहीले। भक्ती त्यांची देखूनी॥९॥ काही दिवस निघून जाता। भक्ती निष्ठा पाहण्याकरिता। रेल्वे रूळावर झाले झोपता। भक्त जमले सर्व तेथे॥१०॥ एका रूळावरी डोके ठेविले। दुसऱ्यावर पाय ठेविले। आणि भक्तास म्हणू लागले। चालते व्हा तुम्ही येथूनी॥११॥ आई बाप बहीणभाई।



चुलते काके कोणीच नाही। जगण्यात अर्थ काही। दिसत नाही आम्हासी॥१२॥ राहण्या आम्हा घर नाही। कोणी आमचे ऐकत नाही। राहूनी करायचे काय पाही। भक्तहो आम्ही मरणार॥१३॥ ऐकूनिया ऐसे बोला। भक्तगण सगळा तळमळला। रडूनी म्हणू लागला। महादू माळी हरीबाई॥१४॥ गरीबावर करी दया। एथूनी लवकर चला सदया। शेतात किंवा घरी या। आज्ञा प्रमाण सर्वा आम्हा॥१५॥ कोणतेही नाते लावूनी। घेण्यास आम्ही तयार जाणी। मठही बांधूनी। लवकर देतो तुम्हाला॥१६॥ करा दया उठा येथून। गाडी सुटली स्टेशनापाशसून। सिटी वाजविली आहे तीन। विनंती ऐका गुरूराया॥१७॥ ऐसे चालले भाषण। परी स्वामी हालेना तेथोन। गाडी पुलावर येवून। पोहचली ते वेळा॥१८॥ सर्व रडू लागले। हात धरूनी ओढीले। महाराज नाही हालते। म्हणू लागले भक्तासी॥१९॥ खरोखरी आज्ञा पाळणार काय। आमची सेवा करणार काय। भक्त बोले सद्गुरू राय। तयार दोन्ही करण्यास॥२०॥ परी उठावे येथूनी लवकरी इतक्यात पंचेचाळीस हात अंतरावरी। गाडी पोहचली साचारी। ऐका पुढील कथेसी॥२१॥ गाडीस रागाने पाहून। बोलले पोहचली काय येवून। उभी राहीली अडून। गाडी थोडे अंतरावरी॥२२॥ ड्रायव्हर उतरला खाली। गाडी कोठे बिघडली। यंत्रे सर्व तपासली। परी बिघाड दिसेना॥२३॥ पुन्हा गाडीवरी चढला। चालू केले इंजिनाला। लागली गरगर फिरायला। चाके त्या गाडीची॥२४॥ गाडी का चालत नाही। ऐसा विचार करीत पाही। समोर दिसली मंडळी ही। महाराजा समवेत॥२५॥ तयी तो खाली उतरला। गाडीतून पुढे गेला। काय आहे

Scanned by TapScanner

पाहू लागला। तयी त्या ऐसे दिसतसे।।२६।। कोणी साधू पुरूष एक। रूळावरी झोपला देख। ड्रायव्हर बोलीला निःशंक। ऐसे का करावे जी।।२७।। आपण साधू असून। आहां रूळावर पडून। हे कायद्याचे दृष्टीन। बरोबर नाही महाराजा।।२८।। आपले जिवाची करून हानी। पराचे पोटावर पाडता पाणी। आपणा ऐसे साधूजनी। हे बरे दिसते काय।।२९।। ऐसे ऐकता स्वामी बोले। माझेसाठी नाही केल। गाडीस उभे तुम्ही भले। कैसे ते ऐकावे।।३०।। इंजिन गाडीचे बंद होता। खाली उतरून तुम्ही तत्वता। दुरूस्त करूनी बेतात होता। चालविण्याचे तिजलागी।।३१।। इंजिन नाही चालले। उपाय तुमचे संपले। म्हणूनी इकडे येते झाले। तुम्ही सुध्दा गुन्हेगार।।३२।। कैसे ते सांगतो आता। मनुष्य किंवा जनावर असता। रूळावर सावध करण्याकरिता शिटी प्रथम वाजवावी।।३३।। तरीही तो बाजूला। रूळावरून नाही झाला। तर थांबवून गाडीला। चौकशी त्याची करावी।।३४।। त्याचे नाव गाव लिहून। करावे पोलिसचे स्वाधीन। ऐसा नियम असून। उल्लंघन केले त्याचे तुम्ही।।३५।। नियमाचे पालन न करता। लाईनकडे न पाहता। गाडी पुढे हाकीत होता। दारूचे धुंदीत।।३६।। ऐकूनी कायद्याचे भाषण। तेज मुद्रा पाहून। यांनीच गाडी अडविली जाण। ऐसी खात्री जाहली।।३७।। भक्त मंडळी समोर। करुनी स्वामीस नमस्कार। म्हणे आज्ञा द्यावी साचार। गाडी पुढे नेण्यास।।३८।। महाराज रूळावरूनी उठले। आज्ञेसी त्याला दिले। गाडीस त्याने पुढे नेले। भक्त झाला ड्रायव्हर।।३९।। महाराज उठूनी तेथोन। आले माळयाचे घरालागून। दुसरे दिवशी कराराप्रमाण। बोलीले



भक्तासी।।४०।। मठ केंव्हा कोठे आपण। कैसा बांधता मजलागून। सांगावे परिपूर्ण। भक्त देती उत्तर।।४१।। आज्ञा देता आपण। उद्याच मुहुर्त करीतो जाण। महाराज म्हणती तयालागुन। गवंडी बोलवा आताच।।४२।। पाठवूनी मनुष्यास। बोलाविले आबा गवंड्यास। उभे केले पुढे त्यास। महाराजाच्या हरीबाईने।।४३।। कोठे बांधावे मठाला। ऐसा विचार करी चित्ताला। म्हणाले महादू माळ्याला। प्रेमभरे श्रोते हो।।४४।। सावंतामाळी देवासी। बसविता झाला पोटासी। तैसे तू आपुले शेतासी। जागा द्यावी मजलागी।।४५।। तेणे तू अपुले पोटात। जागा दिल्या ऐसे होत। कां की तु ही माळी असत। महादू बोले त्यावरी।।४६।। महाराज आपले म्हणण्यानुसार। जागा देण्यास मी तयार। तरी शेतासी चलावे सत्वर। निघाले सर्व शेतासी।।४७।। शेतात जावूनी जागा आखली। कामास लवकर सुरूवात केली। गवंड्याचे मनी चालली। विचारमाला घरातील।।४८।। लवकर काम आटोपून। जावे तासगावालागुन। विचार त्याचा जाणून। महाराज त्यास बोलते।।४९।। आबा तू आपले मन। काम करी मठात ठेवून। परी त्यासी घरात ठेवून। मठ नको बांधूस।।५०।। त्यावरी आबा बोलीला। चांगले करतो कामाला। मग कामास लागला। परी विचार सुटेना।।५१।। माझे मुलाबाळाचे। कैसे असेल साचे। ऐसा विचार तयाचे अंतरी रात्रंदिवस।।५२।। तरीपण चाळीस दिवसांत। मठाचे काम पूर्ण करीत। पडव्या दोन मठाचे आत। त्यांच्या भिंती राहील्या।।५३।। पैकी एक होऊन पूर्ण। दुसरी अर्धवट जाण। महाराज बोलले आबालागुन। किती दिवस टिकणार भिंत ही।।५४।। पुष्कळ

Scanned by TapScanner

दिवस टिकणार। माझे काम मजबूत फार। ऐसा अनुभव साचार। कित्येकास स्वामीजी।।५५।। अरे, तिन दिवस टिकेल काय ही। महादू इकडे येवून पाही। केव्हा पडेल नेम नाही। ऐसे म्हणता कोसळली भिंत ती।।५६।। आबा गवंडी थक्क झाला। विचार करू लागला। महाराज म्हणती तयाला। आम्हा फसवीत होता काय?।।५७।। पुन्हा भिंत पूर्ण केली। महाराज व हरीबाई पहाव्या आली। भिंतीची गोष्ट काढीली। कैशी ती परीयेसा।।५८।। महाराज म्हणती हरीबाई। भिंतलि या हालवूनी पाही। मडक्यापरी समजून येई। तुम्हा बायकाकारणे।।५९।। कां की उतरंडी कैशी लावावी। परीक्षा तयाची कैशी द्यावी। पडेल किंवा नाही बरवी। याचे ज्ञान बायकास।।६०।। ते न साधे पुरूषांना। मागले वेळी हिच जाणा। भिंत होती पडली ना। अजून खात्री नाही हिची।।६१।। अरे, मागे व्हा म्हणता। भिंत पडली अन् न लागता। पुन्हा तिच पडली तत्वता। तिन वेळा एकूण।।६२।। विचार मनी आबाचे। हें कृत्य महाराजांचे। नमस्कार करूनी साचे। म्हणाला स्वामीस।।६३।। दहा रुपये वसुल (दंड) घ्यावी। किंवा फुकट भिंत बांधावी। परी आतून व्यवस्था ठेवावी। माझे घरची गुरूराया।।६४।। आपण आहा परमेश्वर। विनंती ऐकून साचार। महाराज म्हणती त्यावर। आबाकारणे तेधवा।।६५।। मला म्हणतो परमेश्वर। नि करतो घरचा विचार। ऐसे न करता निरंतर। परमेश्वर ही भावना ठेवावी।।६६।। असो मठ झाला तयार। निरोप पाठविला डोंगरावर। शिष्य मंडळीस सत्वर। बुरूंगवाडीस येण्याकारणे।।६७।। खंडेबापु नामदेव बुवा। चंद्राबाई, नाथबुवा। बापुराव शिंदे, छोटू बुवा। मालवणकर व कृष्णा



खोचीकर।।६८।। ही मंडळी बोलाविली। मठाची वास्तू केली। ऐसी सद्गुरू माऊली। मठ केला तयार।।६९।। महाराजांचा रहिवास। जेव्हापासून बुरूंगवाडीस। रामवाडी त्या गावास। म्हणू लागले स्वामीजी।।७०।। एके वेळी शिष्यमंडळी। सभोवताल सर्व जमली। बोलली ब्रम्हानंद माऊली नाते लावावी आम्हासी।।७१।। ऐकूनी ऐसी वैखरी। मेंढरे आहोत आम्ही सारी। आपण जी लावाल ती खरी। हरीबाई महादू बोलीले।।७२।। बापुराव शिंदे बावडेकर। तैसेची कृष्णा खोचीकर। हे बंधुत्वाची साचार। योग्य आहेत जाणावे।।७३।। मावळे आमचे बाबर। आंधळा कृष्णा मुलगा साचार। महादूमाळी वडील थोर। हरीबाई आई जाणावी।।७४।। असू दे असली तर। कां की आलेल्या आमचे नावांवर। भोजन घालते निरंतर। स्वयंपाक करूनी मंडळीस।।७५।। निष्कपट स्वभावाची। आहे उदार मनाची। म्हणोनी नाते योग्यची। आहे आमचे आईचे।।७६।। नामदेव आला दुसरे दिनी। गुरूगृहाते परतोनी। नाते सांगितली स्वामींनी। सर्वांशी जोडलेली।।७७।। आणिक सांगितले त्यास। तुही मुलगा आहेस। आता तू जावेस। दुसरीकडे राहावे।।७८।। आज्ञा माझी परिसावी। सेवा तेथे करावी। माझी जिवेभावे बरवी। अंतर न देई अनुमात्र।।७९।। बाप राही ऐकीकडे। मुलगा तो दुसरीकडे। मग सेवा ती कैसी घडे। नामदेव बोले सप्रेम।।८०।। महाराज बोले तयासी। मी मरका ऐकदेशी। तुझा बाप नव्हेशी। सर्वव्यापी अविनाशी। बाप तुझा मी होय।।८१।। तू कोठेही सेवा करशील। तरी ती मला पावेल। जाणीव याची मागिल। वेळेस तुला दिली मी।।८२।। स्वामी वचन ऐकीले। दंडवत तया घातले।

Scanned by TapScanner

आणि फिरावया निघाले। आज्ञा घेवून स्वामींची॥८३॥ नामदेवबुवा फिरत फिरत। आले बेलवडे ग्रामाप्रत। जनार्दनाचे देवळात । मुक्काम त्यांनी ठेविला॥८४॥ गुरूचे चिंतन करीत। हरदिनी काळ कंठीत। रामभाऊ सुतार तेथ। शिष्य बुध्दीने सेवा करी॥८५॥ काही दीन लोटता भली। प्लेगची साथ गावी आली। जनता सर्व घाबरली। विनंती करी नामदेवास॥८६॥ आम्हासी मृत्यूपासून। सोडवावेजी आपण। आम्ही तुम्हासी शरण। आलो नामदेव बाबाजी॥८७॥ तेथे सोडवेना कोणी। ऐका सद्गुरू वाचूनी। ऐसे बोले संतवचनी। म्हणूनी शरण तुम्हाला॥८८॥ जनार्दनी बुवास काय कळत। मृत्यू काय त्यांचे हातात। गावातील मुर्ख पंडीत। नादी लागले तयाच्या॥८९॥ ऐसे पाटील बोलीला। काही लोकांनी दुजोरा दिला। तयी म्हातारा ऐक बोलीला। बुवा मोठे अधिकारी॥९०॥ एकदा एका सर्पाला। दुध पाजित बसलेला। मी प्रत्यक्ष पाहीला। ते सुध्दा न घेती अन्नास॥९१॥ नेहमी राहतात दुधावरी। किंवा लिंबाचे पानावरी। म्हणूनी ते अधिकारी। असावे ऐसे वाटते॥९२॥ ऐसे ऐकूनी मंडळी उठत। आली जनार्दनाचे देवळात। पाहू आता काय गंमत। होते ऐसे बोलीले॥९३॥ नामदेव बुवास झाले म्हणता। आपण जनार्दन बुवा भासता। कृपा करूनी आमुचे वरूता। चमत्कार काही दाखवावा॥९४॥ बाबांनो, तुम्ही म्हणता गोष्ट खरी। परी मी नव्हे डोंबारी। कि बावन बिराच्या मंत्रातरी। पारंगत नाही मी॥९५॥ मग कोठूनी दाऊ चमत्कारा। भजन किर्तन माझा पसारा। पारमार्थिक प्रश्न विचारा। उत्तरे त्याची देतो मी॥९६॥ ऐकूनी ऐसे जन बोलीले। आपण सर्पास



दुग्ध पाजिले। आम्हास चमत्कार न दाविले। तर चरण ना सोडणार॥९७॥ ऐकूनी नामदेवास वाईट वाटले। चित्ती विचार करू लागले। या देशातील लोक भले। परीक्षा घेतात संताची॥९८॥ यांची आहे असूर वृत्ती। महाराजही तेथेच राहती। सद्गुरूनाथा माझे वरती। काय संकट आणिले॥९९॥ दुसरे देशी जावे तर। दर्शन गुरूचे ना होणार। ऐसा करित असता विचार। सर्पाची जोडी पडली खाली॥१००॥ जयी सर्प जोडी पडली। तयी मंडळी सर्व पळाली। नामदेवे हाक मारिली। आणि बोले तयासी॥१०१॥ तुमचे इच्छेनुसार। सद्गुरूने दाविला चमत्कार। आतां कां पळता दूर। यावे इकडे पळू नका॥१०२॥ भयंकर साप पाहून। घाबरले सर्वजन। पुढे येण्याचे धाडस जाण। कोणासी होईना॥१०३॥ साप चोहीकडे फिरले। देवळात जावूनी गुप्त झाले। पाहूनी चोज (नवल) वाटले। जमलेल्या मंडळीस॥१०४॥ ऐसी घटना पाहीली। नामदेवाची स्तूती केली। आणीक सर्व घरा गेली। मंडळी जमलेली॥१०५॥ ऐकदा नामदेवाचे मनात। विचार आला अवचित। हा देश आहे मुर्तीमंत। चमत्कारा नमस्कार करणारा॥१०६॥ या लोकांनी आपली। परवा परिक्षाच जणू घेतली। परि सद्गुरूने कृपा केली। चमत्कार त्यासी दाविला॥१०७॥ आपले जवळ काही नाही। ही सद्गुरू कृपा पाही। नामस्मरणा वाचून नाही। आपले जवळी साधन॥१०८॥ तेथिल जन वारंवार । मागु लागले चमत्कार। तर सद्गुरूस घालणार । साकडे कोठवरी॥१०९॥ ऐसेची संकटे वारंवार। सद्गुरूस घातले जर। भक्तीची हानी तर। होईल खचित पै॥११०॥ ऐसा विचार चालीला असता। बाहेरी

Scanned by TapScanner

समुदाय झाला जमना। हात जोडूनी तत्क्षना। म्हणू लागले बुवास॥११११॥ आता आमुचे गावाना। प्लेग वाढला बहुत। तुम्ही सांगावे आम्हाप्रत। गावं संपूर्ण मरेल काय॥११२॥ किंवा लोक मरतील किती। आकडा सांगावा निश्चीती। ऐसी आहे विनंती। आमची आपले चरणासी॥११३॥ बाबांनो, ईश्वराचे घरातील। जन्म मृत्यूचा हा खेळ। दुसऱ्यास कैसा कळेलामी एक साधारण भक्त जाणा॥११४॥ खेळ हा ज्यासी कळला। तो पाहीजे महात्मा असला। ह्या कोटीतील मला। ऐसे तुम्ही समजावे॥११५॥ इतके सांगितले तयांना। परी सांत्वन त्यांचे होईना। बसले सर्व मुकवदना। नामदेव बुवा कंटाळले॥११६॥ जनार्दनाचे देवळात। उपवासी जावूनी झोपत। सर्व तेथोनी निघूनी जात। आपआपले घराकडे॥११७॥ रात्री देवूनी दृष्टांतास। सद्गुरू सांगती तयास। तेची सांगतो तुम्हास। चित्त देवूनी ऐकावे॥११८॥ लिंबे नामदेवास आणून दिली। आणि करूनी विचारणा केली। तुझेकडे किती आली। लिंबे सांगावे आम्हास॥११९॥ ऐकशे चौऱ्याहत्तर आहेत। ऐसे नामदेव बुवा सांगत। महाराज त्यासी म्हणत। कैशी आहेत पहावी॥१२०॥ ती सर्व नासलेली। लिंबे मला दिसली। चाळीस परत मागितली। लिंबे त्यातूनी स्वामींनी॥१२१॥ आणि ऐसे म्हणत। बाकी ऐकशे चवतीस आहेत। त्यासी टाक तू विहरीत। कि जाळावे अग्नीने॥१२२॥ किंवा खड्यात पुरवीत्यासी। याचा हिशोब आम्हासी। नको, ऐशा स्वप्नासी। पाहीले नामदेवानी॥१२३॥ दुसरे दिनी पुजा करून। बैसला असता स्वस्थ चित्ताने। बाबर नामे कोष्टी जाण। आला दर्शना



बुवाच्या॥१२४॥ नामदेव बुवाने तयाला। सांगितले रात्रीचे दृष्टांताला। म्हाताऱ्याने लोकाला। सांगितले गावातील॥१२५॥ तैसेची घडले खरोखर। माणसाची एकशे चौऱ्याहत्तर। प्लेगचा जडला आजार। चाळीस उठती त्यातूनी॥१२६॥ एकशे चवतीसास मृत्यू आला। ऐशारीती नामदेवाला। दृष्टांत देवूनी सोडविला। लोकांचे प्रश्नातून॥१२७॥ ऐसे लोक देती त्रास। नामदेव बुवा कंटाळले त्यास। सोडूनी चालीले गावास। दुर्जन भेटती रस्त्यात॥१२८॥ ते बोलले नामदेवास। घ्यावे महाराजांचे प्रसादास। आणुनी दारूचे बाटलीस। हातात देती तयांच्या॥१२९॥ नामदेवाने दिला बोल। हा प्रसाद तुमचे जैसे पचवतील। यात आहे काय नवल। विष तर नव्हेची॥१३०॥ ऐसे बोल ऐकून। बोलला त्यातील दुर्जन। अफू घेवून तोळे दोन। माझे जवळील यात घाला॥१३१॥ पाहू आता साधूपणा। ढोंग लयी माजवल ना। बुवापणाचे ढोंग जाणा। बाहेर आता पडते की॥१३२॥ नामदेव बुवा विचारी मनी। संपले येथिल अन्नपाणी। दुसरे गावी जाण्यालागुनी। पुढे चालले तेथोन॥१३३॥ ऐक रांगडा लागला पाठीस। म्हणाला नामदेव बुवास। जर कां केले ढोंगास। तर बरे नाही होणार॥१३४॥ हे घेतल्याविना समोर। बच्चाजी मी जावू न देणार। नाही येथूनी साचार। बुवा बोलले त्यावरी॥१३५॥ घरी रामभाऊ शिंपयाचे। फोटो आहेत महाराजांचे। तयाची नैवेद्य दावूनी साचे। आणावे मग मजकडे ॥१३६॥ सुताराचे घरास। गेली दहापाच माणस। नैवेद्य दावून फोटोस। बाटली दिली नामदेवा॥१३७॥ जय जय सद्गुरूनाथा। तुमचा प्रसाद घेतो आता। ऐसे

म्हणूनी शिघ्रता। पिण्यास केली सुरूवात॥१३८॥ तो चोपडा गोड लागला। रंगही पांढरा बनला। घट्ट बनुनी लोकाला। दिसू लागला नवल पै॥१३९॥ म्हातारा बोलीला ऐक सवेची। अरे ही दारू कशाची। त्याचे तुप झाले साची। आश्चर्य हे नव्हे काय?॥१४०॥ नामदेवाचे हातून। बाटली घेतली जबरीन। आणि प्रसाद स्वामींचा म्हणून। सर्व लोकास वाटला॥१४१॥ लोकांचा त्रास पाहूनी। तेथे न घेता ऐक थेंब पाणी। आले बुरूंगवाडी लागुनी। सद्गुरूचे सान्निध्य॥१४२॥ श्री ब्रम्हानंद गुरू। दत्त अवतार थोरू। नामदेवासी साचारू। संकटी तारीले॥१४३॥ दुर्जने बहुत त्रास दिला। परी सद्गुरू निवारी त्याला। ब्रम्हानंदाच्या अगम्य लिला।पुढे चरित्र सुरस पै॥१४४॥ इति श्री श्यामसुंदर रचितं। ब्रम्हानंद चरित्र सार ग्रंथ। वाचिता देवो दर्शन दत्त। आणि मनोरथ पुरवावे॥१४५॥

इति श्री ब्रम्हानंद चरित्र सार पंचदशोध्याय समाप्त॥



# अध्याय सोळावा

श्री गणेशायनमः। श्री दत्तात्रेय नमः। श्रीनिवासा लक्ष्मीकांता। दीनजनासी कृपावंता। पतितजना उध्दारकर्ता। तुची एक पांडुरंगा॥१॥ म्हणूनी मी तुजपाशी। मागणे मागतो ते देशी। उरू न द्यावे पातकासी। मजे ठायी किंचीत॥२॥ परिस लोहा सोने करी। तेवी तव कृपा खरी। दैन्य दुःख वारी। काही न लागती सायास॥३॥ भुकेला तव कृपेचा। श्यामसुंदर हा साचा।घास एखादा तरी त्याचा। घाल माझे मुखात॥४॥ दिनवाने मारितो हाका। नाही ऐसे म्हणू नका। पंढरीनाथा जगन्नायका। पावा वेळ करू नका॥५॥ नामदेव बुवा बाजार वेडवड्यावरून। फिरत आले औदुंबरा लागुन। तेथे घेवून दत्त दर्शन। सद्गुरू भेटीस निघाले॥६॥ वाटेने चालत असता। मनी विचार झाला येता। दत्त म्हणजे काय निश्चिता। तोच विचारी पुन्हा ऐसे॥७॥ श्रेष्ठ कनिष्ठ गुरूत्व। लहान थोर लघुत्व। यासी नसुन महत्व। समभावी महात्मा॥८॥ तोची समजावा दत्त। ऐसा विचार करीत करीत। आला बुरूंगवाडी। महाराजाचे दर्शना॥९॥ जयी स्वामीजवळी गेला। तयी एक ब्राम्हण बसलेला। स्वामीजवळ पाहिला। नामदेवबुवाने॥१०॥ बसला होता हात जोडून। बोलीला डोळ्यात पाणी आणून। सहा महिने अनुष्ठान। दत्ताजवळ केले मी॥११॥ दत्तांनी दिला दृष्टांत। मी आहे बुरूंगवाडीप्रत। तेथे येवूनी मज भेट। कार्य तुझे

Scanned by TapScanner

होईल॥१२॥ त्या दृष्टांताप्रमाणी। हजर झालो श्रींचे चरणी। ऐसे भाषण ऐकूनी। आश्चर्य नामदेवा॥१३॥ मनी विचारू लागला। मी जो मनांत विचार केला। तेची प्रत्यक्ष अनुभवला। आले इथे माझे की॥१४॥ इतक्यात ब्राम्हणा स्वामींनी। रस्त्याने लाविले सांगुनी। घरी जातपर्यंत जाणी। कार्य तुझे होईल बा॥१५॥ मग नामदेवा मारी हाकेला। तो हस्त जोडूनी उभा केला। महाराज म्हणती तयाला। भुक लागली मला रे॥१६॥ तुझे जवळी खाण्यास। आहे काय ते आम्हास। द्यावे, नामदेव महाराजास। म्हणाला काही नाहीत पै॥१७॥ अरे, दारू अफु पिणाऱ्या जवळ। काही तरी असेल। ऐसे बोलोनी गाठोड्यातील। सामान तपासू लागले॥१८॥ तेव्हा त्यास कणीस दिसले। मक्याचे, अर्धवट खाल्लेले। घेवूनी ते भक्षण केले। भेदभाव न ठेविता॥१९॥ श्रेष्ठ कनिष्ठ शिष्य गण। ऐसा भेदभाव दिसून। आला नाही तयालागून। खरोखरीच समभावी॥२०॥ गुरूशिष्य भावना एक। स्वामी जवळी होती देख। दत्त अवतार निःशंक। नाही म्हणता बुडतील॥२१॥ शिष्यांचे धोतर धुणे। स्वयंपाक करूनी खाऊ घालणे। तयांचे उच्छिष्ट काढणे। ऐसी कामे करीसी ते॥२२॥ लहान थोर भेदभाव। यासी स्वामीजवळी नाही वाव। त्यांना पाहीजे केवळ भाव। खरोखरीच भक्तवत्सल॥२३॥ एकदा बुरूंगवाडीचे मठास। महादूमाळ्यास केले अदृश्य। तेची कथा श्रवणास। सावध असावे श्रोते गण॥२४॥ महादू माळ्याचे घरी। झाली असता एकदा चोरी। त्याचे चौकशी वरी। आण एक फौजदार॥२५॥ महादूमाळी बसलेला। होता स्वामींचे सान्नीध्याला। चारपाचदा बोलाविण्याला।



शिपाई आला त्याचेकडे॥२६॥ जाण्यास मन घेईना। स्वामी देव ही भावना। आज्ञेवाचून आपण। कैसे जाता येईल॥२७॥ महादूमाळी मठाला। महाराजाजवळ आहे बसलेला। परी आपल्याकडे येण्याला। कुचराई करतो तो॥२८॥ ऐसे कळता फौजदाराला। जिरवावे याचे मस्तीला। करूनी ऐशा विचाराला। फौजदार आला मठात॥२९॥ महादूचा तपास करू लागला। तेव्हा महाराज म्हणाले त्याला। तो येथे नाही आला। फौजदार पाही चोहीकडे॥३०॥ सर्व दिसती नयना। परी महादू माळी दिसेना। महादू दिसती लोकांना। फौजदार दिसती महादूस॥३१॥ ऐसे प्रकारे महादूस। दिसू न दिले फौजदारास। लोक करीती जयजयकारास।ब्रम्हानंद स्वामींच्या॥३२॥ धन्य धन्य सद्गुरूराजा। डोळ्यावरी घातले आवरणा। फौजदार करी गमना। तासगावी स्टेशनाला॥३३॥ महाराज महादूस हाक मारी। आणि सांगितले तुझी चोरी। गावातच झाली खरी। आपोआप सापडेल॥३४॥ आणखी काय पाहीजे तुला। ते सांगावे आता मला। महादू माळी म्हणाला। आता काय सांगू मी॥३५॥ आपले चरण असल्यावर। न्यूनता कोणती पडणार। अरे आहे ते खरा परी मागून घे काही॥३६॥ जनावरास उन्हाळ्यात। पाणी पिण्यास न मिळत। विहीर खोदण्याचे विचारात। आहे, पाणी द्यावे तिस॥३७॥ तथास्तू म्हणूनी त्याला। महाराजांनी आशिर्वाद दिला। आणखी नातू होंईल तुला। ऐसे सुध्दा सांगितले॥३८॥ ऐसे बोलणे चालले असता। ऐक गारूडी झाला येता। आज्ञा मागुनी सद्गुरूनाथा। खेळ त्याने मांडीला॥३९॥ त्याचा खेळ संपला। मग महाराज विचारी त्याला।

Scanned by TapScanner

मातीचे रुपये तुला। बनविता येत असते की॥४०॥ मग सोन्या चांदीचे मकान। कां न राहती बांधुन। उगीच ऐक पैशा लागून। तोंड उघडी जगापुढे॥४१॥ महाराज आम्हा मातीचे। रुपये बनविता येत साचे। परी ते क्षणाचे। जनासी दाखविण्या॥४२॥ मग खटपट कां करता। गारूडी म्हणती पोटाकरिता। तर मग काय पाहीजे आता। मागावे मजलागी॥४३॥ जी काय भाजी भाकर। द्याल ती घेवू साचार। पुरण पोळ्या दिल्या तर। चालणार नाही कां?॥४४॥ गारूड्यासी पात्र देत। मग गेले कोठीत। लाडू पोळ्या भात। आणूनी वाढला तयासी॥४५॥ गरमगरम अन्न। खाऊ घातले पोटभरुन। कपड्याची याचना करून। जवळ बैसिले स्वामींच्या॥४६॥ अंगातील सदरा काढीला। गारूड्यासी अर्पण केला। पुर्ण तपासले त्याला। पैसे न दिसती तयात॥४७॥ म्हणूनी मागितले पैशासी। महाराज म्हणती तयासी। तपासून पहा खिशासी। दोन रूपये सापडीले॥४८॥ राहीला एक सोबती। पुन्हा पैसे मागती। पुन्हा बघा म्हणती। पुन्हा निघाले दोन॥४९॥ ते सोबत्यास देवून। म्हणाला तयालागून। महाराज गारूडी असून। सत्यता त्यांचे खेळात॥५०॥ अवतार आहे देवाचा। ऐसा भाव झाला तयांचा। नमस्कार करूनी परगांवचा। मार्ग क्रमिला तयांनी॥५१॥ महाराज म्हणाले तुकाराम माळ्यास। जंगमाचा घेवून उपदेश। वेगळे मानीन देवगुरूस। लिंगायत माळी बा॥५२॥ तर ऐसे न मानावे। देव आणि गुरू एक समजावे। राम मंत्रासी जपावे। त्यानेच कल्याण होईल॥५३॥ महाराज असता डोंगरावर। गुरू शिष्यात झाले प्रश्नोत्तर। तयाचा थोडक्यात सार। कथन करूनी सांगतो॥५४॥ राजेराम बापु



नामदेव। स्वामीस विचारी प्रश्न अभिनव। स्थिती कैसी गुरूदेव। सांगा देवलोकी आम्हासी॥५५॥ ऐशा विचारी प्रश्नासी। महाराज देती उत्तर त्यासी। तेची परिसावे एकाग्रेसी। सद्‌गुरू प्रेमी श्रोते जन॥५६॥ कैलास, वैकुंठ, सत्यलोक। महालोक, जनलोक, तपोलोक। वसुलोक, रूद्रलोक, सुर्यलोक। चंद्रलोक, तारालोक॥५७॥ ऐशा प्रकारे लोकलोकांतर। आहे पृथ्वीच्या उंच भागावर। सुर्यलोक, चंद्रलोक आणि नंतर। तारा लोक आहे पोकळीत॥५८॥ तेथे राहणारे देवगण। इच्छित रूप धारण करून। फिरत असती आनंदात। नेमलेल्या लोकांत॥५९॥ सुंदर रूप धारण करून। व्यवहार करीती सेवक रूपान। ऐसे काही काळ राहून। पुन्हा दुसरे रूप धरी॥६०॥ पूर्वी तेथे संतती। पृथ्वी जैसी होत होती। परी तैसे आता न होती। विमाने जाती त्यालोकी॥६१॥ जीवानी मृत्यूलोकात। कमी केले ज्यालोकात। जावयाचे त्या लोकात। मृत्यूनंतर जन्म घेती॥६२॥ त्यालोकी जावून। जन्म घेती उदरातून। परी आता कैलास वैकुंठ भुवन। सैन्य लोकाशिवाय तैसे न होती॥६३॥ पुण्य केले ज्या लोकीचे। तेथे विमानी जावयाचे। पुण्य भोग भोगुनी साचे। मृत्यूलोकी जन्म पुन्हा॥६४॥ वाटेल त्या योनीत जन्म घ्यावा लागतो। इंद्रासही न चुकत। इतरांची काय कथा॥६५॥ दुसरा प्रश्न शिष्य करिती। देवलोकी पूर्वी संतती। होत होती आता का न होती। हेची सांगावे आम्हासी॥६६॥ याचे ऐका कारण। तेहतीस कोटी देवांगण। कैलासात जावून। पार्वतीस हासती पै॥६७॥ पार्वतीस नव्हते संतान। म्हणूनी तिस राग येवून। केले शापयुक्त भाषण। संतती देवलोकी ना होणार॥६८॥ जैसे वैकुंठ

Scanned by TapScanner

कैलासास। विमानी येती सत्यलोकास। तैसेची इतर देवलोकास। विमानी येईल बैसोनी।।६९।। ऐसे पार्वतीचे शाप वचन। म्हणूनी तेथे संतती न होऊन। विमानी जाती बैसून। ऐसे सांगती ब्रम्हानंद।।७०।। शिष्य विचारे स्वामीप्रत। सुख दुःख आहे काय देवलोकात। असल्यासी सांगावे आम्हाप्रत। कोणते सुखदुःख आहे ते।।७१।। तयी स्वामी बोलत। सुखदुःख आहे देवलोकात। शाप व पुण्यक्षण होत। याचेच दुःख भयंकर।।७२।। विमानात बैसूनी फिरणे। देव स्त्रियांचा उपभोग घेणे। आणि अमृतपान करणे। यासी सुखे म्हणावी।।७३।। येथे परमार्थ चर्चा नाही। केवळ कैलास व सत्यलोकात पाही। परमार्थ चर्चा अभ्यासही। महादेव ब्रम्हदेव सांगतात।।७४।। तेथे असतीचार इयत्ता। सलोकता समिपता। स्वरुपता सायुन्यता। ऐसे ते जाणावे।।७५।। परी देवलोकी जे जाती। ते भोगी अडकले असती। म्हणूनी परमार्थमार्ग असती। खरा तो मृत्यूलोकी।।७६।। सद्‌गुरूचे सहाय्य करून । सत्वर मोक्ष प्राप्त करून। विदेह कैवल्यास जावून। पोहचता येते निवास।।७७।। ऐसे घडती मृत्युलोकी। जरी अभ्यास कैलास सत्यलोकी। केला तरी अडकती कल्पांती। सुटका लवकर होत नाही।।७८।। सलोकता, समिपता। स्वरुपता। सायुन्यता याचा अर्थ कोणता। ते सांगावे आम्हासी।।७९।। ऐकूनी ऐशा प्रश्नासी। ब्रम्हानंद देती उत्तर त्यासी। सलोकता म्हणजे देवलोकाशी। जाणे देव न भेटती तेथ।।८०।। देवाजवळ राहणे। देवाची भेट होणे। तेची समिपता जाणे। चतुर्भुज रुप स्वरुपतेत।।८१।। चतुर्भज रुप देवाप्रमाणे। स्वरुपतेत प्राप्त होणे। ईश्वरस्वरुपी लीन होणे। सायुन्यता बोलती तियेस।।८२।। परी हा



अभ्यास केवळ। सत्य व वैकुंठी मिळतील। परी थोडे सापडतील। सायुन्यता मुक्ती मिळविणारे।।८३।। पुष्कळसे सलोकतेत। समीपता स्वरूपतेत। निमग्न असती आनंदात। अभ्यास चर्चा न मिळे त्यासी।।८४।। पुढे प्रश्न केला ऐसा। कली प्रभाव आहे कैसा। उत्तर त्याचे परियेसा। श्रोतेगण सुज्ञ हो।।८५।। असल्यास लोक रिझतिल। पापास संमती देतील। सगुण मुर्तींची हेळणा करतील। निंदतील भूदेव संता।।८६।। विषयाची आसक्ती वाढेल। लक्ष्मी निचाघरी जातील। पार्वतीस मान थोडा असेल। भक्त देखील थोडे तिचे।।८७।। गुरू द्रोही शिष्य होतील तयार। ते गुरूसी ज्ञान सांगणार। मुलापुढे बाप थरथर । कापतील भयाने।।८८।। सासु सुनेस भिऊन पळेल। झाडास पाळणे लागतील। उंदरास जन भितील। वाघास न भिती किंचीत।।८९।। सर्प मुंग्यास सरपटतील। मुंग्या सर्पास खातील। एका शिंगावर जल वर्षेल। दुसरे कोरडे बैलाचे।।९०।। मास न खाणे पक्षी जाण। करतील मांस भक्षण। न करणारे मद्यपान। चातक दारू पितील।।९१।। चोऱ्या न करणारा पशुगण। लागतील चोरी करण्यालागुन। मौजा करतील असत्य असून। सत्यवादी दुःख भोगी।।९२।। सत्यवादी राहील निष्ठेसी। तर शेवटी सुख मिळेल त्यासी। ऐसे जाणावे निश्चियेसी। तात्कालिक सुख अल्पकाळ।।९३।। असत्य वेदास सत्य मानतील। मनुष्य वेद तयार करतील। त्यासीच सत्य मानतील। ऐसा प्रभाव कलीचा।।९४।। अशक्त अल्पायुषी प्रजा होईल। घरोघरी गायन कला रुचेल। भाषांतरी पुस्तके गोड लागतील। त्यागुनी संस्कृत ओवीबध्द।।९५।। चटक पटक राहून। खटपट करून पोट

Scanned by TapScanner

पाही नाटकास। असो, थोडा वेळ पाहूनी त्यास। बाहेर आले महाराज।। ११।। तिकीटे देवून दोन मुलास। तेथून आले सांगलीस। मनोदय जाणून नामदेवास। बोलीले येणेरिती।। १२।। आज आपणास पाप घडले। म्हणूनी सचैल स्नान केले। पाहीजे ऐसे बोलले। आणि उडीघेई कृष्णेत।। १३।। स्नान करूनी बाहेर आले। परी अंगीचे कपडे न भिजले। मग नामदेवास सांगितलें। स्नान करी म्हणोनिया।। १४।। मग उपदेशी सद्गुरूराय। नाटक म्हणजे आहे काय। अरे विश्व हेची नाटक होय। माया नटी त्यातील।। १५।। ईश्वर हा सुत्रधार। आम्ही झालो तयार। साधूचे पात्र घेवूनी साचार। संपादनी त्याची करावी।। १६।।

" नाटक झाले बहु जन्माचे।<br>
कुणी तिकडे पाहीना।।<br>
अजूनी खुळा हा नाद पुरेसा।<br>
कैसा होईना।। "

अरे जन्मजन्मांतराची नाटके। झाले परि कोणी तिकडे। म्हणजे ब्रम्हस्वरूपाकडे। अजूनी ना पाहती।। १७।। तू तरी पाहून जन्माचे। सार्थक करून घ्यावे साचे। अरे ऐसा उपदेशाचे। घोट कोणी भरवेना।। १८।। ऐसा उपदेश ऐकीला। नामदेव तल्लीन झाला। आनंदात तेथूनी आला। बुरूंगवाडीस स्वामीसह।। १९।। कुंडल येथील चार पहेलवान। महाराजाचे दर्शन घेवून। समोर बैसले येवून। आणि बोलीले ऐसे पहा।। २०।। पाच सहा मैल गेलो दौडत। तरी थकवा आम्हा न



येत। मग महाराज म्हणत। माझे सोबत दौडता काय?।। २१।। पहिलवान बोले तुमची दौड । काय जाणार आमचे पुढा। तुम्ही साधु तुम्हा जड। यात ना पडावे।। २२।। जो बोरगावचे डब्यास। अगोदर शिवेल त्यास। चौघांनी रूपये विस। द्यावे ऐसा करार केला।। २३।। दोन द्यावे पहिल्याने। दुसऱ्याने चार देणे। तिसऱ्याने सहा जाणे। चवथ्याने आठ पै।। २४।। ऐसा करार होत। पाचही निघाले दौडत। महाराज हळू चालत। म्हणूनी मागे राहीले।। २५।। आठ रूपये महाराजा पासून। आपणास मिळतील ऐसे जाणून। जोराने दौड घेवून। धावू लागले पहेलवान।। २६।। सत्पुरूषांच्या लीला गहन। त्या न कळे सामान्यालागून। महाराज अगोदरच जावून। डब्यात बैसिले।। २७।। चौघे ते थकून गेले। घामाने कपडे भिजले। मुखावाटे फेस गळे। ऐसी अवस्था तयांची।। २८।। ऐका मागून ऐक। डब्याजवळी पोहचले देख। तो पाही कौतुक। महाराज बसले डब्यात।। २९।। महाराज म्हणती तयाला। विस रूपये द्या आम्हाला। महाराज तुम्हा द्यावयाला। रूपये ना आम्हापाशी।। ३०।। तेव्हा रागाविले ऐसे करून। महाराज म्हणती तयालागुन। रूपये घेतल्यावाचून। आम्ही जाऊ ना देणार।। ३१।। तेव्हा एका पहेलवानाची । बोटातील अंगठी सोन्याचीं। गहाण ठेवूनी साची। विस रूपये दिले आणून।। ३२।। जाण्या निघाले नमस्कार करून। महाराज बोले तयालागुन। न जावे उदास होवून। फराळ थोडासा करावा।। ३३।। चार शेर पहेलवानाप्रत। उत्तम खव्याचे पेढे देत। रूपये कृष्णा माईत। टाकून दिले स्वामींनी।। ३४।। तेव्हा पहेलवानाने विचारीले। रूपये नदीत का टाकीले। तयी स्वामींनी सांगितले। कारण ते

Scanned by TapScanner

ऐकावे॥३५॥ तुम्ही गवळयाजवळील दूध पिता। आणि त्याला पैसे देता। ऐशारीती शक्ती मिळविता। आमचेही तैसेच॥३६॥ कृष्णा माईचे पाणी पिवून। आम्हां शक्ती येते जाण। म्हणूनी तिस पैसे देवून। फेड त्याची केली आम्ही॥३७॥ ऐकूनी ऐसे उत्तर। केला स्वामीस नमस्कार। आणि निघाले सत्वर। कुंडलला येण्यास॥३८॥ मार्गाने असता जात। विचार करी आपसात। साधूबरोबर लावून शर्थ। विस रूपये घालविले॥३९॥ त्यातील एक बोलीला। अरे विडी ओढू चला। रूपये गेले त्याला। काय आता करणार॥४०॥ तळमळूनी होणार काय आता। ऐसे म्हणूनी विडी करिता। खिशांत हात घालता। चार रूपये मिळाले॥४१॥ त्यास आश्चर्य वाटले। इतरांना ते सांगितले। मग त्यांनीही पाहीले। आपआपले खिशांत॥४२॥ सहा आठ दोन। रूपये निघाले त्यातून। सर्वास संतोष होवून। बोलले येणे रिती॥४३॥ महाराज देव अवतरले। त्यांनीच हे रूपये दिले। तेंव्हापासून भक्त बनले। ऐकनिष्ठ श्रोते हो॥४४॥ त्या दिवसापासून। धंदयात यश मिळोन। सुखी झाले पहेलवान। संतकृपा काय न करी॥४५॥ ऐकदा सांगितले नामदेवास। बोलवावे न्हाव्यास। डोईचे केस काढण्यास। बुरूंगवाडी गावातून॥४६॥ गुरू आज्ञा घेवून। नामदेव बुरूंगवाडीस येवून। न्हाव्यास पाही विचारून। परी कोणी येईना॥४७॥ कोणी येणे होत नाही। दहा वाजेपर्यंत पाही। कोणी बोले सवड नाही। आज मज येण्यास॥४८॥ कोणी म्हणती पुढे चला। ऐकूनी ऐशा उत्तराला। नामदेव चिंतीत झाला। गुरूसेवा घडेना॥४९॥ सांगितलेली गुरूने। अल्पसेवा न होणे। मज कडून चांडाळजाणे। आहो मी पूर्वजन्मीचा॥५०॥



न्हावी कुळात जन्मलो असतो। तर गुरू कामा आलो असतो। ऐशा विचारे तो। दुःखी झाला अंतरी॥५१॥ जवळ होती एक विहीर। जुनी पुराणी साचार। मोडतोड झाली फार। त्यात जावूनी बैसला॥५२॥ नेत्रासी पूर लोटला। कैसा पापी आलो जन्माला। गुरू आज्ञेचा भंग झाला। आज मजकडून की॥५३॥ सर्वज्ञ गुरूनाथ। जाणीला सर्व वृत्तांत। नामदेवासी हाक मारिता। वर ये म्हणूनीया॥५४॥ तो आवाज विहीरीतही। स्पष्ट उमटला पाही। नामदेव आला लवलाही। बाहेर विहीरीतून॥५५॥ ही अमृततुल्य वाणी। सद्गुरूची आहे जाणी। ऐसे समजूनिया मनी। डोंगरावरी पातला॥५६॥ अरे वेडया न्हाव्याकरिता। एवढा का झाला रडता। तो बोलीला सद्गुरूनाथा। आज्ञा पाळती ईश्वर॥५७॥ सजीव निर्जीव आज्ञा पाळती। स्वर्गिचे देव ना टाळती। आणि मजकडून ती। पाळणे न झाले जी॥५८॥ म्हणून वाटले वाईट। अरे स्मरणी घेवून हातात। मुखी नाम स्मरण करीत। कोठीचे बाहेर बैस तू॥५९॥ मी बसतो कोठीत। ऐसे म्हणूनी गेले आत। कोठीची कडी लावूनी घेत। ऐक तासानी निघता पै॥६०॥ तेव्हा नामदेवाने पाहीले। स्वामी हजामत केलेले। कपाळी गंध लाविले। स्नान करोनी श्रोते हो॥६१॥ तो विचार करी मनात। वस्तरा असावा कोठीत। परी गंध कोठील लावत। स्नान कोठे केले पै॥६२॥ जाणूनी तयांचा हेतू। महाराज त्यास म्हणत। माझी स्मरणी आहे आतं। तिला घेवोनी यावे रे॥६३॥ नामदेव कोठीत जावून पाही। स्मरणी शिवाय दुसरे काही। साबन आणि वस्तराही । न दिसे तयास॥६४॥ विचार करी मनात। हे तर मोठे नवल वाटत। हजामत स्नान

कोठे करीत। गंध कोठे लावले।।६५।। पुजाऱ्याची मुले दुसरे दिवशी। येते झाले महाराजापाशी। आणि म्हणाले स्वामीसी। कोठे गेला काल पै।।६६।। स्नान करीतो म्हणून अदृश्य झाले। पुन्हा न दिसे आम्हासी।।६७।। महाराज बोले तत्वता। अरे काही तरी बोलता। नामदेवाने विचारीता। मुले सांगती तयास।।६८।। महाराज काल दहा वाजता। आले हजामत करण्याकरीता। चांगले न्हाव्याकडूनी निगुता। हजामत दिली करवून।।६९।। वरूनी अत्तर लाविले। आणि स्नानाकरीता गेले। तो पुन्हा वर ना आले। अदृश्य झाले तेथोनी।।७०।। सद्‌गुरू सामर्थ्य अघटीत। जे ना घडे ते घडवित। ऐसा विचार करूनी मनात। नमस्कार केला नामदेवाने।।७१।। सद्‌गुरू आपुले शिष्याचे। पोषण कैसे करीती साचे। उदाहरण एक तयाचे। निवेदन करूनी सांगतो।।७२।। नामदेव गेला कुंडलला। श्रोतेगण भिक्षा मागण्याला। रस्त्यात भेटला त्याला।फौजदार तेथला।।७३।। भिक्षा मागितली दोन घरी। फौजदार बोलीला त्यावरी। आपण कोण ये अवसरी। सांगावे मजलागी।।७४।। मी परमात्मा ब्रम्हानंदाचा। शिष्य आहे नामदेव नावाचा। ऐकूनिया ऐसी वाचा। फौजदार बोलीला तयासी।।७५।। ब्रम्हानंदानी आजवरी। कधिच ना भिक्षा मागितली। असंख्य मानसे जेवू घातली। तयांनी आपुले सामर्थ्ये।।७६।। तू तयांचा शिष्य असून। तुला न द्यावे भोजन। हे मोठे नवल जाण। आम्हासी वाटतसे।।७७।। तुम्ही भिक मागता। मजसी सांगा आता। काय राजयांची कांता। भिक मागे।।७८।। नामदेवास वाईट वाटूनं। भिक्षा मागण्याचे दिले सोडून। आणि आला परतून। स्वामी जवळ डोंगरावरी।।७९।।



महाराज झाले बोलता। काय राजयाची कांता। भिक मागे ऐसी जनता। तुजसी म्हणते ना।।८०।। जर तू आमचा आहे। ऐसे लोक म्हणती पाहे। तर भिक मागणे तुझे हे। आजपासूनी बंद करी।।८१।। तु जेथ जेथ जाणार। तेथे तुला जे लागणार। अन्न ते पुरविणार। आम्ही तुला बालका।।८२।। प्रचीतीस पहावे यांचे। म्हणूनी वाल्मीकी खेड्याजवळचे। डोंगरावरी साचे। नामदेव येवूनी राहिला।।८३।। तेथे वृक्ष वाढले थोर। वेलींची दाटी फार। व्याघ्रा ऐसे हिंसाखोर। प्राणी असती आश्रयास।।८४।। वाट नसती जाण्यास। जनावरे न फिरती आसपास। ऐशा त्या काननास नामदेव येवूनी राहीला।।८५।। अंत न लागे ब्रम्हानंद लीलेचा। तेथे एका व्यापाऱ्याचा। बैल चुकोन आला साचा। निबिड ऐशा अरंण्यात ।।८६।। त्याचा शोध घेत घेत। व्यापारी येवुन पोहचत। नामदेवास पाहूनी तेथ। जवळ तयाचे पातला।।८७।। आणि पुरेल तिन दिवस। इतका फराळ दिला त्यास। वाईट वाटे नामदेवास। परीक्षा वचनाची घेतली।।८८।। इतके अनुभव येवूनी। वचनी विश्वास न ठेवूनी। प्रचिती पाहीली मी। किती मुर्ख जाणावा।।८९।। असो फराळ संपल्यावर। आला परतून डोंगरावर। स्वामी भेटीस साचार। नामदेव शिष्य तो।।९०।। पुन्हा एकदा सद्‌गुरूनाथ। नामदेवास घेवून सोबत। नरसोबाचे वाडीस येत। उत्सव पाहण्या दत्ताचा।।९१।। उत्सव वगैरे आटोपून। मग घेवून दत्त दर्शन। कुंडलासी परतून। येण्यास निघाले तेथोनिया।।९२।। रस्त्यात बोलले नामदेवास। अनरसे पाहीजे आम्हास। नामदेव गेला दुकानात। परी अनारसे मिळेना।।९३।। दुसरा फराळ घेवून। नामदेव आला परतून। महाराज

Scanned by TapScanner

म्हणती तयालागून। अनारसे मिळाले नाही काय॥९४॥ तार देतो आता म्हणत। आणि गाडीत येवूनी बसत। दोघे आले कुंडलात। सिताराम जोश्याचे घरी॥९५॥ सिताराम जोश्याची मुलगी जाण। होती महाराजाची भक्तीन। महाराजाचा आवाज ऐकून। दार तिने उघडले॥९६॥ दोघे आत शिरली। कढई चुलीवर पाहीली। अनारश्याची ताटे आणीली। मुलीने दोघा खाण्यास॥९७॥ अनरसे ताजे गरम। दोघांनी केले भोजन। थोड्या वेळाने नामदेवान। विचारीले मुलीस॥९८॥ अनरसे करण्यास कोणी। सांगितले तुजलागोनी। रात्री झोपले असता जाणी। दृष्टोंत मज जाहला॥९९॥ महाराज येवूनी स्वप्नांत। सांगितले अनरसे करण्यात। म्हणूनी केले अनरश्यास। ऐसे मुलीने सांगितले॥१००॥ पुढे एकदा महाराजांनी। सर्व शिष्यास घेवूनी। आणिले सफर करवूनी। तेची कथा ऐकावी॥१०१॥ छोटूबुवा मालवणकर। नामदेव शिष्य बार्सिकर। नाथबुवा आणि इतर। निघाले सफरीला घेवून॥१०२॥ फिरत आले मच्छिंद्रगडावर। ता मच्छिंद्रनाथाचा डोंगर। आहे सुवर्णाचा साचार। ऐसे शिष्यास दाखविले॥१०३॥ त्याचा उपभोग जाण। होणार नाही सिध्दावाचून। ऐसे शिष्यास सांगून। दर्शन घेतले मच्छिंद्राचे॥१०४॥ आले तपकिरीचे डोंगरावरी। भैरवनाथ तेथे जागृंत। पाण्याचा दिवा जळत। वार्षिक रीतीने नित्यची॥१०५॥ पूर्वकाली होते सत्व। पाण्याचा दिवा सतत जळत। पुजारी ते ऐकदा विकत। म्हणूनी आता वार्षिक॥१०६॥ परमात्मा एक गुप्तरीती। तेथे नित्य राहती। ऐसे सांगती दृष्टांती। ब्रम्हानंद महाराज॥१०७॥ नंतर तेथून बेहेग्रामा। तेथे केले मुक्कामा। दाखविले



निर्गुण ब्रम्हा। साकार रूपाने॥१०८॥ त्याचे नाव आप्पाजी पंत। नंतर आले नरसिंहपुरा प्रत। नरसिंहाचे स्थान दाखवित। फराळ केला तेथेची॥१०९॥ दर्शन घेवून आले इस्लामपुरी। गेले नायकीन बाईचे घरी। ती नाईकीन बाई खरी। दादू कळवंताची मावशी पै॥११०॥ रात्रीस तेथे राहीली। परिक्षा शिष्यांची घेतली। नाईकीन बाईच्या दोन मुली। शिष्यामध्ये झोपविल्या॥१११॥ रात्र तेथे काढून। दुसरे दिवशी निघाले तेथोन। येते झाले कऱ्हाडालागून। कृष्णाकोयनेच्या संगमावरी॥११२॥ तेथे केली विचारणी। ब्रम्हचर्यांची शिष्यगणी। सतरा पैकी पाचजणी। ढळले नाही त्यापासून॥११३॥ महाराज म्हणती त्यावर। अरंण्यात राहूनी साचार। जितेंद्रीय होणार। आहांत तुम्ही काय रे॥११४॥ वरीले जैसे परिक्षेत। जो कोणी कायम राहत। जितेंद्रीयता प्राप्त। त्यासीच होते समजावे॥११५॥ पुढे चाफलास पोहचले असता। रामदासाचा उत्सव चालू होता। मृत गायीस झाले उठविता। स्पर्श करूनी महाराज॥११६॥ पाहून स्वामींचा अधिकार। रामदासांनी केला जयजयकार। बसवूनी उच्चासनावर। पूजन केले शिष्यासह॥११७॥ अर्धपाद्य पूजा करून। फळफळावळ दिली फराळालागुन। तदनंतर देवूनी भोजन। गळ्यात पुष्पहार घातला॥११८॥ हात जोडूनी स्तूती करीता। महाराज झाले बोलता। तुम्ही चमत्कारास नमस्कार करता। ऐसे मज वाटते॥११९॥ कां की तिन दिवसापासूनी। ऐक महात्मा उपवाशी असूनी। तुम्ही न दिले अन्न पाणी। त्या महात्म्या कारणे॥१२०॥ परी माझा चमत्कार दिसता। पुजा अर्चा करूनी तत्वता। स्तुती माझी झाले करता। हा केवढा

Scanned by TapScanner

अपराध।। १ २ १।। तरी आताचे आता जावून। महात्म्यास यावे घेवून। त्याची पुजा अर्चा करून। भोजन द्यावे तयासी।। १ २ २।। ऐसे स्वामी सांगता क्षणी। रामदासी म्हणती हात जोडूनी। महात्म्याची माहीती देवूनी। अपराधातूनी वाचविले।। १ २ ३।। आम्ही आहो अंधजन। सज्ञान दृष्टी येईल कोठोन। आपण ईश्वर आहा म्हणोन। माहीती दिली अमुल्य।। १ २ ४।। ऐसे बोलोनी रामदासी। गेले त्या महात्म्यापाशी। बोलु लागले विनयेशी। अपराधी आम्ही महाराज।। १ २ ५।। सुरू असता नगर भोजन। उपवाशी आपण तीन दिवसापासून। आहो आम्ही अंधजन। क्षमा त्याची करावी।। १ २ ६।। आमचे भाग्य उदेले। म्हणूनी ऐक सत्पुरूष आले। त्यांनी आम्हास सांगितले। तुम्ही उपवाशी म्हणोनीया।। १ २ ७।। म्हणूनी आलो बोलाविण्या। आपण सत्वरी चलाना। ऐशा ऐकूनी भाषणा। महापुरूष बोलीला।। १ २ ८।। ऐसा कोण सत्पुरूष। की त्याने जाणीले तिन दिवस। उपवाशी मी आहेस। चला दर्शन घेवू त्यांचे।। १ २ ९।। खाणे पिणे नंतर। ऐसे म्हणूनी साचार। येवूनी स्वामीस नमस्कार । दंडवत घातला।। १ ३ ०।। हे प्रभू राघवरामा। आमचे भाग्यास नाही उपमा। दर्शन देवूनी शांतिधामा। कृतार्थ मज केलेस।। १ ३ १।। ऐसे तो महात्मा पुरूष। बोलीला ब्रम्हानंद स्वामीस। ब्रम्हानंद म्हणती तयास। या अगोदरच दर्शन दिले तुम्हा।। १ ३ २।। ऐकदा सकाळी प्रयागास। पाच वाजता गंगास्नानास। करीत असता तुम्हास। ब्राम्हणरूपे भेट दिली।। १ ३ ३।। अदृश्य झालो तेथून। ही दुसरी भेट असून। आजूनी तिसरी होईल जाण। भेट एकदा तुम्हासी।। १ ३ ४।। ऐसे महात्म्यास सांगितले। आणि सवे शिष्य घेतले।



कुंडलचे डोंगरावरी आले। सफर संपवूनी ब्रम्हानंद।। १ ३ ५।। इति श्री शामसुंदर रचित। ब्रम्हानंद चरित्र ग्रंथ। सुखी ठेवो भक्ताप्रत। ब्रम्हानंद कृपेने।। १ ३ ६।।

।।ब्रम्हानंद चरित्र सार ग्रंथ सप्तदशोध्याय समाप्त।।

Scanned by TapScanner

# अध्याय अठरावा

श्री गणेशायनमः। श्री दत्तात्रेय नमः। जयजयाजी पंढरीनाथा। भक्तवत्सला रूक्मीणीकांता। तूची मज धरूनी हाता। पार उतरवी भवातूनी।।१।। भक्त पडता संकटी। अवतार घेवूनी जगजेठी। धावूनी जासी त्यासाठी। ऐसा तू भक्त वत्सल।।२।। प्रल्हाद बालक तीज भजत। म्हणूनी पिता त्या छळत। पर्वतावरूनी लोटून देत। अग्नित टाकीती क्रोधाने।।३।। समुद्रात देती लोटून। तरी बुडवू न शके जीवन। अग्नि शांत होवून। न जाळीती तव भक्ता।।४।। ऐसा तुझा अगाध महिमा। संत गाती पुरूषोत्तमा। मज बालका नारायणा। पाव वेळ करू नका।।५।। अेकदा संन्यासी काशिचा। आला डोंगरावरी साचा। वाद चालीला तयाचा। शिष्यासोबत स्वामींच्या।।६।। ब्रम्हानंद माऊली तेथे नव्हती त्या वेळी। प्रारब्ध आणि प्रयत्न वादावर झाली। चर्चा असे तयांची।।७।। शिष्य म्हणती प्रारब्ध श्रेष्ठ। संन्यासी बोले प्रयत्न श्रेष्ठ। प्रारब्ध आहे कनिष्ठ। कोठला काढला तयासी।।८।। शिष्य म्हणती त्यावर। प्रयत्न होती निसार। प्रारब्धापुढे साचार। शुक्राचार्याचा पहा इतिहास।।९।। गर्भज्ञानी ते कैसे झाले। प्रयत्न त्यांनी कोठे केले। गर्भातच ज्ञानी झाले। प्रयत्नावाचून नव्हे का।।१०।। त्यावर संन्यासी झाला बोलता। अरे प्रारब्ध म्हणूनी का रडता। पुरूषार्थ केल्या परता। काहीच ना घडती पै।।११।। प्रारब्ध जर खरे असते।



तर भगवंतानी गितेत। अर्जुनास सांगितले नसते। योगी श्रेष्ठ म्हणूनिया।।१२।। भगवंत म्हणती धनंजया। तपी ज्ञानी कर्मी या। तिघांपेक्षा योगी या। श्रेष्ठ तू समजावे।।१३।। योगी होशिल प्रारब्धाने। तुझ्या ऐसे अर्जुनाकारणे। कां न सांगितले भगवंताने। पुरूषार्थ कां गायिला।।१४।। त्यांना काय समजत नव्हते। की तुम्ही शहाने तयावरूने। शिष्य बोलले संन्याशाते। स्वामीजी ऐका थोडेसे।।१५।। पांडवा घरी राहून भगवंत। अर्जूनासीच का उपदेशीत। त्या ऐवजी दुर्योधनाप्रत। कां न करी उपदेश।।१६।। त्यांना सुध्दा बुध्दी मन। सर्व इंद्रीये होती जाण। आम्हास याचे कारण। समजावून सांगावे।।१७।। अरे मी सांगितले ज्ञान समस्त। तुमचे मेंदूत नाही उतरत। ऐसे तज आहे वाटत। कान उघडून ऐका जरा।।१८।। अरे अर्जुन किती प्रयत्नवादी असत। हे तुम्ही ना जाणत। त्याचे उदाहरण तुम्हाप्रत। सांगतो ते ऐकावे।।१९।। दर्योधन बोलीला भगवंता। तुम्ही अर्जुनासीच श्रेष्ठ का मानता। याचे कारण तत्वता। सांगा मज यदूराया।।२०।। अर्जुन आपले महालात। झाला असता निद्रामत। दुर्योधनास घेवून भगवंत। जाते झाले ते ठायी।।२१।। अर्जुनाचे डोकीचे केस। हाती धरून रुक्मिणीश। लावी दुर्योधनाचे कानास। आवाज येती त्यातूनी।।२२।। जयकृष्ण जयकृष्ण। ऐसा आवाज त्यातून। निघती तो ऐकून। श्रेष्ठता दाविली अर्जुनाची।।२३।। यावरून अर्जून। प्रयत्न वादी परीपूर्ण। होता ऐसे निधान। ठरत नाही काय की।।२४।। शिष्य बोलले नंतरची। राहू द्या उदाहरणे द्वापारची। आता प्रश्न करीतो साची। माफी असावी आम्हास।।२५।। परी उत्तर द्यावे स्वामीवरा। 'सलगीच्या उत्तरा।

Scanned by TapScanner

तुका म्हणे क्षमा करा।' संत वाक्य आहे की॥२६॥ आपली जन्मभूमी कोणती। नाव तिचे काय असती। लोकसंख्या किती। आहे ते सांगावे॥२८॥ जन्मभूमी माझी कानपूर। दिडलाख लोकसंख्या साचार। स्वजातीय पाच हजार। सकुल नव्वद आहेत॥२९॥ अकरा बंधु पाच बहीणी। आम्ही सख्खे बांधव जाणी। एकूण आहो सोळा मिळोनी। विचारावे आणिक॥३०॥ संन्यासी ऐकटे आपण। कैसे बनले त्यातून। दिक्षा दिली ज्या गुरून। तुम्हालागी स्वामीजी॥३१॥ त्यानेच हळूच दिले का मंत्रास। भाऊ बंद आणि आप्त वर्गास। तैसेची इतर मंडळीस। मंत्र का न दिला त्यांनी॥३२॥ द्यावे याचे उत्तराला। मग गाजवावे प्रयत्न वादाला। संन्याशी गडबडून गेला । सुचेना त्यासी काही ॥३३॥ योग्य ऐसे उत्तर त्यास। देता येईना संन्याशास। ऐसा वाद तीन दिवस। खडाजंगी चालीला॥३४॥ कुंडल येथील मंडळी। वाद ऐकण्यास होती जमली। संन्याशी देना उत्तर मुळी। म्हणूनी श्रोते बोलीले॥३५॥ ब्रम्हानंद सद्गुरू। आल्याशिवाय निवारू। शके ना कोणी साचारू। ऐशा या वादासी॥३६॥ शिष्याचेही मनी आले। सद्गुरू पाहीजे या वेळे। इतक्यात प्रकट झाले। ब्रम्हानंद महाराज॥३७॥ राजे बापु नामदेव बुवा। मालवणकर नाथ बुवा। श्रोते मंडळी छोटू बुवा। आनंद झाला सर्वास॥३८॥ दर्शना करीता सर्वजण। उभे राहीले हात जोडून। परी संन्यासी नादान। जागे वरून ना हालले॥३९॥ स्वामीस ना वाईट वाटले। उलट त्याला नमस्कारा केले। कुंडलातील मंडळींनी भले । प्रश्न मांडीला वादाचा॥४०॥ आपले शिवाय साचार। वादाचा शेवट ना होणार।



कर्णेंद्रियास आमचे फार । भुक लागली ऐकण्याची॥४१॥ महाराज म्हणती प्रेमभावे। माझे प्रश्नाचे उत्तर द्यावे। कोणत्याही पक्षाने बरवे। तो प्रश्न ऐसा की॥४२॥ वृक्ष अगोदर की बीज अगोदर। या प्रश्नाचे योग्य उत्तर। देईना कोणी बरोबर। दोन्ही पक्षाकडील पै॥४३॥ या प्रश्नाचे उत्तर। ब्रम्हानंद देती अखेर। घेवूनी कृष्ण उक्ती सार। तयाचा सांगितला॥४४॥

विनतदहं अर्जुना।

एकोश्वहं हुशाम॥

ऐसी आहे ती उक्ती। महाराज त्याचा अर्थ सांगती। तेची ठेवितो आपले पुढती। सावध चित्ते ऐकावे॥४५॥ अर्जुनास म्हणती भगवान। माझे संकल्पेकरून। झाले हे ब्रम्हांड निर्माण। वाद सांगितले त्यातची॥४६॥ कर्तुत्व म्हणजे पुरूषार्थवाद। भोक्तृत्व म्हणजे प्रारब्धवाद। ऐसे प्रकारे अनादीसिध्द। मीच उत्पन्न केला पै॥४७॥ याचा अर्थ असा आहे। प्रयत्न करतेवेळी पाहे। प्रयत्नवाद जाणावे हे। स्पष्ट करून सांगतो॥४८॥ शेतकरी शेतात राबून। नांगर कुळवणी पेरण। संरक्षण सर्वांगीण करून। माल घरी आणतो॥४९॥ माल घरी येई पर्यंत। खास प्रयत्न म्हणतात। तेची धान्य असता विकत। शेतकरी ऐसे म्हणतो पै॥५०॥ माझे प्रारब्ध कीती बलवान। म्हणूनी मी आहे सधन। या दोन्ही प्रकारावरून। ऐसे सिध्द होते पैं॥५१॥ पूर्वीचे जे असती प्रयत्न। त्याचेच प्रारब्ध फल जाण। आणि नविन कर्तृत्वास जाण। प्रयत्न म्हणावा शिष्य हो॥५२॥ म्हणूनी ऐसा ठरतो सिध्दांत। प्रारब्ध प्रयत्न येक असत। तुम्ही म्हणा पुरूषार्थ। अगर

Scanned by TapScanner

वाटेल समजावे॥५३॥ जीव करूनी पुरूषार्थी फल भोगण्यास होतो समर्थ। यावर ऐक सिध्दांत। आहे तो ऐकावा॥५४॥ ईश्वरे ब्रम्हांड निर्मीले। त्यात ज्यांनी जैसे कर्म केले। तैसी तैसी मिळतात फळे। यास प्रमाण आहे ऐक॥५५॥ जो जो कर्म करी जैसें। फळ त्यासी तैसे तैसे। प्रमाण जरी असले ऐसे। तरी ते अवघड॥५६॥ कर्मा ऐसे फळ देणं। आहे ईश्वराधीन। कां की जीव नाना कर्मे करून। मागती फळे भलते सलते॥५७॥ त्यापासून घात पात। लोकांचे होणार असत। तैसे फळ ईश्वर ना देत। यावर शंका ऐसी की॥५८॥ शंभर यज्ञ केले पुरते। तर इंद्रपद प्राप्त होते। ऐसे वेद प्रतिवादीते। वेद कायदा ईश्वराचा॥५९॥ शंभर यज्ञे करूनही। ईश्वराने फळ नाही। दिले तर असत्य ही। उरणार नाही का॥६०॥ याचे उत्तर पाही आता। ईश्वराने ती सत्ता।आपले जवळ तत्वता। ठेविली आहे राखुन॥६१॥ पंचदशी अथर्वण वेदांत। पुरावा याचा आहे विदीत। जीव कर्म करण्याप्रत। स्वतंत्र आहे पूर्णपणे॥६२॥ परी फळ भोगण्याकरीता। नाही तया स्वतंत्रता। ते तर ईश्वराधीनता। याचे कारण ऐसे की॥६३॥ पूर्वी कुंभकर्णानी बारा हजार। वर्षे तपश्चर्या केली साचार। फलश्रुतीचा संकल्प थोर इंद्रपदाची प्राप्ती व्हावी॥६४॥ इंद्रपद त्यासी दिले जर। ब्रम्हांडी अनर्थ माजविल्यावर। यासी फल ना द्यावे तर। तपश्चर्या फार मोठी॥६५॥ ऐसा विचार करून। मनोवांच्छित फल न देऊन। सरस्वती जिव्हाग्री बसवून निद्रापद मागविले॥६६॥ तैसेची नहूष राजानी। नव्याणव यज्ञे करोनी। शंभराव्यास सुरूवात जाणी। केली असे तयाने॥६७॥ तो ही यज्ञ जवळ जवळ। पूर्ण होण्याची



आली वेळ । संधी साधुन केवळ। इंद्रगेला विष्णुकडे॥६८॥ महाविष्णूला प्रार्थून। सांगीतले नहुष राजान। नव्याणव केले यज्ञ। शंभरावा आला पूर्ततेस॥६९॥ इंद्रपद व्हावे प्राप्त हाची त्याचा संकल्प असत। योग्यायोग्य जाणूनी यतार्थ। इंद्रपद द्यावे तयासी॥७०॥ ऐसी विनंती करण्यास। आलो आपले चरणासी। तरी देणे न देणे ते तयास। आपले सत्तेत आहे जी॥७१॥ महाविष्णू बोले इंद्रास तुम्ही ना करावे चिंतेस। तो योग्य ना इंद्रपदास। माहीत आहे मजलागी॥७२॥ परी मला प्रत्यक्ष कर्माची। फले द्यावी लागली साची। मार्ग नाही दुसराची। दिल्याशिवाय इंद्रपद॥७३॥ परी मम सत्येस। अयोग्य इद्रास न लागता क्षण। करता येते कोणत्याही रूपान। नाहीसे मजलागी॥७४॥ ऐसे इंद्रास सांगितले। नहुष इंद्रपदी आले। मुढपणे अचरले। फळ मिळाले तैसेची॥७५॥ अलकनंदेचे स्नानास। जायचे होते नहुषास। म्हणोनी पालखी वाहण्यास। हाक मारी सेवकाला॥७६॥ त्यास झाला थोडा वेळ। क्रोध तया·येई तात्काळ। बैसलेल्या तयाजवळ। ब्रम्हानिष्ठास बोलला॥७७॥ फुकट खाऊन येथे बसता। चला उचला पालखी आता। ऐसे सत्येने बोलता। पालखी अचली ऋषीगण॥७८॥ हळू चालती म्हणून। नहुष कोपला दारूण। आणि बोलला शनै शनै। गबाळे हो चालू नका॥७९॥ सर्प सर्प गतीने चला। ऐसे उद्दाम्मपणे बोलीला। तयी ऋषी एक त्याला। शाप देती भयंकर॥८०॥ मुर्खातुला खांद्यावर। घेवुनी चालले ऋषीवर। परी चालवेना सत्वर। म्हणूनी रागावलासी॥८१॥ तुझे ऐसा मुर्ख साचार। योग्य ना इंद्रपदावर। तु जावूनी पृथ्वीवर। सर्प होवूनी राहावे॥८२॥ ऐसे

Scanned by TapScanner

मिळोनी शाप वचन। मृत्यूलोकी दौंडपासून। बाराकोसावरी जाण। पळसगावाचे अरण्यात॥८३॥ चंद्रभागेचे काठी। सर्प होवूनी पडती। अजूनी त्या योनीत असती। ऐसे सांगती पुराण॥८४॥ या वरूनी ऐसे दिसत। ईश्वर सत्ता श्रेष्ठ ठरत। ज्ञानेश्वरे ज्ञानेश्वरीत। लिहीले ये विषयी॥८५॥

" म्या बोलविल्या वेद बोले"
म्या चालविल्या सूर्य चाले।
म्या हालविल्या प्राण हाले।
जो जगाते चालविता।

ऐसे ज्ञानदेव लिहती देख। शंका घेतील सूज्ञ वाचक। प्रेमभरात संत लोक। वाटेल ते बोलती॥८६॥ परी श्रीकृष्ण भगवंत। बोधता अर्जुनाप्रत। सांगताती विवेचन। तोची पुरावा पहावा॥८७॥

मयाऽध्यक्षेने प्रकृतिः सुयते चराचरम् । हेतूनाऽनेन कौंतेय जगव्दीपरीवर्तते ।

याचा अर्थ ऐसा देख। मी असल्याने नियामक। सर्व चराचर सृष्टीची नेक। उत्पत्ती करविते प्रकृतीकडून॥८८॥ याच कारणे जगाचा। हा निरंतर साचा। चालू आहे युगायुगाचा। ऐसे भगवंत सांगती॥८९॥ असो, ब्रम्हानंदांनी शेवट। सत्तावाद ठरविला श्रेष्ठ। म्हणोनी जीवांनी एकनिष्ठ राहावे ईश्वरासी॥९०॥ 'तुझीया सत्तेने तुझे गुण गाऊ। तेणे सुखी राहू सर्वकाळ।' या



संतवचनावरून। जिवास पुरूषार्थ करण्यालागून। सत्ता आहे परीपूर्ण। परी ईश्वर सत्तेने॥९१॥ म्हणून ईश्वरास प्रार्थून। प्रयत्न करावा नेटानं।फळ देईल ईश्वर जाण। संकल्प शुध्द असल्यास॥९२॥ ऐसा उपदेश ऐकून। सर्वास आनंद परीपूर्ण। ब्रम्हानंदाचे गुणगान । करीत गेले घराकडे॥९३॥ मगील अध्यायी कथन। महाराज गेले सफरी लागुन। सफर पूर्ण करून। परत आले कुंडलला॥९४॥ कुंडलला ठेवून इतरासी। आले बुरूंगवाडी मठासी। नामदेवास घेवून सोबतीसी। ब्रम्हानंद महाराज॥९५॥ तेथे संवाद दोघांचा। झाला अति महत्वाचा। तोची श्रोते गणी साचा। सावध चित्ते ऐकावा॥९६॥ नामदेव झाला विचारीता। सर्व मार्गात कोणता। श्रेष्ठ मार्ग परमार्थाचा। तेची मज सांगावे॥९७॥ ब्रम्हानंद देती उत्तर। कर्म उपासना साचार। योग तप या चार। मार्गापिक्षा श्रेष्ठ ज्ञानमार्ग॥९८॥ 'ज्ञानी परी समान्यते।' एसे भगवंत सांगते। झाले म्हणोनी ज्ञानापरते। शेंवट तो होईना॥९९॥ ते ज्ञान शाब्दिक नसून। गुरू परंपरा अनुभव जन्य। असावे ते तुजलागुन। मजकृपे मिळाले की॥१००॥ थोडी राहीली कसर। माझा सगुण देह गेल्यावर। सहावे मासी चिन्मयानंद साचार। पूर्तता करेल तयाची॥१०१॥ स्वामी आपले बोलण्यावरून। ऐसे वाटते मजलागुन। लवकरी संपवणार अवतार सगुण। म्हणूनी वाईट वाटते॥१०२॥ बाबारे, सूर्य आहे अस्तास गेला। तयाचा अवशिष्ट प्रकाश राहीला। काय साधुन घ्यायचे कोणाला । असेल ते घ्यावेत॥१०३॥ ऐकूनी शिष्यास दुःख झालेले। डोळ्यात अश्रू आलेले। मन तयांचे तळमळलेले। पाहून स्वामी बोलती॥१०४॥ तुला दिले आहे

Scanned by TapScanner

अभयवचन। त्याचा शेवट करून। माझे कडे असून। चिंता का करीतोसी।।१०५।। प्रारब्ध योगे संसार। तुझा होईल वर्षे चार। तरी तो न कचरता कर। धर्म मर्यादा सांभाळून।।१०६।। पार पाडणे यातूनी। आहे मजकडे जाणी। न केल्यास पूनर्जन्म घेवूनी। भोगावे लागेल तुला ते।।१०७।। नामदेव बोलला ऐकूनी। आपले वचनाप्रमाणी। प्रारब्ध भोग भोगल्याजाणी। याच जन्मी मी तयार।।१०८।। वेळ नको पुनर्जन्माची। याच जन्मी अक्षयानंदाची। इच्छा पूर्ण करा साची। तथास्तू म्हणूनी दिला आशिर्वाद।।१०९।। शरीर हे क्षणभंगुर। याचा भरवसा तीळभर। वाटत नाही मज साचार। तयी सद्गुरू बोलती ऐसे पां।।११०।। क्षणभंगुर वगैरे काही नाही। पंचेचाळीसाचे आत पाही। सत्तेचाळीसाचे वर नाही। शरीर तुझे राहणार।।१११।। तो पर्यंत काळ बाधा। होणार नाही जाण कदा। खूण त्याची ऐक आता। सांगतो ती ऐकावी।।११२।। माझा अवतार संपल्यापासूनी। ऐक वर्ष नऊ महिन्यांनी। वद्य पंचमी या दिनी। दिवसा चार वाजता।।११३।। वडील तुझे वैकुंठास। जातील बा निश्चीयेस। नंतर आषाढ शुध्द एकादशीस। ऐक वर्ष एकवीस दिवसांनी।।११४।। सायंकाळी सहा वाजता। पती लोकी जाईल माता। हे बोल लिहूनी तत्वता। हृदय पटली ठेवावे।।११५।। शिष्य विचारी नंतर। आपण निराकारी एकटा होणार। किंवा घेवूनी सगुण अवतार। येणार आहे काय पुन्हा।।११६।। अरे बाळा सद्गुरू बोले। आजवरी अवतार बरेच झाले। पुढेही होणार वहीले। चैतन्य आहे अवतारी माझे।।११७।। हे तू लक्षात ठेवावे। अजून काही विचारावे। मनी इच्छेस न ठेवावे। शंका विचारी



कोणतीही।।११८।। स्वामी आपले चरणावाचून। कोणती इच्छा नाही आण। तरी बरीच प्रचिती देवून। तृप्त केले मजलागी।।११९।। संजीवनी मंत्र कथिला पूर्ण पणे। आयुष्य वाढविणे अदृश्य होणे। दूरदेशातील ऐकू येणे। माहीती दिली याची मज।।१२०।। एका देहाचे अनेक देह करणे। पर्वताचे पोटात रहाणे। पाण्यावरूनी चालणे। आकाशी उडणे पक्ष्याऐसे।।१२१।। आणि बरीच माहीती। कथीली आपण मज प्रती। तरी त्याचा उपयोग प्रचीती। घेण्याचे ना प्रयोजन।।१२२।। परमपदातून थकून। अहंकाराच्या घोड्यावर बसुन। कावळ्या जैसे फिरून। प्रलयापर्यंत ना उपयोग।।१२३।। ज्ञानदेवानीं बावीस वर्षात। निराकार कैवल्य केले हस्तगत। अमृतानुभव ग्रंथ शाश्वत। करून ठेंविला।।१२४।। तरी चरणाचा ना वियोग व्हावा। ऐशा प्रकारे वरदहस्त ठेवा। तो अक्षयी कायम असावा। हीच आस सद्गुरू।।१२५।। ऐसे बोलता गहीवर दाटला। सद्गुरूपोटी धरी त्याला। आलेले अश्रू लोचनाला। पुसून दिले अभयवचन।।१२६।। तुझे केले कल्याण। ऐसे स्वामीने बोलून। फराळास दिले आणून। पंढरी जाण्या सांगितले।।१२७।। शिष्य नामदेवानी। नमस्कार केला सद्गुरू चरणी। आणि निघाला पुढरपुरा लागूनी। आनंदे करी गमन पै।।१२८।। इति श्री श्यामसुंदर रचित। ब्रम्हानंद चरित्र सार ग्रंथ। सद्भक्ती देवो भक्ताप्रत। हीच प्रार्थना स्वामीसी।।१२९।।

।। श्री ब्रम्हानंद चरित्र सार ग्रंथ अष्टादशोध्याय समाप्त।।

Scanned by TapScanner

# अध्याय एकोणिसावा

श्री गणेशायनमः॥ जय जय व्दारकाधिशा। कंसातका रूक्मीणीनीशा। अर्जुनसखा गोपविलासा। केशी मर्दना पुतना नाशका॥१॥ द्रौपदीसी वस्त्रे पुरविली। सुवर्ण नगरी सुदामा दिली। गौळणीची आर्त ऐकीली। धावूनी जासी सत्वरी॥२॥ मी असलो अन्यायी। परि तुझा म्हणवितो पाही। तरी येवूनी लवलाही। रक्षण करने उचित॥३॥ समर्था घरीचा जरी स्वान। त्यास सर्व देती मान। तैसा तुझा हिनदीन। अपमान हा तुझाच की॥४॥ तुज मज उपेक्षील। तरी कोण जवळ करील। धन असता म्हणतील। माझा माझा म्हणोनिया॥५॥ एकदा बुरूंगवाडीचे मठासी। जमविले सर्व भक्तासी। मेजवानी देवून त्यासी। दिपोत्सव केला बहू॥६॥ आणि सांगितले स्वामींनी। आजपासून एक महिन्यांनी। लोकांची दिवाळी झाली। परी आमची आजची॥७॥ ऐसे म्हणून मठात गेले। दिव्य वस्त्र परिधान केले। आणि भक्तासही दिले। ते येणेप्रमाणे॥८॥ गोविंदबुवास फौजदारचे। कवडे देवूनिया साचे। सांगितले तुम्ही भक्तांचे। फौजदार आहेत॥९॥ तैसेच कोणा भालदारचे। कोणा दिले चोपदाराचे। आणि गेल मिरजचे। भक्तासवे नाटकास॥१०॥ स्वामीस पाहता गोखलेनी। गणपत नाम त्याचे जाणी। नमस्कार करून हात धरूनी। नाटकगृहात नेते झाले॥११॥ भक्तमंडळी दहा वीस। रिझर्व्ह खुर्च्या त्या सर्वास।



मिळूनी सावकाश। नाटक पाहिले स्वामींनी॥१२॥ नाटक पाहूनी मठात। परत आले शिष्यासहीत। मिष्टान्न भोजन सर्वा देत। खुर्चिवर बैसले नंतर॥१३॥ तदनंतर केले बोलणे। आपआपले इच्छेप्रमाणे। मागायचे ते मागुन घेणे। आज तुम्ही आम्हासी॥१४॥ तुम्हा झालो मी प्रसन्न। ऐकुनी ऐसे भक्तगण। आनंदित झाले परिपूर्ण। मागते झाले इच्छे ऐसे॥१५॥ कोणी मागती पुत्रसंतान। कोणी मागती जमीन। कोणी विहीरिस पाणी परिपूर्ण। ऐसे मागते जाहले॥१६॥ सरकारी वाद कोणी म्हणे। झाला पाहीजे आमचे बाजूने। मुलगी चांगली जावयाने। नांदवावी म्हणती कोणी॥१७॥ ऐसे मागती सर्वजण। परी गोविंदबुवा महादूमाळयान। आणि हरीबाई म्हणती हात जोडून। आम्हा हवे चरण तुमचे॥१८॥ त्याशिवाय आम्हास। दुसरे काही नकोस। परी काही मागावेस। वारंवार बोले स्वामीजी॥१९॥ परी ते निस्सीम भक्त। काही ना मागत। तेव्हा महाराज म्हणत। हे घ्या हाडे कातडी ॥२०॥ ऐसे प्रकार बोलणे होऊन। निद्रीस्त झाले सर्वजण। निशा संपली आनंदान। दुसरा दिवस उजाडला॥२१॥ आश्विन शुध्द व्दितियेस। शके अठरासे तिसास। महाराज म्हणती भक्तगणास। तेची आता ऐकावे॥२२॥ आज आम्ही जाणार। फिरावयासी साचार। शिष्य म्हणती त्यावर। कोठे जाणार आपण॥२३॥ परत येणार किंवा नाही। हेची आम्हा सांगा पाही। आल्यास ओळखता येणार नाही। अज्ञानी मेंढरे आम्ही जण॥२४॥ कोठे जाणार निश्चित। आजच सांगता नाही येत। येणार आहो परत। अंगरखा दुसरा घालून॥२५॥ जेथे तुम्ही असाल। तेथून ओळखून काढील।

Scanned by TapScanner

त्यात चूक ना घडेल। धनगराप्रमाणे।।२६।। मेंढरे चुकून जाईल। किंवा दुसऱ्यात मिळतील। तरी धनगर ओळखेल। तैसेची ओळखू तुम्हासी।।२७।। आपण केव्हा जाणार आहे। तरी सध्याच जावू नये। ऐसी आमची इच्छा आहे। ऐकावी तेवढी स्वामीजी।।२८।। अरे मला जावे लागणार। आजच सायंकाळी जाणार। ऐकूनी देह ठेवणार। ऐसे भक्तास वाटले।।२९।। रडण्याचा गोंधळ घातला। तेव्हा स्वामी म्हणती तयाला। अरे रडू नका तुम्हाला। मोठी अद्दल घडणार।।३०।। कागद एक द्यावा मला। भक्तांनी कागद दिला। महाराज लागले बोलायला। मी जाणार फिरण्यास।।३१।। माझा देह येथे पडणार। तेव्हा येवून फौजदार। तुम्हा त्रास देणार। कारण याचे ऐसे पैं।।३२।। साधु आहे बेवारस। तुम्ही पाजिले तया विष। किं खुन करून त्यास। मारिले तुम्ही लोकांनी।।३३।। ऐसे म्हणतील फौजदार। आणि तिच अडचण पडणार। म्हणून सावध असावे फार। तुम्ही सर्व शिष्यगण।।३४।। या मठातील सर्व वस्तूस। या कागदावर लिहून द्यावेस। आणि मठाचे मालकास। ठरवावे कोण तो।।३५।। तुम्ही माझे आप्त भक्त। म्हणून तुमचा हक्क पोहचत। मी तुम्हा अर्पित। आहे सर्व शिष्यगण।।३६।। ही घ्या माझी सही। स्वदस्तुराची सही। ऐसे म्हणूनी पाही। टाकीला कागद भक्तांपुढे।।३७।। कागद पहाती भक्त। त्यावरी ऐसे दिसता "ब्रम्हानंद केशवानंद बाळ ब्रम्हचारी दस्तुरखुद"।। न घेता टाक शाई। आपोआप झाली सही। पाहूनी ऐसे नवलही। वाटले सर्व भक्तास।।३९।। कागद कोणाचे नावाचा। आहे लिहून द्यावयाचा। आपण सांगावे स्ववाचा। बोले महादू हरीबाई।।४०।। आम्ही ज्यांचे नाव सांगणार।



त्याचेच नावाचा लिहीणार। आहात काय साचार। मग सांगतो लिहावे।।४१।। मुलगी पार्वतीबाई नामे। निगव्यातील पाटलीन बाईने। अर्पण केली आम्हा कारणे। तिच्या नावे लिहावा।।४२।। शिष्य कृष्णा खोचीकर। ठेवावा पालन करणार। ऐसे लिहून तयार। कागद तो करावा।।४३।। स्वामींचे बोल ऐकून। महादू व हरीबाई जाण। विचार करिती मिळोन। आता काय करावे।।४४।। मुलगा व कृष्णा खोचीवर। आहे परगावचे राहणार। ते मठ विकून जाणार। कदाचित आपले गावास।।४५।। मग ऐसा विचार केला। मठ करावा नावाला। हरीबाईचे आता चला। महाराजास विचारू।।४६।। स्वामीजवळ दोघे आले। आपला विचार सांगते झाले। महाराज रागवून बोलले। आशाखोर तुम्ही ।।४७।। माझी आज्ञा पाळण्याला। जर तुम्ही तयार नसला। तर वाटेल ते करण्याला। मुखत्यार आहात।।४८।। ऐसे बोलणे ऐकून। महादू व हरीबाई न। कागद लिहीला फौजदाराकडून। हरीबाईचे नावाचा।।४९।। नंतर ब्रम्हानंद स्वामींनी। सर्व भक्तास पाहिले नयनी। मग आपले खोलीत जावूनी। योगासनावरी बैसिले।।५०।। घेतली समाधी लावून। केला प्राण प्रयाण। भक्त येता घेण्या दर्शन। महाराज हालचाल करेना।।५१।। ऐसे दृष्टीस पडता क्षणी। महादू हरीबाई बोलले जाणी। महाराज बोलल्या प्रमाणे। फिरावयास गेले आता।।५२।। ऐसी बातमी ऐकून। गेले दुःख सागरी बुडोन। आकांत केला रडून। सर्व शिष्य मंडळींनी।।५३।। स्वामींनी देह ठेविल्यावर। दुसरे दिवशी आला फौजदार। पंचनामा केला तयार। सकाळी पुढील ऐसा।।५४।। महाराजाचे शरीराते। रोग नाही वा शस्त्राते। मारीले ऐसे ना दिसते। म्हणून संशयी

Scanned by TapScanner

येतो काहीसा॥५५॥ गावचे लोकांनी जाणावा। विषप्रयोग केला असावा। म्हणूनी हा देह न्यावा। तासगावचे डॉक्टरकडे॥५६॥ पोट चिरूनी तपास। केला पाहीजे खास। जाणूनी फौजदाराचे विचारास भक्त रडू लागले॥५७॥ हरीबाई म्हणाली रडतरडत। देव समजूनी पूजा करित। आलो आम्ही आजपर्यंत। परमेश्वरा भगवंता॥५८॥ आणि आता ह्या लोकांनी। पोट फोडावे आपलेनी। ते पहावे आम्ही डोळचांनी। हे बरे आहे काय?॥५९॥ तू सत्याचा देव असूनी। आजवरी चमत्कार दाविले करूणी। पाहिले ते लोकांनी। अनुभव आम्हा तयाचा॥६०॥ आणि आता का बोलेणासी। ऐसा थंड का बैसलासी। ऐसे म्हणूनी रडण्यासी। हरीबाई लागली॥६१॥ इतक्यात चंद्राबाईचे अंगात। आवेश येवूनी ती म्हणत। कोणता शहाणा पंचनामा करित। त्याला इकडे ये म्हणावे॥६२॥ भक्तांनी महाराजास। काय घातले विष। डोळे आहेत का पहाण्यास। की अंध झालासी॥६३॥ प्लेगाचा गोळा येवून। देह ठेविला स्वामीन। पहावे काखेलागुन। फौजदार पाटील पहाती॥६४॥ तो तयासी गोळा दिसला। प्लेगाने महाराजासी मृत्यू आला। ऐसा पंचनामा तयार केला। फौजदार गेला निघून॥६५॥ हरीबाई व महादू माळी। देहास म्हणू लागली। देव असूनी तू माऊली। गोळा कैसा प्लेगाचा॥६६॥ हे बरे झाले नाही। कल्लीतील माणसे म्हणतील पाही। देव समजून पुजाही। करीत होते भक्त लोक॥६७॥ त्या ब्रम्हानंद महाराजाला। प्लेगाचा येवून गोळा। कालवश होता झाला। ऐसे निंदा करीतील॥६८॥ ऐसे म्हणोनी श्रवणोदकांनी। स्नान करण्या भक्तांनी। कपडे काढीले



अंगावरूनी। स्नानास केली सुरुवात॥६९॥ पाहत असता काखेला। तेथे गोळा नाही दिसला। आश्चर्य झाले सर्वाला। कैसा अदृश्य झाला तो॥७०॥ ऐसा परी भक्तांनी । तैसाची हजारो लोकांनी । अनुभव घेतला जाणी। साक्षात्कारी पुरुषाचा॥७१॥ भक्तांनी लावूनी चंदन। बेल फुले वाहून। महाराजांची पुजा करून। देह भूमित ठेविला॥७२॥ स्वामी देह ठेवण्याचे अगोदर। तिर्थास गेला मालवणकर। करूनी क्षेत्र रामेश्वर। बुरुंगवाडीस आला परतोनी॥७३॥ येताक्षणी कळते त्याला। की स्वामींनी देह ठेविला। ऐकूनी रडू लागला। पूर लोटला अश्रूंचा॥७४॥ न घेता फराळपाणी। निजला दु:खीत अंत:करणी। मध्यरात्री महाराजांनी। हात धरूनी जागविले॥७५॥ आणि केली विचारणा। यात्रा आनंदात झाली ना। उत्तर देती तयांना। आनंदात झाली की॥७६॥ स्वामी बोले तयास। पाहीजे ते मागावेस। मालवणकर विचारी चित्तास। काय आता मागावे॥७७॥ प्रथमताच स्वामीना। दिली दत्त भेटी करून। आता हे वैराग्यपूर्ण। शेवटच जावे हीच इच्छा॥७८॥ आणि भक्तीची व्हावी पूर्तता। हेची मागावे तत्वता। करूनी विचार झाला मागता। स्वामींनी दिला आशिर्वाद॥७९॥ आणि तत्काळ अदृष्य झाले। मालवणकरास वाटले। महाराज जावूनी झोपले। मठात आपले जागेवर॥८०॥ मूर्ती पाहून समक्ष। विचार आला तये मनात। मंडळींनी फसविले आपणास। देह ठेविला म्हणोनिया॥८१॥ निजला जावूनी शय्येवरी। सकाळी उठला लवकरी। भक्तासी बोलला साचारी। लबाडी केली आमचेसी॥८२॥ रात्री मज दिले दर्शन। निजले खोलीत जावून। तुम्ही लबाड सर्वजण।

Scanned by TapScanner

आश्चर्य करी मंडळी॥८३॥ आम्ही हजारो भक्त मंडळी जमूनी। स्वामीस समाधी दिली। ऐसे असूनी भेट दिली। मालवणकर बुवास॥८४॥ अहो ऐसे नका बोला। चला खोलीत पहायला। होवूनी तयाचे संगतीला। खोलीत आले पहाण्यास॥८५॥ तो तेथे महाराज नाही। कंठ दाटून आली पाही। रडू लागले सर्वही। भक्तीप्रेमे सर्वजण॥८६॥ महाराज म्हणजे साक्षात। प्रगटलेले होय दत्त। तिळमात्र शंका यात। उरली नसे आता की॥८७॥ म्हणोनी मज दर्शन। अदृश्य झाले देवून। माझी इच्छा पूरवून कृतार्थ। केले मजलागी॥८८॥ ऐसे बोलीला भक्ती प्रेमांनी। मालवणकर शिष्य जाणी। स्वामीवरी निष्ठा ठेवूनी। दर्शन घ्यावे श्रोतेगण। पुढे मालवणकर राहीले कुंडलचे डोंगरावर। चंद्राबाईस साचार। वृत्तांत कथिला दृष्टांताचा॥८९॥ वृत्तांत हा ऐकूण। तममळ लागली तिजकारण। म्हणे मज का न दिले दर्शन। मी तुझे काय केले॥९०॥ आठ पंधरा दिवस भले। दुःखात तिचे निघून गेले। मध्यरात्री दर्शन दिले। ऐके दिनी तियेस॥९१॥ आणि सांगितले तीस। जावे बुरुंगवाडी मठास। माझी सेवा करण्यास। लगेच अदृश्य झाले॥९२॥ दुसरे दिनी मालवणकराला। रात्रीचा दृष्टांत सांगितला। आली बुरुंगवाडी मठाला। सेवा करण्या स्वामीची॥९३॥ इति श्री शामसुंदर रचित। श्री ब्रम्हानंद चरित्र सार ग्रंथ। आल्हाद देवो भक्ताप्रत। ब्रम्हानंद कृपेने॥९४॥

॥इति श्री ब्रम्हानंद चरित्र सार एकोनविशोध्याय समाप्त॥



## अध्याय विसावा

श्री गणेशायनमः॥ जय जय श्री कमलाधिशा। क्षिरसागरा परेशा। शेषशयना। पंकजाक्षा। भक्तांचा सखा तू ऐक॥१॥ कुर्मदास चरणखंडीत। त्याने धरिला भेटीचा हेत। त्यासाठी पायी चालत। पंढरीहून गेला लहुलाशी॥२॥ तुझे चरण मिराबाईने। धरिले म्हणूनी पित्याने। विषप्याला दिला तिजकारणे। अमृत जैसा केला तू॥३॥ कुंभाराचे आव्यात। मांजरीची पिले रक्षीत। ऐसा तू पंढरीनाथ। भक्तवत्सल तारक॥४॥ तैसी कृपा मजवरी। करण्या धाव रे मुरारी। शिर ठेविले चरणावरी। विन्मुख आता लावू नको॥५॥ सद्‌गुरू आज्ञा घेवून। नामदेवा गेला होता पंढरीलागुन। ती यात्रा आटोपून। आला तर बुरुंगवाडीस॥६॥ आल्याक्षणी महाराजाची। हकीकत देह ठेवल्याची। समजली तयासाची। दुःख करी अतिशय॥७॥ दुःखाने रडू लागला। वेडया ऐसे करू लागला। कोठेही राहू लागला। खाण्या पिण्याची शुध्द नाही॥८॥ फिरता फिरता साचार। आला तासगावचे माळावर। तेथे आहे दत्त मंदिर। जावूनी त्यात राहीले॥९॥ अन्नासी ना शिवत। केवळ पाणी प्राशन करीत। असो ही हकीकत। लोकास कळली तयाची॥१०॥ ते तेथे खाऊ घातले जबरिन। आणि बोलीले तुम्ही सुज्ञ। सत्पुरूष दुःख का करी॥११॥ सद्‌गुरू आहे अविनाश। ते मरणार कधी नाहीस। अज्ञानी आम्ही तुम्हास। कैसे हे सांगावे॥१२॥ कां की तुम्ही जाणकार। तुमचे जवळी निरंतर। सद्‌गुरू असून राहणार। भेटती

Scanned by TapScanner

तुम्हा सर्वदा।।१३।। ऐसे बोलोनिया पाही। गवंड्याने नेले स्वगृही। त्याच रात्री माध्यान्ही। साक्षात्कार दिला स्वामींनी।।१४।। आणि सांगितले नामदेवासी। जावूनी तू मठासी। करूनी आरती पुजा चर्चेशी। तेथेच वास्तव्य करावे।।१५।। नामदेव निघाला तेथून। येण्यासी मठालागुन। अवचि रस्ता चुकोन। मिरजचे सडकेला लागला।।१६।। रस्त्यात त्याला भेटला। आबा गवंडी भक्त भला। नामदेवाचे चेहऱ्याला। पाहू लागला निरखून।।१७।। तया नामदेव ना दिसले। प्रत्यक्ष सद्गुरू भासले। साष्टांग नमस्कारा घातले। आणि नेले घरासी।।१८।। घराजवळी आले असता। सद्गुरूस झाले पाहता। तयी सद्गुरू न दिसता। नामदेव बुवा दिसतसे।।१९।। तयी आबा म्हणू लागला। नामदेवा तुम्ही केव्हा आला। नामदेवी देती उत्तर त्याला। तुच आणिले परतुनी।।२०।। आणि ऐसे का बोलतोस। तेव्हा आबा म्हणती त्यास। माझा तू गुरूबंधू आहेस। शपथ घेवून सांगतो।।२१।। तुम्ही मला आतापर्यंत। सद्गुरू ब्रम्हानंद भासत। ऐसे बोलोनी स्फुंदत। रडू लागला गवंडी तो।।२२।। नामदेव बुवांनी भले। समाधान त्याचे केले। सद्गुरूंनी मज दर्शन दिले। रात्रीसी आणि बोलीले पैं।।२३।। तू मठात जावेस। पुजा अर्चा करावीसं। सन्मार्गी लावी जनास। उगीच रडत बैसू नको।।२४।। तू आहेस शहाणा। हताश न होणारा। ऐसे उपदेश मज कारणा। केला स्वामींनी रात्रीसी।।२५।। स्वामीची आहे अगाध लिला। मग आबा गवंडी बोलला। तुम्ही मिरजेस कशाला। चालला होता सांगा मज।।२६।। काय मी मिरजला। होतो काय चालला। तर मग रस्त्याला। चुकले ऐसे



वाटते।।२७।। ऐसे प्रकारे बोलोनी। भोजन वगैरे आटोपोनी। मठास आला परतोनी। नामदेव शिष्य स्वामीचा।।२८।। मठास येवूनी राहीले। काही दिवस निघून गेले। चेंडगे म्हाताऱ्यास स्वप्न पडले। समाधी बांधावी म्हणूनिया।।२९।। तैसेची तुकाराम माळ्यास। सांगितले देवूनी दृष्टांतास। दोनशे रुपये नामदेवास। समाधी करिता द्यावेस।।३०।। गवंड्यास बोलविले। विवरातून मूर्तीस काढीले। आणि समाधीस बांधिले। उत्तम प्रकारे व्यवस्थित।।३१।। स्वामी मूर्ती विवरात। उचलून नेली ठेवण्यप्रत। परी ती मावेना त्यात। देह वाढविला स्वामींनी।।३२।। पुन्हा विवर वाढवून। मूर्ती पाहिली ठेवून। परी ती जाहली लहान। आश्चर्य झाले सकलासी।।३३।। भक्तमंडळी जोडूनी हस्त। सद्गुरू नाथा विनवित। आणि एक नारळ वाढवित। तयी घडला चमत्कार।।३४।। मूर्ती होवूनी बरोबर। विवरात बैसिली साचार। सद्गुरूच्या लिला थोर। समजणे नाही सामान्यासी।।३५।। समाधी घेतल्यापासूनी। बरोबर अकरा महिन्यांनी। स्वामीस बाहेर काढूनी। समाधी बांधिली भक्तांनी।।३६।। समाधी काम होईपर्यंत। ब्रम्हानंदांचा देह बाहेर असत। जन पाहती तयप्रत। फरक काही दिसेना।।३७।। सद्गुरूच्या स्वरुपात। कपडे आणि हारात। नखे आणि केसादिकांत। फरक न दिसे दृष्टीसी।।३८।। समाधी घेता जैसे असत। तैसेची आता दिसत। प्रफुल्लीत आणि टवटवीत। ऐसे सामर्थ्य सद्गुरूचे।।३९।। असो समाधी काम पूर्ण करून। अन्न दानादिक संतर्पण। पुजा आरती केली जान। शास्त्राप्रमाणे यथास्थित।।४०।। सद्गुरू मूर्ती सुंदर पूर्ण। ठेविली विवरात नेवून। काळ्या दगडांनी बांधून।

Scanned by TapScanner

समाधी काम पूर्ण केले।।४१।। समाधीस्त झाल्यावर सद्गुरू। लोक नवस लागले करू। पुत्र व्हावा म्हणती येरू। विद्या प्राप्त व्हावी जी।।४२।। शत्रू मित्र व्हावी। मनाची तळमळ जावी। धनरासी प्राप्ती व्हावी। ऐसे नानातऱ्हेचे।।४३।। श्रध्दा भक्ती ज्यांची जैसी। समाधी पावू लागली तैसी। परी गणपतराव कुळकर्ण्यासी। विश्वास तिचा पटेना।।४४।। समाधीवर विश्वास न ठेवून। इतर साधूचे धरी चरण। नामदेव म्हणती तयालागुन। सद्गुरू आपुले परमात्मा।।४५।। जरी देह ठेविला तयांनी। तरी चैतन्य कायम असूनी। लोकांचे नवसास पावूनी। इच्छा तयांच्या पुरविती।।४६।। ऐसी तयांची किर्ती। दुरवर पसरली असती। म्हणूनी जन दर्शना येती। आणि तू भटकतो दुसरीकडे।।४७।। तरी ऐसे न करून। सद्गुरूवरी ठेवि विश्वास जाण। समाधी तुज पावून। दर्शन देईल सद्गुरू।।४८।। तरी तू सावध व्हावे। सद्गुरू सेवेस लागावे। ऐसे ऐकुनी बरवे। सेवेस लागला कुळकर्णी।।४९।। समाधी पुढे महाराजांच्या। सप्ताह सुरू केला चरित्राचा। तो पूर्ण होता साचा। दर्शन दिले गणपतरावा।।५०।। नामदेव आणि कुळकर्णी। दोघे झोपले असता जाणी। हातास झटका मारूनी। उठविते झाले ब्रम्हानंद।।५१।। जागे होवूनी गणपतराव। पाहू लागले अभिनव। पुढे पाहूनी सद्गुरूसव। थरथर कापू लागला।।५२।। दर्शन देवून सद्गुरूनाथ। क्षणातची अद्दश्य होत। नामदेवासी उठविता। गणपतराव कुळकर्णी।।५३।। नामदेव म्हणती अरे गणपत। ऐसा तू घाबरत। सांगता झाला हकीकत। सद्गुरू दर्शनाची श्रोते हो।।५४।। तयी तो नामदेव बोलीला। सद्गुरूची अगाध लिला। दर्शनाचा लाभ झाला। भाग्य



समज तुझे हे।।५५।। दुसऱ्यासी शरण न जाता। सद्गुरू सेवा करावी आता। तेव्हापासूनी गणपत तत्वता। सेवा करिता जाहला।।५६।। पुढे गणपत फिरत फिरत। आला कोल्हापुराप्रत। विष्णू जोशाचे गृहाप्रत। पोहचला जावूनी।।५७।। विष्णू विनायक जोशाचा। धंदा होता वकीलीचा। महीबू साहेब नावाचा। सत्पुरूष होता त्याचे घरी।।५८।। तयाचे अंगी दस्तगीर। अवलीयाचा होत संचार। गणपतरावांनी साचार। प्रश्न केला तयासी।।५९।। ब्रम्हानंद योगीराज। पुन्हा येणार आहे काय। महीबू म्हणती होय। निश्चित येणार आहेत।।६०।। तयांनी केली बालक्रीडा। तयांचा अधिकार आहे बडा। परमेश्वर अवतार तेवढा। जाणावा प्रत्यक्ष।।६१।। त्यांचे मनी येईल। तेव्हा अवतार होईल। काढूनी ऐसे बोल। आणखी चमत्कार देत असे।।६२।। म्हणूनी गणपतराव कुळकर्णी। कोल्हापुरास राहुनी। सेवा करी निष्ठेकरूनी। महीबू साहेबांची।।६३।। पुढे एकदा नामदेवाची। आणि गणपत कुळकर्ण्याची। गाठ पडली असता साची। नामदेव विचारी तयास।।६४।। अरे तुझे कैसे चालीले। तेव्हा गणपतराव बोलीले। मी जातो कोल्हापुराले। महीबू साहेबाजवळी पैं।।६५।। तयांचे अंगी दस्तगीर। महाराजांचा होतो संचार। दत्ताचे स्नेही दस्तगीर। म्हणूनी तेथे जातो मी।।६६।। जोशी वकीलाचे घरी पाहे। दत्त उपासना चालू आहे। भजन आरती होत आहे। दररोज तेथे पैं।।६७।। ऐकूनी ऐसे वचन। नामदेव बोलीला प्रेमेकरून। तुज दर्शन दिले असून। पुन्हा भटकला दुसरीकडे।।६८।। आता तरी ऐसे न करिता। सद्गुरू सेवेस लाग आता। अरे ते अवतार तत्वता। घेणार आहे लवकरी।।६९।।

Scanned by TapScanner

नामदेव बुवा जे बोलीले। ते महीबू साहेबास सांगितले। महीबू साहेब म्हणाले। उनकी लीला अगाध है।।७०।। वो है दत्त अवतार। उनकी सेवा निरंतर। करणा अच्छा साचार। उनकी सेवा तुम करो।।७१।। वकील साहेबांनी हे ऐकिले। आणि ते बोरगावासी आले। नामदेवास विचारीते झाले। ब्रम्हानंदांची हकिकत।।७२।। नामदेव सांगती तयास। ब्रम्हानंद स्वामी बोरगावास। राहीले असती बारा वर्ष। तपश्चर्या येथे केली पै।।७३।। पुढे कुंडलचे डोंगरावर। कोठडी करून तयार। राहीले तेथून नंतर। बुरुंगवाडीस देह ठेविला।।७४।। ऐसे ऐकता वकीलांनी। काही अनुभव घेवूनी। कुंडलचे कोठडीलागुनी। आणि कुंडलच्या डब्यात।।७५।। फोटोची स्थापना करूनी। उत्सव सुरू केला जाणी। दोन्ही स्थळी वकीलांनी। स्वगृही केले तैसेची।।७६।। फोटो स्थापना स्वगृही करिती। दोन वेळा पुजा आरती। नित्य नियमे करिती। भक्ती जडली हृदयात।।७७।। डोंगरावरील उत्सवाकरिता। तेच पुढारी आहे आता। ऐश्वर्य विद्येत गर्क न होता। सेवा करी भक्तीने।।७८।। ऐकदा विचार केला नामदेवांनी। स्थापिलेल्या वकीलांनी फोटोचे दर्शन कुंडलवरूनी घेवून यावे आपण।।७९।। जाणार तो दुसरे दिवशी। ब्रम्हानंद महाराजांनी तयासी। दृष्टांत देवूनी सांगितलेसी। जावे घरी वकीलाचे।।८०।। तू वकीलाचे घर। समजावे कुंडलचा डोंगर। तेथेच माझे दर्शन साचार। घ्यावे वास्तव्य तेथे माझे।।८१।। पाहूनी ऐशा दृष्टांतासी। आनंद झाला नामदेवासी। आपलेसे केले ब्रम्हानंदासी। वकीलांनी म्हणूनिया।।८२।। धन्य धन्य पुत्र अधिकारी। जयाने परमात्मा ठेविला घरी। ऐशा आनंदा



माझारी। कोल्हापुरासी पातला।।८३।। फोटोचे दर्शन घेवून। भेटले वकीलास जावून। दोघासी आनंद पूर्ण। वर्णन त्याचे करवेना।।८४।। वकीलाने विचारीले। ब्रम्हानंद सगुण अवतरले। तेव्हा बालक्रिडेसी केले। चमत्कार त्यातील मज सांगा।।८५।। तेव्हा नामदेव बोलीले। हजारो चमत्कार मज घडीले। तयाचे जर का वर्णन केले। तर ग्रंथ होईल मोठा पैं।।८६।। दररोजचा धरीला एक। तरी वर्षाचे तिनसेसाठ। मग समाधीपर्यंत देख। किती चमत्कार होतील।।८७।। इतके सांगणे अशक्य। वकीलास वाटले कौतुक। तरी सांगावे दोन एक। नामदेव सांगू लागला।।८८।। एकदा विचारले तयाने। चित्त समाधानाचे फल कोणते। चित्त समाधान कशाने होते। ते सांगावे मजलागी।।८९।। तेव्हा तू कुंडलला जावे। ऐक तोळा अफू आणावे। त्यातची उत्तर जाणावे। ऐसे महाराज बोलीले।।९०।। ऐसे बोल ऐकूनी। शंका आली माझे मनी। कुठे काय चुकलो मी। मज काही कळेना।।९१।। अफूची गरज नसता भली । ती आणावया सांगितली। तर रागावली गुरूमाऊली। ऐसे मज वाटले।।९२।। की लहरीत प्रश्न केला। ऐशा शंका मनाला। आल्या असता स्वामीला। कळला मनीचा विचार।।९३।। आणि बोलीले देखा। अफू घेवून यावे का। अरे चंद्र कोठे तापतो का। तो शांतच राहणार।।९४।। ऐकूनी ऐसे वचन। चित्त झाले समाधान। आणि आनंद पावून। संतोष मज वाटला।।९५।। मग गावात जावून। एक तोळा अफू आणून। दिली महाराजाजवळ जाण। हाती घेतली स्वामींनी।।९६।। बोले तुकारामाची गाथा आण। दिली गाथा नेवून। आणि समोर येवून। बैसिलो स्वामीच्या।।९७।।

Scanned by TapScanner

"चित्त समाधाने। तरी विष वाटे सोने"। हा अभंग जाणें। काढण्यास सांतिला।।९८।। त्याचा अर्थ सांगण्यालागुन। एका हाती अफू घेवून। विचारीले मजलागुन। हा पदार्थ कोणता।।९९।। मी म्हणालो अफू आहे। महाराज बोलीले अफू नोहे। हे तर सोने आहे। आणि फेकले खाली तिला।।१००।। त्याबरोबर सोने झाले। पुन्हा महाराज बोलीले। सोने अफू देखीले। मी बोललो सोने होय।।१०१।। कसोटी पहा लावून। गावात गेलो घेवून। कसोटी लाविली परिपूर्ण। शंभर नंबरी सोने दिसे।।१०२।। आलो डोंगरी परतून। महाराज बोलीले मजलागुन। अरे अफूची होते की सोन। मी बोललो सोने होते।।१०३।। अरे चित्त समाधान झाल्यास। वाटेल त्या पदार्थास। वाटेल त्या स्वरुपास। देता येते नामदेवा।।१०४।। हा प्रश्न समजला। आता दुसरा राहीला। चित्त समाधान कशाने मला। समजावूनी सांगावे।।१०५।। "झाले समाधान तुमचे देखील चरण"। हा अभंग तुकारामाचा। समजावून घ्यावा साचा। त्यातची प्रश्नाचा। सार तुजा आहे की।।१०६।। अरे परमात्मा स्वरुपाची। प्राप्ती झाल्यावाचून साची। समाधान होणे नव्हेची। ऐसे तू समजावे।।१०७।। आणि समाधान झाल्यावाचून। परमेश्वर पदाची प्राप्ती जाण। होत नाही हे विधान। शिष्य आहे शिषोत्तमा।।१०८।। ऐसे ऐकून उत्तर। वकील साहेब कोल्हापुरकर। त्यासी आनंद झाला फार। त्याचे वर्णन अशक्य पैं।।१०९।। ।।इति श्री शामसुंदर रचित। ब्रम्हानंद चरित्र ग्रंथ। आता आला कळसाप्रत। कळसाध्याय पुढे असे।।११०।।

।।इति श्री ब्रम्हानंद चरित्र सार ग्रंथ विशोध्याय समाप्त।।



## अध्याय एकविसावा

श्री गणेशायनम:। श्री विघ्नेशा विनायका। वक्रतुंडा गणनायका। लंबोदरा दु:खहारका। मंगलधामा गजानना।।१।। दुर्वा सेंदूर शमिपत्र। फुले आघाडी बेलपत्र। केवडा मोदक लाडू नैवद्यार्थ। ऐसे पुजिता बिजाक्षर मंत्रे।।२।। अष्टसिध्दी त्रयोदशी। निरंतर ध्यानी ध्याता तुजसी। विघ्ने पापे समुळहरिसी। विघ्नांतका नाम शोभतसे।।३।। श्यामसुंदर शरणपदा। तुझ्याकी हे आनंदकंदा। हरोनिया दु:गापदा। संकटातूनी तारावे।।४।। जय जय श्री रुक्मिणीवल्लभा। जगदाधारा कमलनाथा। सर्वाठायी तुझी आभा। मग मज कां टाकीले।।५।। केशवस्वामीचे किर्तनाप्रती। सुंठ म्हणूनी बचनाग देती। श्रोतेगण भक्षण करिती। प्रसाद तुझा यदुराया।।६।। विष त्या बचनागाचे तुवाची शोषिले साचे। अरिष्ट टाळूनी केशव स्वामींचे। ब्रिद आपुले राखिले।।७।। काळी बिळी झाली मूर्त। केशव स्वामी डोळा पाहत। स्तविता झाली पूर्ववत। ऐसा तू विघ्नांतक।।८।। "सकाम अथवा निष्काम। वाचे वदे जो माझे नाम। तोची सखा परम। आप्त माझा। ऐसे भगवंता तू सांगसी। चवदावे अध्यायी ब्राम्हणासी। भक्तविजयी ऋषीकेशी। का नं ऐकसी मम बोला।।९।। शिष्यं ब्रम्हनाळचे महाराजाचा। तैसेची एक ब्रम्हानंद स्वामीचा। प्रवास करूनी रेल्वेचा। भिलवडीस उतरले।।१०।। स्टेशनावर मुक्काम केला। बोलला बोलता प्रश्न निघाला। ब्रम्हनाळकरांचा शिष्य म्हणाला। तुमचे गुरूचे सामर्थ्य काय।।११।। शिष्य बोले

Scanned by TapScanner

ब्रम्हानंदाचा। तुमचे गुरूचे सामर्थ्याचा। प्रभाव सांगा कोणता। मग मी सांगतो॥१२॥ समाधी आमचे महाराजाची। दोनप्रहरी नित्याची डुलते। तासभर साची। वार्षिक उत्सवाचे दिवशी पै॥१३॥ जोपर्यंत सगुण अवतार। तोपर्यंत सामर्थ्य चमत्कार। तुमचे गुरूंनी केले साचार। ऐसे आम्ही ऐकीले॥१४॥ परी आताचे चमत्कारास । दाखवावे तुम्ही आम्हास। ऐसे ऐकता त्या शिष्यास। ब्रम्हानंदाचा शिष्य बोलीला॥१५॥ अहो समाधी तुमचे गुरूची। वार्षिक रितीने डुलते साची। आमचे गुरू सद्याची। दर्शन देते प्रत्यक्ष॥१६॥ येत असता पंढरीहून। रेल्वेत दिले प्रत्यक्ष दर्शन। बोरगावचे ब्राम्हणालागुन। प्रसाद दिला केळीचा॥१७॥ तेसेची पंढरीवरून येत असता। चांभारासी झाले दर्शन देता। नमस्कार करूनी झाला विचारता। आपण कोठे निघाले पैं॥१८॥ महाराज देती उत्तर त्याला। काही काम आहे मला। म्हणूनी जातो पुण्याला। तू जावे बुरुंगवाडीस॥१९॥ ऐसे तयास सांगून। गेले तेथोनी निघुन। मग चांभार भिलवडीस उतरून। बुरुंगवाडीस गेला दर्शना॥२०॥ नमस्कार करून समाधीला। नामदेव बुवास तो भेटला। वृत्तांत त्यास कथिला। जो का घडला गाडीत॥२१॥ हे विचारा त्या चांभारास। किंवा त्या ब्राम्हणास। ऐसे ऐकता ब्रम्हानंदाचे शिष्यास। ब्रम्हनाळचा शिष्य बोलीला॥२२॥ अहो हे अनुभविले दोघांनी। घरी आमचे गुरुचा अनुभव जाणी। पाहीला सर्व लोकांनी। जे का येती उत्सवासी॥२३॥ अहो त्यास काय नवल। आमचेही गुरूची समाधी हलेल। ऐसा वाद करूनी प्रात:काळ। होता गेला निघुनी पै॥२४॥ पुढे काही काळ लोटला। ब्रम्हानंदाचा उत्सव सुरू



झाला। समाधी लागली डुलायला। उत्सवाचे दिवशी पैं॥२५॥ समाधी डुलली तासभर। परी वृंदावन हलले वर्षभर। कोणी लिंबू ठेवूनी साचार। पाहू लागले तयावरी॥२६॥ कोणी अहंकाराचे वारूवर। बसुनी करा उपचार। बंद करण्या साचार। परी ते बंद होईना॥२७॥ ऐसे उपाय बहुत झाले। परी ते अधिकची हलू लागले। हजारो लोक जमले। चमत्कार हा बघण्यास॥२८॥ हजारो लोक येत चमत्कार। पाहूनी जात। तेच दुसऱ्यासी सांगत। म्हणून गर्दी विशेष॥२९॥ भिलवडीचे स्टेशन मास्तरांनी। दिल्या तारा पाठवूनी। त्यामुळे लांबलांबूनी लोक येती बघण्यास॥३०॥ हुबळी, बेळगाव, मिरज, कोल्हापूर, सांगली, कुंडल, बोरगाव, पंढरपूर। कऱ्हाड, सातारा, नागपूर, पुणे, दौंड। कारंजा॥३१॥ या आणि इतर गावचे। लोक येती दूरदूरचे। चमत्कार पाहूनी साचे। जाती स्तुती करीत॥३२॥ बारा महिन्यांनी वृंदावन। हलण्याचे थांबले जाण। आपले भक्ताचे वचन। खोटे कोठूनी करणार॥३३॥ आता श्रोते सावधान। हा कळसाध्याय ऐका एकाग्रमन। सर्व ग्रंथाचे सार पूर्ण। इथे अध्यायी वर्णियले॥३४॥ धन्य तुम्ही श्रोतेगण। ऐकता चरित्र निष्ठेकरून। तेणे भवसागर तरूण। जाल ब्रम्हानंद कृपेने॥३५॥ ब्रम्हानंद चरित्र निरा अमृताहून गोड मधुर। प्राशिता भव दुस्तर। विघ्ने, दु:खे हरताती॥३६॥ प्रथमाध्यायी मंगलाचरण। देव गुरूसी करूनी वंदन। मग आरंभिले कथन। ब्रम्हानंदाने पूर्वचरित्र॥३७॥ ब्रम्हानंद बालमूर्ती। भटकत आले काशी तिर्थी। तेथे विद्यानंद स्वामी भेटती। परमार्थ चर्चा दोघात॥३८॥ बुध्दी तेज पाहूनी। म्हणती हरिद्वारा जावूनी। केशवनंदास भेटूनी।

Scanned by TapScanner

दिक्षा घ्यावी तयापासी॥३९॥ काशी क्षेत्री शिव मंदिरात। दगडी नंदी फिरविता। मग व्यास काशिस येत। दर्शन देई सदाशिव॥४०॥ द्वितीयाध्यायी ऐसे कथन। हरिद्वास येवून। गंगेत उडी घेवून। चमत्कार दावी अलौकीक॥४१॥ मग केशवानंद येवूनी बाहेर। बोलवी प्रेमे करून। त्यासी दिक्षा देवून। तिर्थे करण्यास सांगितले॥४२॥ तृतीयाध्यायी कथा पाही। भ्रमण करित नरसिंगपुरा येई। नर्मदिची नथनी घेई। नर्मदित देई टाकून॥४३॥ तेणे पती रागविती। नथनी घेवून ये म्हणती। ना तर देई प्राणाप्रती। तोंड मज दाखवू नको॥४४॥ ऐकुनी पतीचे वचन। नर्मदा धरी सद्‌गुरू चरण। नर्मदिजवळ जावून। उडी घातली सवेग॥४५॥ शोक करिता तिचा पती। नर्मदामाता स्त्रीस बोळविती। दोन नथनी देवून सत्वरगती। वरती तियेस धाडिले। ४६॥ चतुर्थाध्यायी करीत तिर्थ। पायतळी फिरत येत। श्रीक्षेत्र गाणगापुराप्रत। दर्शन देती दत्तात्रय॥४७॥ तेथोनी पातले कोल्हापुरा। श्री लक्ष्मी देई साक्षात्कारा। तेथोनी शिवराळ नगरा। गोरखनाथ भेटले॥४८॥ तदनंतर आले दुधोंडीस। गौरीसाहेब म्हणती स्वामीस। येथे न रहावे आम्हास। कमीपणा येईल पैं॥४९॥ दुधोंडीवरूनी आले बोरगावी। तेथोनी बेहेगावी। मारोती धरी हृदयी। राममंदिरी स्वामीसी॥५०॥ बोरगावी परत आले। कृष्णामायीचे तिरी बैसिले। तपश्चर्येसी आरंभिले। अखंडपणे जाण पां॥५१॥ पाऊस वर्षे मुसळधार। छत्री नेई सोनार। परी स्वामीस न भिजविती निर। पुर न येई तयाजवळी॥५२॥ तुकारामासी चमत्कार दाविला। अभिमान त्याचा हरिला। आशिर्वाद तयासी दिधला। भक्त झाला तेव्हापासूनी॥५३॥



मानेरावाचे शेतात। चोर शिरता अवचित। रक्षण धान्याचे करित। ब्रम्हानंद कृपारासी॥५४॥ पंचमाध्यायी केले कथन। चिटणविसासी दिधले नयन। अन्नासाहेब तयाचा नंदन। भक्त झाला स्वामीचा॥५५॥ चार चाकाचा डबा बनविला। भक्तीभावे स्वामीस अर्पिला। स्वामींनी तयात वास केला। भक्तवत्सल खरोखरी॥५६॥ षष्ठाध्यायी बालकांत। क्रिडा करिती सद्‌गुरूनाथ। आवडीचे पदार्थ खाण्या देत। बालकासी गुरूमाऊली॥५७॥ ढग नसता आकाशी। पाऊस पाडीला बहुवसी। चमत्कार दावूनी नावाडयासी। कुंडलला गेले कुस्ती पहाण्या॥५८॥ कथा आहे सप्तमात। तांदूळ दाविले रेतीत। डबा पोहीला पाण्यात। ऐसे चमत्कार कितीतरी॥५९॥ पत्र्याची नाव तयार केली। मुले, स्वामी औदुंबरा निघाली। नदी दोथडी भरली। खंती नसे तिळभर॥६०॥ नाव चालली भरभर। मुला दाविले चमत्कार। तयांच्या इच्छा पुरविल्या समग्र। मुले मागती ते देती॥६१॥ राजाराम बापूंची परीक्षा घेऊनी। चितेवरील बोलविला अग्नी। आशिर्वाद तया देवूनी। काव्य शक्ती अर्पियली॥६२॥ अष्टमाध्यायी ऐसी कथा। चंद्राबाईस छडीमारिता। जिवंत झाली तत्वता। शिष्या झाली स्वामींची॥६३॥ बोरगावच्या डब्यात असता बसले। हजारो मानसा भोजन दिले। स्तुती गात निघुनी गेले। अन्न फक्त दोघांचे॥६४॥ गुराखी मुलालागनु। कोठडी असता अरुंद लहान। तित दाखविले गोकुळ संपूर्ण। कृष्ण लिला दाखविली॥६५॥ काही मुले दर्शना आले। पंडरपूर तया दाखविले। चांगले कपडे करून दिले। पुण्याचे दुकानी॥६६॥ नवमाध्यायी नामदेवासी। दर्शन दिले रात्री बारासी। जेवू घातले प्रेमेसी।

Scanned by TapScanner

शिष्य झाला स्वामीचा।।६७।। ज्ञान चर्चा केली दोघांनी। अपमृत्यु येती कशाने। ब्रम्हचर्याचे प्रकार सांगूनी। कर्मगती सांगितली।।६८।। दशमाध्यायी तुकारामा। सगुण प्राप्तीचा सांगितला महिमा। संन्यास दिक्षा देवून त्यांना। संन्यास महिमा सांगितला।।६९।। टिळकांचे भाकीत कथिले। प्रारब्धकर्म सांगितले। नामदेवाचे परिक्षेसी घेतले। मंदिरी ऐकटे पाठवून।।७०।। डोंगरावरूनी उडी टाकीता। खाली आला इजा न होता। पक्षी उडती स्वछंदता। ऐसे त्यासी जाहले।।७१।। मालवणकर शिष्यास। दत्त दर्शन करविले त्यास। ऐशा कथांचा समावेश। दशमाध्यायी झाला असे।।७२।। संतभंडारा असता घालीत। टाक्यात पाणी झाले निर्मिता। दोनशे मंडळीचे अन्न असता। पाच हजार माणसे तृप्त होती।।७३।। विरभद्राचे मंडपा लागुनी। पडू न देई कैवल्यदानी। उत्सव संपताक्षणी। मंडप खाली कोसळला।।७४।। माणसास पाहिजे काम। असल्यास तो रिकामा करमेना एक क्षण। उदाहरणाने पटविले।।७५।। ऐशा कथा सुरस। ऐकादशाध्ययाची देख। सद्गुरू लिला अनेक। मती ना मज पामरा।।७६।। द्वादशाध्यायी हरभरे ओले। नामदेवास खाण्या दिले। ऋतू नसता करविले। कौतुक हे समर्थानि।।७७।। झाड असता केळीचे। रामफळ लागले साचे। सद्गुरूचे आवडीचे। सेविले तयांनी प्रेमांनी।।७८।। नामदेवाने कुंभक केला। तो प्राणायामाचे बाहेर गेला। एकेदिवस एक रात्र राहिला। देहभान हरपला।।७९।। सिध्दीचा उपयोग केला। सद्गुरू आले तये स्थला। डोई हस्त ठेविला। देहावरी आला पूर्ववत।।८०।। तिर्थयात्रा चंद्राबाईलागुन। आणली फुकट फिरवून। पंढरपूर, नाशिक।



त्र्यंबकेश्वर जाण। ऐसी तिर्थे आणिक।।८१।। त्रयोदशाध्यायी कथन ऐसे। संकटकाळी गुरूराज कैसे। भक्त कामा पडत असे। प्रत्यक्ष दाखवी नामदेवा।।८२।। दत्ताच्या सेवकास ओळखूनी। तयांचे अनुष्ठानास। फळ दिले प्रत्येकास। तयांचे इच्छेप्रमाणे।।८३।। मुलगा येसू गोंदिलचा। चंद्राबाईने पाळीले साचा। थेंब नसता दुधाचा। अमाप दूध तियेस।।८४।। दत्तोपंत शिष्यासी। जाणुनी तयाचे हेतूसी समाधी देई स्वहस्तेसी। गुरुराज स्वामी ब्रम्हानंद।।८५।। तिन स्थळी ऐका वेळेसी। महाराज देती हाजरीसी। कुंडल, कोल्हापूर, सातान्यासी। आश्चर्य सर्वा वाटले।।८६।। गोकुळ अष्टमीचे दिनी। गाडीस अडथळा करूनी। दर्शन दिले नामदेवालागुनी। व्याधी हरविली रामचंद्राची।।८७।। येथे चतुर्थोध्याय संपला। पंचदशोध्याय सुरू झाला। योगिराज रुळावरी झोपिला। भक्त परिक्षा घेण्यास।।८८।। गाडी जवळ आली। कोपदृष्टी तिकडे केली। गाडी जागेवर थांबली। हलेना मुळी तेथोनी।।८९।। उपाय करी ड्रायव्हर नाना। परी ती मुळी हलेना। शरण आला चरणा। तेव्हा गाडी गेली पुढे।।९०।। मठ बांधिला स्वनजरते। चमत्कार दाविला आबा गवंडयाप्रत। भिंत बांधली मजबूत। परी तिन वेळा पड़ीयली।।९१।। नाते जोडीले भक्तासी। नामदेवा पाठविले पर्यठनासी। चमत्कार करविले बेलवाडीसी। नामदेवाकडून सद्गुरूने।।९२।। सोळाव्यामाजी कथा आण। नामदेव निघाले बेलवडयावरून। विचार करी दत्त कोण। दर्शना येता दाखविले।।९३।। महादू माळयास अदृश्य केले। गारूडयासी चमत्कार दाविले। देवलोकीच्या स्थितीस सांगितले। राजेराम बापू व नामदेवा।।९४।। कली प्रभाव

सांगितला। शुध्द चित्ताचे प्राप्तीला। तैसेची समाधान चित्ताचे फळा विशद केले॥८५॥ सप्तदशोध्याय ऐसी कथा। मिरजला गेले नाटक पहाण्याकरिता। कृष्णेत सचैल स्नान करता। कपडे कोरडे राहीले॥९६॥ नामदेवासी उपदेशीला। नाटकाचा अर्थ भला। पहेलवानाचा अभिमान हरिला। रुपये दिले तयांचे॥९७॥ बुरुंगवाडी मठात असता। कृष्णेत झाले स्नान करिता। हजामतही केली तत्वता। चमत्कार दाखविला नामदेवा॥९८॥ सद्गुरू आपले भक्ताचे। पोषण कैसे करिती साचे। डोंगरावरी वाल्मीकीचे। दाविले नामदेवा॥९९॥ नरसोबाचेवाडीस गेले। दत्ताचे उत्सव पाहिले। अनारशाचे भोजन केले। सिताराम जोशाचे घरी॥१००॥ सर्व शिष्यात घेवून सोबतीला। गेले तिर्थयात्रा करण्याला। दाविले निर्गुण ब्रम्हाला। साकार रुपाने॥१०१॥ नायकीन बाईचे घरा आले। शिष्याचे संन्यास निष्ठेसी पाहीले। दोन मुलीसी झोपविले शिष्यांचे समवेत॥१०२॥ तेथोन चाफेलासी आले। मृत गायीस जिवंत केले। साधुस भोजन दिले। अधिकार तयांचा जाणून॥१०३॥ अष्टादशोध्यायी कथन। वाद प्रारब्ध आणि प्रयत्न। समजावूनी दिला शिष्यालागनु। काशिचे संन्यासा समवेत॥१०४॥ सोबत घेवून नामदेवाला। आले बुरुंगवाडीचे मठाला। उपदेश केला नामदेवाला। संगत थोडी सांगितले॥१०५॥ नामदेवा पाठविले पंढरीला। येथे अष्टादशोध्याय संपला। सद्गुरूच्या अगम्य लिला। एकोणविशोध्यायी कथन पुढे॥१०६॥ सद्गुरू गेले निजधामास। चमत्कार दाविला फौजदारास। दुःख होता मालवणकरास। हाता धरूनी उठविले॥१०७॥ चंद्राबाईस



दर्शन दिले। बुरुंगवाडीचे मठास पाठविले। सेवा करण्या सांगितले। ऐसे चमत्कार कितीतरी॥१०८॥ सदगुरू समाधीस्त झाल्यावर। जे का घडले चमत्कार। तेची कथिले समग्र। विशोध्यायी श्रोतेगण॥१०९॥ आता अध्याय हा एकविस। अवघ्या कथांचा आहे कळस। सर्व ग्रंथाचा सारांश। कथिला असे ययात॥११०॥ आजही आपुले भक्तास। चमत्कार दावित प्रत्यक्ष। अनुभवतो कित्येकांस। परी निष्ठा पाहिजे॥१११॥ जे येती बोरगावास। किंवा बुरुंगवाडीचे मठास। वंदिती समाधी किंवा फोटोस। चमत्कार नवीन सांगती॥११२॥ मुलगा पाही एका चमत्कारा। वडीलास दिसती दुसरा। नातेस तो तिसरा। आणि ऐसे कितीतरी॥११३॥ अनेक तयांचे चमत्कार। ब्रम्हानंद दत्त अवतार। लीला कोण वर्णणार। शक्य नाही मानवा॥११४॥ जेवढे नामदेव बुवास माहित। त्यातील घेऊन थोडक्यात। वर्णीले या ग्रंथात। विषाद ना वाटावा॥११५॥ जो मनोभावे करून। करील ग्रंथाचे पारायण। किं सात दिवस पूर्ण। सप्ताह करील स्वामीचा॥११६॥ तयासी देईल प्रत्यक्ष दर्शन। इच्छित हेतू करि पूर्ण। व्यावहारीक किंवा पारमार्थिक जाण। ब्रम्हानंद माऊली॥११७॥ जर का यावरी शंका घेईल। प्रायश्चित त्याचे भोगतील। जो निष्ठा ठेवील। फळ मिळेल तयासी॥११८॥ आता हे ब्रम्हानंदा। विनंती माझी तवपदा। निवारूनी मम आपदा। सोडवावे दुःखातूनी॥११९॥ असेल जरी पातकी नर। करण्या तयाचा उध्दार। सद्गुरूस पूर्ण अधिकार। म्हणूनी पडलो चरणासी॥१२०॥ जर का रागवावे मातेने। तर जावे कोठे बाळाने। तैसेची मी तुमचे तान्हे। दूर

Scanned by TapScanner

मजला लोटू नको।।१२१।। सद्गुरू ब्रम्हानंद माऊली। करी कृपेची सावली। परिसोनी दिनावली। करूणा तुज येवू दे।।१२२।। चरित्र तव रचण्याची। स्फूर्ती देई मज तुची। अन्यथा या पामराची। काय शक्ती होईल।।१२३।। तुची करता आणि करविता। मी केवळ कारण निमित्ता। क्षुल्लकाचेनी तत्वता। कैसे हे घडेल।।१२४।। सागरीचा शिंप किडा। हिमालया न देई वेढा। तैसा मी बापुडा। काय चरित्र रचणार।।१२५।। चरित्रकार थोर थोर। झालेत आणि होणार। मी एक पामर। अल्पमती अल्पज्ञ।।१२६।। परी सद्गुरू कारण यासी। मज धरून हातासी। चरित्र नेले पुर्णत्वासी। दुसरे काही न आणिका।।१२७।। शिष्य ब्रम्हानंद स्वामीचा। जो का नामानंद नावाचा। एकनिष्ठ सेवा करी साचा। तेची होय नामानंद।।१२८।। नामानंद महाराज देवळीला। येत असे अनेक वेळा। तेथोनी वाबगांवला। पादस्पर्श केला पैं। वास केला आठ पंधरा दिवस। भक्तांनी घेतला उपदेश। स्थापन केले मठास। नामानंद मठ नाम तया।।१३०।। श्री ब्रम्हानंद दत्त जाणी। नामदेव शिष्य शिरोमणी। चरित्र लिहिले तयांनी। गद्यात करोनिया।।१३१।। तेची हस्तलिखित मिळाले। मज नामानंद मठात। त्याचेची करोनी पद्यात। आपणापुढे ठेवियले।।१३२।। तो मठ नामानंदाचा। वाबगावी आहे साचा।। शिष्य समुदाय तयांचा। बहुतची ते ठायी।।१३३।। तेथील सद्गुरूचे हस्तलिखीत। पुजाऱ्याकडूनी झाले प्राप्त। तयाचेची केले पद्यात। सद्गुरूंनी मज हस्ते।।१३४।। तयात जरी का दोष घडे। ते ना येती मजकडे। जरी जाहले अधिक थोडे। क्षमा करो माऊली।।१३५।। दरवर्षी इथे मठास। आश्वीन शुध्द द्वितीयेस।



पुण्यतिथीचे उत्सवास। ब्रम्हानंदाचे करिती पैं।।१३६।। उत्सव सुरू असताना। बहु आनंद वाटे मना। चरित्राचे पारायणा। होतसे तयेवेळी।।१३७।। ब्रम्हानंद स्वामी कृपेने। चरित्र जाहले येथे पूर्ण। धन्य धन्य तुम्ही श्रोतेगण। संतकथा ऐकीली।।१३८।। इति श्री शामसुंदर रचित। श्री ब्रम्हानंद चरित्र ग्रंथ। नेला असे पूर्णत्वाप्रत। ब्रम्हानंद स्वामींनी।।१३९।।

।।इति श्री ब्रम्हानंद चरित्र सार।।

।।एकविशोध्याय संपूर्ण।।

।।कृष्णार्पन मंस्तु।।

Scanned by TapScanner

# श्री सद्गुरु ब्रह्मानंदाच्या आरत्या, पदे, भजन

## ॥ आरती ॥

करू आरती सद्गुरु-सेवा ब्रह्मानंद केशवा। ब्रह्मानंद राघवा ॥धृ॥
भक्तजन आम्ही युक्त होऊनी।
नित्य नामाचे स्मरण करुनी।
तन, मन, धन हे अर्पिले चरणी
आम्हा आसरा द्यावा। ब्रह्मानंद केशवा ॥१॥
तन हे झिजवू तुझ्याच पायी।
देहहि खर्चू तुझ्याच कार्यी।
मन हे लावू तुझ्याच ठायी।
आम्हाला मार्ग दाखवा। ब्रह्मानंद केशवा ॥२॥
मागणे आम्ही मागतो देवा।
सदा-नित्य तुझा ध्यास आसवा।
प्रेमाचा तो भंग न व्हावा।
सच्चिदानंद राघवा। ब्रह्मानंद केशवा ॥३॥
भक्तांचा तू आहेस कैवारी।
संकट आमुचे सत्वर वारी।
दीनदास मी बुडतो सागरी।
वेगे धाव माधवा। ब्रह्मानंद केशवा ॥४॥



॥जय देवा ब्रम्हानंदा॥
॥स्वामी आनंदकंदा॥
॥आरती ओवाळीतो॥
॥तुमच्या चरणारविंदा॥धृ॥
॥योगीराज महाराज॥
॥जयस्वामी दीनबंधू॥
॥भक्ताप्रती सांभाळीतो॥
॥होसी कृपेचा सिंधु॥१॥
॥दया, क्षमा, शांती तिन्ही॥
॥ज्याच्या हृदयी रहाती॥
॥द्वैतांचा लेश नाही॥
॥सर्वा समान पाही॥२॥
॥कामक्रिडा दुर्जनाच्या॥
॥ज्याला विटाळच नाही॥
॥कडकडीत ब्रम्हचारी॥

Scanned by TapScanner

॥सदा सोवळा जो राही॥३॥
॥अक्कलकोट कृष्णातीरी॥
॥वस्ती औदुंबरापासी॥
॥रिध्दी सिध्दी द्वारी उभ्या॥
॥दासी होऊनी राहती॥४॥
॥जडमुढ तारावया॥
॥दत्तगुरू अवतरले॥
॥आत्माराम शरण त्यासी॥
॥देवभाव अनुसरले॥५॥



**पद**

ब्रम्हानंद माऊली, ब्रम्हानंद माऊली
दासावरी करी साऊली, ब्रम्हानंद माऊली।
दत्त गुरूराज अवतरले
जडमुढ तारण्या आले। ब्रम्हानंद माऊली।
लिला केल्या नानापरी
डबा पोहीला पाण्यावरी। ब्रम्हानंद माऊली।
साठ वरूषाचे म्हातारीला
दुधाच्या त्या लावी धारा। ब्रम्हानंद माऊली।
कुष्ठ रोगी ब्राम्हणाला
चंदन लावी सांगे त्याला। ब्रम्हानंद माऊली।
चंदन लाविता अंगास
कुष्ठ रोगाचा झाला नाश। ब्रम्हानंद माऊली।
क्षणात येथे, क्षणात तेथे
फिरून येई ब्रम्हांडाते। ब्रम्हानंद माऊली।
शाम लागला चरणास
पुरवावी तयाची आस। ब्रम्हानंद माऊली।

Scanned by TapScanner

(जयदेव जयदेव जय पांडुरंगा)
जयदेव जयदेव जय सद्‌गुरूराया
अवतारूनीया आला दासा तारायाा।धृा।
अक्कलकोट निवासी स्वामीातू माझा
बुडालो गांा भवडोही, धावे मम काजाा।१।।
नामस्मरणे ज्याच्या बहु तरती पापी
अनंत पुण्ये करूनी दर्शन दे आपीा।२।।
स्वस्वरूपाचा बोध करूनिया सकळा
भक्तजना उद्धरूनी पळविसी काळाा।३।।
नव महीमेचा गौरव काय वर्णू आता
'षुकड्या' ठेव देई स्वामी जगत्राताा।४।।



## स्वामींनी केलेली 'श्री'ची नित्य उपासना

### ।। भूपाळी १ ली ।।

उठा जागा आयु भक्षितो क्षणे क्षणे काळ । खातो क्षणे क्षणे काळ । स्नान करोनी चला डोंगरी अरुणोदय वेळ ।। धनसुतदारा गेह पसारा कोणि सोडवीना । भयातुनि कोणि सोडविना । स्वामी ब्रह्मानंद दयाळू भव भय उरविना ।।१।। गुलाल बुक्का सुमनहार घ्या गंध फुलें तुलसी । नाना धूप कर्पूरासी । पुन्हां मिळेना नर तनु ऐशी लोळुं नका आळसी ।।२।। सत्वर जाऊनि जागे करं या ब्रह्मानंदासी । देई जो पूर्णानंदासी । करुणाघन विझवील आपुल्या तो भवदावासी ।।३।। दीन होउनी जाऊं चरणिं शरण पूर्ण भावे । संसृती नुरवी तो नांवे । दंभ, मान, मद यांचे सरती विविधा मैंदावे ।।४।। गुरु-भास्कर-नेत्राब्ज उघडुनी हे सुख मकरंदा । तमाचा सरे तदाधंदा । प्रज्ञास्वामी ब्रह्मानंदा नमिती गत भेदा ।।५।।

### ।। भूपाळी २ री ।।

उठ जाग बा ब्रह्मानंदा । सदया करि करुणा । लेंकरावरि बहु करि करुणा । अरुणोदय हा स्वराज्य आले धाव दाव चरणा ।।धृ०।। अधर्म तम घन शीत सुराज्या पिका येउ देना । सुखदा पिका येउ देना । दुरभिमान हेमन्त मोहहा शिशिर साहवेना ।।१।। द्वेषदंभ पाषंड दैत्न दर निशिचर नाना हे । माजले रजनीचर बहु हे । काम, घूक, वृक, लोभ, वाघ, मद, मत्सर, तस्कर हे ।।२।। धर्म वसंतावीण न जाती, म्हणुनी तो आणा । दंडधर होउनि त्या हाणा । सुराज्य पिकतो वसन्त नसता नकरी सुख गाना ।।३।। धन, दारा, गृह, ऐक्य, सैख्य या राक्षसा हे खाती । सतींना भ्रष्ट किती करती । म्हणुनी सखया धर्मशील जन तुझी वाट बघती ।।४।। चित्तीं श्रमले सज्जन जमले पहा किती द्वारीं । समर्थी तुझ्या उभे द्वारीं । काय करावें कों जावें विनवीती भारी ।।५।। प्रज्ञा विनवी बहू न शिणवी सज्जन-वृंदांना । दयालो तुझ्या लेकरांना । शांति-दया-साम्राज्य पसरवी देई या दाना ।।६।।

Scanned by TapScanner

## ॥ काकडा आरती १ ॥

काकडा आरती प्रेमे ब्रह्मानंदासी । जय जय योगिराजयासी । पूर्ण परात्पर कृपानिधी जो कुण्डल गिरिवासी ॥धृ०॥ मायेचा काकडा भेदधी घृतांत भिजवीला । देवा घृतांत भिजवीला । विवेक विरती घर्षणि "सोहं" ज्योती पेटविला ॥१॥ यातेजामधि पाहूं भवहर गुरुवर मुख कमला । पाहूं गुरुवर मुख कमला । चिज्जड गांठी सोडी सोडी कृपा-कटाक्षाला ॥२॥ आरति ओवाळीता चिद्घन योगीराजाला । भावे ब्रह्मानंदाला । जळुनि काकडा "सोहं" ब्रह्मानंदीं समरसला ॥३॥ प्रारब्धाची विभूति राहे लावूं देहाला । देवा लावुं कपाळाला । प्रज्ञास्वामी विश्वीं पाहे ब्रह्मानंदाला ॥४॥

॥ २ ॥

काकडा आरती ब्रह्मानंदी केशवासी । जयजय योगिराजयासी । सज्जन-वृन्दीं मान्य सदा त्या ब्रह्मानंदासी ॥धृ०॥ भानु कृपाकर पसरुनि शिरि जो मोह-तिमिर नाशी । जनांचा मोह-तिमिर नाशी सच्चित्सुखमय पूर्णदयाघन कुंडल-गिरिवासी ॥१॥ दत्ताचा अवतारचि चौथा दे पुरुषार्थासी । सकामा दे पुरुषार्थंसी । स्वार्थाति विसरती सदा त्या दे परमार्थासी ॥२॥ श्रध्दा भक्ति घृत हृत्पात्रीसख्य ज्योतीसी । प्रेमे सख्य ज्योतीसी। पेटवुनी ओवाळी प्रज्ञा ब्रह्मानंदासी ॥३॥

## ॥ भजन ॥

कुंडलगिरि वासी माझे ब्रह्मानंदमाई । माजे ब्रह्मानंदमाई । बुरुंगवाडी मिरास माझे योगिराज आई ॥१॥ ब्रह्मानंदा सेवक वरदा । सत्वर तोही मम भवफंदा ॥२॥ ब्रह्मानंदा योगी राजा । धावपाव बा अनाथ काजा ॥३॥

## ॥ मुख-प्रक्षालन भूपाळी ॥

काकडा झाला आता मुखा प्रक्षाळा । आता मुखा प्रक्षाळा । सेवक मेळा लोणी साखर घेउनिया आला ॥धृ०॥ श्रध्दासात्विक पाट मांडिला त्यावरि बैसावे । प्रेंमे त्यावरि बैसावे । दंत काष्ठमम चित्तदुराशा चावुनि निरसावे ॥१॥ काम क्रोधे तत्प वासना जळ आननिं घांला । देवा टाकावे चूळा। करूनी मुखमार्जनास देई



सुख या दीनाला ॥२॥ चित्ताची शुभ तळमळ लोणी साखर भावाची । घ्यावी साखर भावाची । ब्रह्मानंदा भक्षण करि दे प्रीती पायांची ॥३॥ साही चारी चौदा अठरा वानिति तव महिमा । प्रेमे वानिति तव महिमा । दुजेपराने पारन लागे अगम्य गुण गरिमा ॥४॥ सिद्ध मुनीश्वर सज्जन वंदिति शरण्य तव चरणां । देवा शरण्य तव चरणां । प्रज्ञा स्वामी विनवी करिबा दीनावरि करुणा ॥५॥

## ॥ सायं-उपासना आरती ॥

ओवाळूं ब्रह्मानंदा । वासुदेवा योगीवंद्या । आरती ओवाळीता । पूर्ण झाल्या चारी संध्या ॥धृ०॥ विवेकाचे नीरांजन । शमादीक दांडा जाण । वैराग य आज्ये पूर्ण । हाती मुमुक्षा घेऊन ॥ ओवाळुं ॥१॥ शुध्द चित्त मंदीरांत । ध्यानाभ्यास गाभाऱ्यात । त्रिगुणांची पेटे वात ।"सोहं" ज्योती तेवे शांत ॥ ओवाळूं ॥२॥ ज्ञानाच्या प्रभेमाजीं । ग्रंथी जड-चैतन्याची । पाहतां नव्हे साची । शक्ती येते तोडायची ॥ ओवाळूं ॥३॥ ऐसा हा ग्रंथी-भेद । करी संशयाचा छेद । मोह नूरे सरे खेद । ऐसे गर्जती हे वेद ॥ओवाळूं ॥४॥ वृत्तीचा लय जेव्हां । पूर्ण वोळे स्वानुभवा । कृतकृत्य जीव तेव्हां। प्रज्ञानंदा वासुदेवा ॥ ओवाळूं ॥५॥

## ॥ भजन ॥

ब्रह्मानंदा सेवक वरदा । सत्वर तोडी मम भव फंदा ॥१॥
ब्रह्मानंदा योगी राजा । धाव पाव बा अनाथ काजा ॥२॥

## ॥ पंचपदी ॥

॥ १ ॥

ब्रह्मानंदा योगी राया । आधी वंदू भावे पाया ॥१॥ दिव्यहास्य रम्यमूख । दर्शन दे पूर्ण सुख ॥२॥ नेत्र

Scanned by TapScanner

कृपाळू तेजाळ । गळां रुद्राक्षांची माळ ॥३॥ शुभ्र वस्त्रे परीधान । क्षुधा तृषा नाही भान ॥४॥ प्रज्ञा वादुसेव शिरीं । कृपाछत्र पूर्ण धरी ॥५॥

॥ २ ॥

ब्रह्मानंद राजा । पुरवीतो भक्त काजा ॥१॥ शरण जावे त्याचे पाया । भवदैन्य नेई लया ॥२॥ भेदभाव निरसीतो । अभिमाना विध्वंसीतो ॥३॥ शुध्द भावाचा भुकेला । पावे आर्तांच्या हांकेला ॥४॥ प्रज्ञा वासुदेव म्हणे ॥ भावे धरावी चरणे ॥५॥

॥ ३ ॥

मृतजीव तुम्ही किती उठवीले । मला उपेक्षीले काय दोष ॥१॥ दोषांचा सागर परी तुझा दास । पुरवठा आस ब्रह्मानंदा ॥२॥ रात दिन पाठी प्रपंचाचा धंदा । मज मतिमंदा तारी तारी ॥३॥ बुडालों बुहालों अपार संसारीं । जन्ममृत्यू फेरी आतां नको ॥४॥ प्रज्ञा वासुदेव दावी ब्रह्मानंदा । संसारा भीतीदा दूरसारी ॥५॥

॥ ४ ॥

किती वाट पाहू तुझी मायबापा । संसाराच्या तापा शांत करी ॥१॥ काम क्रोध लोभ घोर हे मगर । दंभ अजगर गीळती बा ॥२॥ तुझे नाम देवा पतीत पावन । दासांचे जीवन तुझे नाम ॥३॥ तुझे नाम घेतां कीर्ती गुणगातां । मिळे भवश्रांता विश्रांती गा ॥४॥ प्रज्ञा वादुसे ब्रह्मानंद दानी । संसाराची हानी पूर्ण केली ॥५॥

॥ ५ ॥

तुजवीण मज जगी कोण आहे । तळमळ राहे चित्तीं फार ॥१॥ तुझा मी चकोर ब्रह्मानंद चंद्रा । चाखवी योगींद्रा रुपा-मृता ॥२॥ तूं माझी माऊली मी तुझा तान्हुला । प्रेम पान्हा मला पाज वेगी ॥३॥ तूचि कामधेनू मी



तुझे वासरू । नको पान्हा चोरू कृपा करी ॥४॥ प्रज्ञा वासुदेव सदगुरु नावीक । उद्धरे सेवक ब्रह्मानंदी ॥५॥

## ॥ भजन ॥

तारी तारी तारी आता ब्रह्मानंदा हो । ब्रह्मानंदा हो ॥ दावी दावी दावी आतां दिव्य रुपा हो ॥१॥ मारी मारी मारी माया लावुनी पायां । माथा मारुनी पायां ॥ गेला गेला गेला मानव जन्म हा वाया ॥२॥ केले केले केले दंभ लोकांमाजीं हो । मान सन्मानार्थी हो ॥ आलों आलों आलों चरणी शरण तारी हो ॥३॥ क्षमा क्षमा क्षमा सर्व अपराध गर्व माझे मूर्खाचेसर्व ॥ हेळसीले साधु सज्जना आता क्षमा हो ॥४॥ तारी०॥

## ॥ शेजारती ॥

आतां ब्रह्मानंदा निद्रा करा गुरुराया। निद्रा करा गुरुराया । कृपा करावी दीनावरती कष्टविले वाया ॥धृ०॥ अरुप असुनी स्वरुप झाला लोकोद्धारासी । आता लोकोद्धारासी । स्वरुपि निद्रा सुखे करावी आतां हृद्धासी ॥१॥ हृदय-मंदिरीं शांति-पलंगी सुमन-शेजेसी । पहुडा सुमन-शेजेसी । मैत्री, क्षमा, दया दासी सेविति चरणासी ॥२॥ करुणा वरुणा लया नेउनि भेदाते विलया । प्रेमभक्तिच्या नवविध जलती तेजस्वी समया ॥३॥ ब्रह्मानंद स्वामी बसले मानस-मंचकीं । माझ्या हृदय-मंचकी । प्रज्ञा स्वामी, अतां'विनवितों विडा घ्यावा की ॥४॥

## ॥ विडा ॥

विडा घ्यावा गुरु राया । ब्रह्मानंदा योगी राया ॥धृ०॥ देह बुद्धि पक्क पानें । खुडुनियां विवेकानें । अभिमान देठ तोंडू । आसक्ती या शिरा काढूं ॥१॥ वैराग्याचा चुना मऊ । लोणी केशर मिश्रित लावुं । सुपारी काम चूर्ण । शम कात शुद्ध पूर्ण ॥२॥ शुद्ध श्रद्धा वेलदोडे, । दम खोबरें गोडे, । तितिक्षा लवंग तीख । कंकोळ उपरम नीक ॥३॥ समाधानाचें केशर । मुमुक्षा कस्तुरी तीव्र । जायपत्री जायफळ । भक्ति ज्ञानही निर्मळ ॥४॥ कर्पूर भाव केला । तेरा गुणी विडा झाला । ब्रह्मानंदा, मूखीं घाला। प्रेमभक्ति तै रंगला ॥५॥ अभेद भक्ति रसास्वाद

Scanned by TapScanner

। सर्वा देती ब्रह्मानंद । विडा देती प्रज्ञानंद । विश्वीं भरला ब्रह्मानंद ॥६॥

## ॥ श्री ब्रह्मानंदाष्टक ॥

ब्रह्मशुद्ध आनंदचि रुपरहित जे । ते ब्रह्मानंदरुप धरि तया भजे ॥ध०॥ आबाल्य ब्रह्माचारि योगिराजया । विधि हरिहर उदरिं सदर वंदिती जया ॥ कुंडलगिरि मंडित करी वंद्यपदरजे । योग-सिद्धि पसरति पदिं हेम-पद-रजे ॥१॥ योग-चमत्कार किती दाविले जना। दत्तात्रय अवतारचि तुरिय तो गणा ॥ कोण कदा जन्म कुठुनि येथ ठाकले । कोणाला लवलेशहि अंत ना कळे ॥२॥ आहाराविण जगली ती तनू सदा । जळि समाधि बहु निशि-दिनि करि कदा कदा ॥ साधुवेष वा कुवेष नच कदा धरी । चित्त असे लीन सदा ते गदाधरीं ॥३॥ बालकांत खेळुनिया तोषवी तया । योगाचा अधिकारी नाढळे जया ॥ काळाला प्रतिकूल बघुनि बुरुंग वाडीला । घे सजीव जो समाधि अजुनि राहिला ॥४॥ दरुनि पूर्वरुप मधुनि परिचिताजनां । बहु अवसरि, करुनि दया देइ दर्शना ॥ आदेशा देऊनियां बसवि पादुका । तेथ करी वास त्यास नमवुं मस्तका ॥५॥ संचारा करनि देहिं मार्ग दाखवी । शिवराया जशि देवी दावि शांभवी ॥ धर्माच्या उद्धारा झटति जे सदा । त्यान विसंबेल मुळी सज्जना कदा ॥६॥ संत मान लववीती शद्धिं ज्यांचिया । ते ब्रह्मानंद नमूं मुगुट योगिया ॥ सद्धर्मोद्धार करो मार्ग दाखवो। रामराज्य पसरुनिया विश्व तोषवो ॥७॥ नश्वर या देहांतुनि सोडवो जना । प्रभुपदरति गंगाजळिं पोहवो मना ॥ प्रज्ञातनु राष्ट्र कार्यि नित्य वाहवो। शांतीच्या साम्राज्या विश्विं पसरवो ॥८॥

साय-उपासना समाप्त

ॐ



## 'श्री सद्‌गुरु ब्रह्मानंद चरित्र्य' यासाठी मदत करणारे देणगीदार

| अ.नं. | नांव | | रुपये |
|---|---|---|---|
| १) | श्री. किशोर पांडुरंग कोळेकर, | बुरुंगवाडी | १११११/- |
| २) | श्री. विष्णू एकनाथ जाधव (बुरुंग), | बुरुंगवाडी | ११०१/- |
| ३) | श्री. शंकर रामचंद्र कदम, | किल्लेमच्छिंद्रगड | १००१/- |
| ४) | ब्रह्मानंद सर्व सेवा सह.सोसा.ब्रह्मानंदनगर | | १०००/- |
| ५) | श्री. नारायण यशवंत कदम, | बुरुंगवाडी | ४००/- |
| ६) | श्री. दिलीप बापू खुबीकर, | —"— | २५१/- |
| ७) | श्री. बापू तुका जाधव, | —"— | २५१/- |
| ८) | श्री. व्यंकट बापू जाधव, | —"— | १५१/- |
| ९) | श्री. रंगराव रामचंद्र हवलदार, | —"— | १५१/- |
| १०) | श्री. भिमराव आण्णा हवलदार, | —"— | १५१/- |
| ११) | श्री. आनंदा शंकर ढेरे, | —"— | १२०/- |
| १२) | श्री. वसंत शिंदे (ड्रायव्हर), | शिंदे मळा | १११/- |
| १३) | श्री. लक्ष्मणराव ज्ञानोबा शिंदे, | येळावी | १११/- |
| १४) | श्री. विष्णू लक्ष्मण मानुगडे, | जुळेवाडी | १११/- |
| १५) | श्री. धोंडीरामं शंकर कोकाटे, | बुरुंगवाडी | ११०/- |
| १६) | श्री. शंकर बाळा पाटील, | जुळेवाडी | १०५/- |
| १७) | श्री. वसंत शिवलिंग माळी, | बुरुंगवाडी | १०५/- |
| १८) | श्री. दत्तू हरि कणसे, | जुळेवाडी | १०२/- |
| १९) | श्री. बाळू धोंडी चव्हाण, | बुरुंगवाडी | १०१/- |
| २०) | श्री. हणमंत कृष्णा जाधव, | —"— | १०१/- |
| २१) | श्री. यशवंत आनंदा जाधव, | —"— | १०१/- |
| २२) | सौ. कालींदी पांडुरंग टोपकर, | —"— | १०१/- |
| २३) | श्री. शंकरराव भिमराव नलवडे, | ढवळी | १०१/- |
| २४) | श्री. पांडुरंग महादेव मोहिते, | बुरुंगवाडी | १०१/- |
| २५) | श्री. नंदकुमार आप्पासाहेब खोत, | जुळेवाडी | १०१/- |
| २६) | श्री. वसंत बापू यादव, | बुरुंगवाडी | १०१/- |
| २७) | श्री. रामचंद्र बाळू जाधव, | —"— | १०१/- |
| २८) | श्री. बाबासो अर्जुन नरळे, | —"— | १०१/- |
| २९) | श्री. ईश्वर रामचंद्र साळुंखे, | —"— | १०१/- |
| ३०) | श्री. धोंडीराम लक्ष्मण वाटकर, | जुळेवाडी | १०१/- |
| ३१) | सौ. मंगल तानाजी थोरात, | खानापूर | १०१/- |
| ३२) | श्री. मधुकर महादेव जाधव, | बुरुंगवाडी | १०१/- |
| ३३) | श्री. कृष्णा धोंडीराम चव्हाण, | —"— | १०१/- |
| ३४) | श्री. पांडुरंग केशव जाधव, | —"— | १०१/- |

Scanned by TapScanner

| अ.नं. | नांव | | रुपये | अ.नं. | नांव | | रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३५) | श्री. राजाराम बापू माळी, | बुरुंगवाडी | १०१/- | ५४) | श्री. विष्णु तुकाराम मोरे, | जुळेवाडी | १०१/- |
| ३६) | श्री. दिनकर काशिनाथ जाधव, | —''— | १०१/- | ५५) | श्री. गुंडाजी रामचंद्र भवर, | बुरुंगवाडी | १००/- |
| ३७) | श्री. विश्‍वनाथ केशव जाधव, | —''— | १०१/- | ५६) | श्री. अशोक आनंदा कुके, | बुरुंगवाडी | १००/- |
| ३८) | श्री ब्रह्मानंद भजनी मंडळ, | ब्रह्मानंदनगर | १०१/- | ५७) | श्री. शशिकांत भगवान माळी, | बुरुंगवाडी | १००/- |
| ३९) | श्री. विलास बाबासो यादव | भिलवडी स्टेशन | १०१/- | ५८) | श्री. विजय यशवंत जाधव, | बुरुंगवाडी | १००/- |
| ४०) | श्री. भगवान आत्मा चव्हाण, | बुरुंगवाडी | १०१/- | ५९) | शिवाआक्का लेंगरेकर, | विटा | १००/- |
| ४१) | श्री. यशवंत दत्तात्रय शिंदे, | येळावी | १०१/- | ६०) | श्री. नाथाजी महादेव जाधव, | बुरुंगवाडी | १००/- |
| ४२) | श्री. राजाराम आत्मा जाधव, | बुरुंगवाडी | १०१/- | ६१) | श्री. ईश्‍वर दत्तू जाधव, | बुरुंगवाडी | १००/- |
| ४३) | श्री. महादेव शंकर जाधव, | जुळेवाडी | १०१/- | ६२) | श्री. भूपाल भगवान जाधव, | बुरुंगवाडी | १००/- |
| ४४) | श्री. प्रदीप सुरजभान अग्रवाल, | भिलवडी स्टेशन | १०१/- | ६३) | श्री. विलास सिताराम माळी, | बुरुंगवाडी | १००/- |
| ४५) | श्री. संपतराव विठ्ठल बेनापुरे, | —''— | १०१/- | ६४) | श्री. पाटील बी.डी.ब्रह्मानंद विद्या. | ब्रह्मानंदनगर | १००/- |
| ४६) | श्री. तुकाराम मारुती माळी सरपंच | —''— | १०१/- | ६५) | श्री. वाठारकर एस. पी. | —''— | १००/- |
| ४७) | श्री. पंडित तुकाराम पुजारी, | —''— | १०१/- | ६६) | श्री. माळी एम. एस. | —''— | १००/- |
| ४८) | श्री. शंकर पांडुरंग पानबुडे, | बुरुंगवाडी | १०१/- | ६७) | श्री. यादव एस. के. | —''— | १००/- |
| ४९) | श्री. निवृत्ती पांडुरंग देसाई, | आष्टा | १०१/- | ६८) | सौ. सोनावणे के. एस. | —''— | १००/- |
| ५०) | श्री. शामराव आनंदा साळुंखे, | धनगांव | १०१/- | ६९) | श्री. पाटील बी. एम. | —''— | १००/- |
| ५१) | श्री. गणपती रामचंद्र फडतरे, | जुळेवाडी | १०१/- | ७०) | श्री. व्ही. डी. जाधव | —''— | १००/- |
| ५२) | श्री. आनंदा दशरथ शिरटेकर, | येळावी | १०१/- | ७१) | श्री. मगदूम बी. के. | —''— | १००/- |
| ५३) | श्री. महेबुब कादर बारगिर, | बुरुंगवाडी | १०१/- | ७२) | श्री. जाधव एम. पी. | —''— | १००/- |



| अ.नं. | नांव | | रुपये | अ.नं. | नांव | | रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७३) | श्री. गुरव ए. टी. ब्रह्मानंद विद्या. | ब्रह्मानंदनगर | १००/- | ९२) | श्री. पांडुरंग चंद्रू जाधव, | बुरुंगवाडी | १००/- |
| ७४) | श्री. राजमाने ए. सी. | —''— | १००/- | ९३) | श्री. प्रल्हाद सिताराम माळी, | —''— | १००/- |
| ७५) | श्री. जाधव बी. पी. | —''— | १००/- | ९४) | श्री. गणपती तुकाराम जाधव, | —''— | १००/- |
| ७६) | सौ. गुरवएस. जी. | —''— | १००/- | ९५) | श्री. शिवाजी रामचंद्र जाधव, | —''— | १००/- |
| ७७) | श्री. जाधव बी. एल. | —''— | १००/- | ९६) | श्री. बाजीराव शंकर पाटील, | बहेबोरगांव | १००/- |
| ७८) | श्री. माळी डी. जी. | —''— | १००/- | ९७) | श्री. रघुनाथ बाळा फार्णे, | —''— | १००/- |
| ७९) | श्री. जाधव बी. बी. | —''— | १००/- | ९८) | श्री. महादेव विठ्ठल फार्णे, | —''— | १००/- |
| ८०) | श्री. चव्हाण डी. एस. | —''— | १००/- | ९९) | श्री. सुरेश तुकाराम फार्णे, | —''— | १००/- |
| ८१) | श्री. मोरे एस. टी. | —''— | १००/- | १००) | श्री. मारुती चंद्रू जाधव, | बुरुंगवाडी | १००/- |
| ८२) | श्री. भिसे एस. एम. | —''— | १००/- | १०१) | श्री. परशराम बाबुराव जाधव, | बुरुंगवाडी | १००/- |
| ८३) | श्रीमती कृष्णाबाई वासुदेव क्षीरसागर | बुरुंगवाडी | १००/- | १०२) | श्री. राजाराम भिवा तावदर, | बुरुंगवाडी | १००/- |
| ८४) | श्री. जगन्नाथ आनंदा तावदर | —''— | १००/- | १०३) | श्री. बबन गणपती गोंदिल, | (गोंदिलवाही-पलूस) | १००/- |
| ८५) | श्री. केदारी लक्ष्मण जाधव | —''— | १००/- | १०४) | श्री. यशवंत शामराव हवलदार, | बुरुंगवाडी | १००/- |
| ८६) | श्री. मधुकर कृष्णा माळी | —''— | १००/- | १०५) | श्री. महेश शहाजी मगदूम, | खंडोबाचीवाडी | १००/- |
| ८७) | श्री. अशोक महादेव जाधव | —''— | १००/- | १०६) | श्री. मारूती रघुनाथ शेळके, | बुरुंगवाडी | १००/- |
| ८८) | श्री. रघुनाथ माळी, | कापूसखेड | १००/- | १०७) | श्री. लक्ष्मण बापू माळी, | येळावी | १००/- |
| ८९) | श्री. दत्तात्रय कृष्णा जाधव, | बुरुंगवाडी | १००/- | १०८) | श्री. सदाशिव विष्णू सुर्यवंशी, | बुरुंगवाडी | १००/- |
| ९०) | श्री. शिवाजी महादेव जाधव | —''— | १००/- | १०९) | श्री. भिमराव दत्तू जाधव, | —''— | १००/- |
| ९१) | श्री. नारायण कोंडीबा माळी, | भाळवणी | १००/- | ११०) | श्री. सुरेश शंकर माने, | —''— | १००/- |

Scanned by TapScanner

| अ.नं. | नांव | | रुपये |
|---|---|---|---|
| १११) | श्रीमती शाणाबाई निवृत्ती जाधव, | बुरुंगवाडी | १००/- |
| ११२) | श्री. तुकाराम ज्ञानू कोकाटे, | —"— | १००/- |
| ११३) | श्री. सुभाष राजाराम सुर्यवंशी, | —"— | १००/- |
| ११४) | श्री. कबीर शिवा मोरे, | —"— | १००/- |
| ११५) | श्री. केदारी बाबूराव जाधव, | —"— | १००/- |
| ११६) | श्री. सुनील संपतराव जाधव, | —"— | १००/- |
| ११७) | श्री. लक्ष्मण सिताराम माळी, | —"— | १००/- |
| ११८) | श्री. अर्जुन धोंडीराम चव्हाण, | —"— | १००/- |
| ११९) | श्री. गोविंद आबा सूर्यवंशी, | —"— | १००/- |
| १२०) | श्री. महादेव तुकाराम तावदर, | —"— | १००/- |
| १२१) | आक्काताई आबाजी सुनटके, | सांगली | १००/- |
| १२२) | श्री. शंकर रामचंद्र साळुंखे, | बुरुंगवाडी | १००/- |
| १२३) | श्री. बाळासो रामचंद्र फुटाणे, | —"— | १००/- |
| १२४) | श्री. बाळकृष्ण प्रल्हाद मोरे, | —"— | १००/- |
| १२५) | श्री. सदाशिव महादेव जाधव, | —"— | १००/- |
| १२६) | श्री. मनोहर नामदेव पाटील, | —"— | १००/- |
| १२७) | श्री. भाऊ दाजी जाधव, | —"— | १००/- |
| १२८) | श्री. रमेश महालिंग माळी, | —"— | १००/- |
| १२९) | श्री. तुकाराम आबा जाधव, | —"— | १००/- |
| १३०) | श्री. बबन बापू जाधव, | —"— | १००/- |
| १३१) | श्री. तुकाराम बापू मोरे, | —"— | १००/- |
| १३२) | श्री. गोविंद शंकर जाधव, | —"— | १००/- |
| १३३) | श्रीमती इंदूबाई बापू जगदाळे, | भोसे | १००/- |
| १३४) | श्री. सदाशिव गणपती तावदर, | बुरुंगवाडी | १००/- |
| १३५) | श्री. ज्ञानू दत्तू मानुगडे, | जुळेवाडी | १००/- |
| १३६) | श्री. रामचंद्र कृष्णा माळी, | बुरुंगवाडी | १००/- |
| १३७) | श्री. भगवान गोविंद सुर्यवंशी, | —"— | १००/- |
| १३८) | श्री. आनंदा रघुनाथ शेळके, | —"— | १००/- |
| १३९) | श्री. सदाशिव कृष्णा जाधव, | —"— | १००/- |
| १४०) | श्री. नारायण रामचंद्र जाधव, | —"— | १००/- |
| १४१) | श्री. महेश मारुती माळी, | —"— | १००/- |
| १४२) | श्री. भगवान दत्तू जाधव, | —"— | १००/- |
| १४३) | श्री. गणपती चंद्रू मगर, | भाळवणी | १००/- |
| १४४) | श्री. जनार्दन कृष्णा गायकवाड, | बुरुंगवाडी | १००/- |
| १४५) | श्री. ईश्वर भाऊ कोकाटे, | —"— | १००/- |
| १४६) | श्री. बाबूराव ज्ञानू तोडकर, | भिलवडी स्टेशन | १००/- |
| १४७) | श्री. मधुकर श्रीधर कुलकर्णी, | —"— | १००/- |
| १४८) | श्री. लक्ष्मण केरु सुर्यवंशी, | बुरुंगवाडी | १००/- |
| १४९) | श्री. पांडुरंग कुंडलिक जाधव, | —"— | १००/- |
| १५०) | श्री. दत्तात्रय आण्णा हवलदार, | —"— | १००/- |
| १५१) | श्री. धोंडीराम विठोबा पवार, | बांबवडे | १००/- |
| १५२) | श्री. विलास शंकर सुर्यवंशी, | बुरुंगवाडी | १००/- |
| १५३) | श्री. किरण वसंत जाधव, | —"— | १००/- |
| १५४) | श्री. तानाजी दत्तात्रय जाधव, | —"— | १००/- |
| १५५) | स्टाफ दि सांगली बँक सांगली शाखा-बुरुंगवाडी | | १००/- |
| १५६) | श्री. विनायक केशव सूर्यवंशी, | —"— | १००/- |
| १५७) | श्री. परशराम बाबू साळुंखे, | —"— | १००/- |
| १५८) | श्री. प्रकाश गोविंद कोळेकर, | जुळेवाडी | १००/- |



|| श्री सद्गुरु ब्रह्मानंद प्रसन्न ||

## श्री ब्रह्मानंद आश्रमाचा अल्पपरिचय


बुरुंगवाडी (ब्रह्मानंदनगर) हा गांव महाराष्ट्रातील सांगली जिल्हा ता. तासगांव भिलवडी स्टेशन जवळ आहे. श्री ब्रह्मानंद आश्रम भिलवडी स्टेशन पासून १ कि.मी. अंतरावर आहे.

श्रीं चा आश्रम गावच्या पश्चिम दिशेला असून आश्रमाचे महाद्वार पूर्वेस आहे. आश्रमात श्री स्वामी ब्रह्मानंद यांची संजीवन (जिवंत) समाधी आहे. आश्रमात स्वामी रामानंद भारती यांची ही समाधी आहे. तसेच आश्रमात तळघरात सुंदर ध्यानमंदिर आहे. आश्रमाच्या बाहेरच समोर 'श्री'चे एकनिष्ठ भक्त बाळूदादा माळी यांची समाधी आहे.

आश्रमाच्या सभोवताली सर्व ग्रामस्थांच्या प्रेरणेने व गावच्या ब्रह्मानंद युवक मंडळ यांच्या श्रमातून बगीचा निर्माण केला आहे.

पूर्वी आश्रमाची जागा कृष्णा माळी व तातोबा माळी यांच्या मालकीची होती. ब्रह्मानंद महाराजांच्या नावे ट्रस्ट करून ती १९५८ साली आश्रम सार्वजनिक होण्याकरता कायदेशीर मान्यता दिली. सध्या सर्व कामकाज ब्रह्मानंद ट्रस्ट यांचेकडे आहे.

Scanned by TapScanner



प. पू. स्वामी रामानंद भारती
यांनी आश्रमाचा जिर्णोद्धार केला



श्री सद्‌गुरु ब्रह्मानंद महाराज
यांची जीवंत समाधी



सध्याचा श्री ब्रह्मानंद आश्रम, बुरुंगवाडी.

Scanned by TapScanner